
# लोकनेते यशवंतराव चव्हाण

६०



0954
923.60954/CHA
Y.C.P LIBRARY
G04260

लेखक - अनिल चव्हाण



**यशवंतरावांचे देवराष्ट्रे येथील निवासस्थान**




**आई विठाई समवेत सौ. वेणूताई व यशवंतराव**

## ॥ अर्पणपत्रिका ॥

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सर्वस्व
अर्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मृतींना अर्पण !

# लोकनेते : यशवंतराव चव्हाण



923.60954

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
ACC. NO.: G04260
DATE: 6/6/2015

लेखक -अनिल चव्हाण
(एम.ए., बी.एड्.)

# लोकनेते : यशवंतराव चव्हाण

**लेखक : अनिल चव्हाण**
(एम. ए., बी. एड्)

**प्रथम आवृत्ती :**
ऑगस्ट २०१२

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

**प्रकाशिका - सौ. जयश्री अ. चव्हाण**
**भरारी एज्युकेशनल अँण्ड सोशल फौंडेशन**
प्लॉट नं. ५८, 'साईसदन', लक्ष्मीटेक कॉलनी,
सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर - ४१६ ०१२.
मोबा. ९४२३२७१८४४.

**मुखपृष्ठ मांडणी व सजावट -**
श्रुती ग्राफिक्स, कोल्हापूर.

**मुद्रक -**
शिव इंप्रेशन, कोल्हापूर. मो. ९८२२४२००७३

मूल्य - ८०/ - रुपये

अनिल चव्हाण (लेखक)
यांचेकडून सप्रेम भेट
Mob. 8805008686

# लेखक मनोगत



महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला ५२ वर्षे पूर्ण झाली. या प्रदीर्घ कालखंडात महाराष्ट्राने औद्योगिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात प्रचंड मोठी प्रगती केली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती करण्यात यशवंतराव चव्हाणसाहेबांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका विचारात घेऊन त्यांना **'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार'** म्हणून गौरविण्यात येते. विदर्भ, मराठवाडा, मुंबईसह महाराष्ट्र राज्य चव्हाणसाहेबांच्या योगदानातूनच निर्माण झाले.

सन २०१२ या सालात यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षाला प्रारंभ होत आहे. महाराष्ट्र राज्याने 'सहकार वर्ष' म्हणून २०१२ हे साल जाहीर केले. सर्वसामान्य गरीब शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन जिद्द व चिकाटीच्या जोरावर त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा महाराष्ट्रात व देशात उमटविला. विधायक दृष्टिकोन ठेवून तत्त्वनिष्ठ राजकारणाचा आदर्श घालून दिला.

यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या समग्र वाटचालीचा आढावा **'लोकनेते : यशवंतराव चव्हाण'** या पुस्तकातून घेण्यात आला आहे. यासाठी अनेक संदर्भग्रंथ, पुस्तके चाळण्यात आली. यशवंतरावांचे बालपण, शिक्षण, कौटुंबिक जीवन, स्वातंत्र्यलढ्यातील योगदान, राजकीय वाटचाल, विचारसंपदा, महाराष्ट्राच्या जडण-घडणीतील योगदान या सर्व बाबींचा तपशीलवार आढावा या पुस्तकातून घेण्यात आला आहे. इ.स. २०१२ मध्येच

चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दी वर्षात हे पुस्तक प्रकाशित होत आहे. समाजाच्या सर्वच थरातील मंडळीकडून या पुस्तकाचे चांगल्याप्रकारे स्वागत होईल याची खात्री वाटते.

पुस्तकाच्या निर्मितीत अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभले. श्री. गुरुदत्त कन्स्ट्रक्शनचे प्रोप्रायटर श्री. रामचंद्र जी. कुंभार व माझे मावसबंधू श्री. विनोद रा. बागडे (निपाणी) यांचे या पुस्तकाच्या छपाईसाठी बहुमोल आर्थिक सहकार्य लाभले. माझे मित्र रविंद्र मोरे, निवास डोईफोडे, अशोक पाटील, सुधाकर डोणोलीकर, नगरसेवक सुभाष रामूगडे यांचीही वरचेवर बहुमोल साथ मिळत गेली. माझी पत्नी सौ. जयश्री अ. चव्हाण यांनी प्रकाशनाची जबाबदारी चांगल्या रितीने पार पाडली. श्रुती ग्राफिक्सचे राजू सुढाळ यांनी पुस्तकाचे मुखपृष्ठ व अंतरंग आकर्षकरित्या करून दिले. ख्यातनाम विचारवंत व टाईम्स ऑफ इंडियाचे वरिष्ठ पत्रकार डॉ. सुभाष के. देसाई यानी पुस्तकास प्रस्तावना देऊन पुस्तकाचे योग्य परिक्षण केले. शिव इंप्रेशन यांनी पुस्तकाची छपाई उत्कृष्टरित्या, वेळेत करून दिली. अनेक ज्ञात -अज्ञातांच्या प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहकार्यातून हे पुस्तक पूर्ण झाले. या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

अनिल चव्हाण

**अनिल ई. चव्हाण**




# डॉ. सुभाष केशवराव देसाई

M.A., Ph.D.

(ज्येष्ठ साहित्यिक)

वरिष्ठ पत्रकार -टाईम्स ऑफ इंडिया

**ऑफिस** - ११, बी, शिवाजी स्टेडियम, कोल्हापूर - १२.

फोन : ०२३१-२६४१६३५.

E-mail : drsubhashdesai@gmail.com


# प्रस्तावना

ना. यशवंतराव चव्हाणांच्या जन्मशताब्दी वर्षात हे चरित्र लिहिल्याबद्दल लेखकाचे प्रथम अभिनंदन! शिवराम परांजपेंचे निबंध, महात्मा फुलेंचे चरित्र आणि संघर्षमय जीवन यांचा प्रभाव यशवंतराव चव्हाण साहेबांच्यावर होता. शालेय जीवनातही ते उत्तम वक्ते म्हणून गाजले. जीवनाकडे पहाण्याची व्यापक दृष्टी त्यांना सखोल चिंतनातून प्राप्त झाली.

क्रांतीकारकांच्या बलिदानाने ते पेटून उठले. त्यांनी निर्धार केला की, स्वातंत्र्यासाठी आपले सारे जीवन अर्पण करायचा. अवघ्या २० व्या वर्षी पहिला तुरुंगवास भोगला.

सुसंस्कारीत वेणुताईंनी यशवंतरावांचा हात धरून संसाराला सुरुवात केली. पण यशवंतरावांचा एक पाय घरात नि दुसरा तुरुंगात. थोरले बंधूही स्वर्गवासी झाल्याने यशवंतराव पोरके बनले. कोल्हापूरात राजाराम कॉलेजमध्ये प्राचार्य बाळकृष्णांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे शिक्षण झाले. प्रजापरिषदेचे कार्यकर्ते व अनेक साहित्यिकांशी त्यांचा संपर्क आला. हिराबाई बडोदेकरांचे गायन असो वा ना.सि.फडके, माधव ज्युलियन यांचे साहित्य, काव्य या साऱ्यात ते रममाण होत. कोल्हापूरच्या या भूमीतच यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातील वैचारिक परिपक्वता संपन्न झाली. त्यामुळे या भूमीतील एक शिक्षक, लेखक अनिल चव्हाण यांनी त्यांच्या चरित्राचा अभ्यास करावा ही अतिशय आनंद आणि अभिमानाची गोष्ट आहे.

दिल्लीला रेसकोर्सवरील यशवंतरावांच्या बंगल्यात श्रीदत्ताबाळ यांच्या बरोबर मी सकाळी चहाला गेलो होतो. प्राचार्य एम.आर. देसाई या आपल्या मित्राचा दत्ताबाळ हा मुलगा भेटावयास आला म्हणून त्यांना खूप आनंद झाला. या वेळच्या चर्चेत यशवंतरावांच्यावर असणारा मानवेंद्रनाथ रॉय यांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवला. एखाद्याचे म्हणणे शांतपणे कसे ऐकून घ्यायचे हे शिकावे ते यशवंतरावांच्याकडूनच.

पुन्हा काही वर्षे गेली. दै. लोकसत्तेचा मी जिल्हा प्रतिनिधी म्हणून काम करत होतो. साहेबांचा फोन आला 'भेटायला येता का?' मी त्यांना भेटायला गेलो. रत्नागिरीतून ते काही वेळासाठी कोल्हापूरात आले होते. भेटीत त्यांनी सांगितले, कोल्हापूरचे व माझे ऋणानुबंध तुम्ही जाणताच. मी दिल्लीत असलो तरी तुमची लोकसत्तेतील 'कोल्हापूरच्या ज्वलंत समस्या' ही लेखमाला नियमित वाचतो. यानंतर कोल्हापूरातील बाहुबलीच्या प्रश्नी मी 'धर्मक्षेत्राची कुरुक्षेत्रे का करता?' या शीर्षकाखाली लोकसत्तेत लिहिलेल्या लेखांचा उल्लेख त्यांनी केला व त्यावर आपले मत व्यक्त केले. पण जाता जाता आपली भेट 'ऑफ दि रेकॉर्ड ठेवा' अशी सूचनाही द्यायला ते विसरले नाहीत.

यशवंतरावांचा वाढदिवस १२ मार्च रोजी तर महाराष्ट्राचे पोलादी पुरूष बाळासाहेब देसाईंचा १० मार्चला. दुर्दैवाने या दोघात निर्माण झालेली संघर्षाची दरी शेवटपर्यंत मिटली नाही याची मला खंत वाटते. हे दोन्ही नेते एकत्र राहिले असते तर महाराष्ट्राचे चित्र पालटले असते. दिल्ली दरबारातही यशवंतरावांना अखेरच्या काळात अवहेलनाच सहन करावी लागली.

यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या प्रारंभी अनिल चव्हाण यांनी छोटेखानी पण माहितीपूर्ण चरित्र लिहून एका मराठी सरसेनापतीला आदरांजली अर्पण केली आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी केलेल्या थोर कार्याचा परिचय नव्या पिढीला करून देण्याची गरजच होती. ती या पुस्तकाने अल्पांशाने का होईना पूर्ण झाली आहे. संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री अशी उच्चपदे नेहरू घराण्याने मराठी माणसावर सोपवलेली होती व आहेत हे महाराष्ट्राला विसरता येणार नाही. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे बोलके आत्मचरित्र, तर शरद पवार त्यांचे राजकीय वारसदार.

आचार्य अत्रेंच्या 'मराठा' त आणि नरूभाऊ लिमयेंच्या 'गतीमान' मध्ये मी लिहित होतो. या दोघांच्याकडून व अच्युतराव पटवर्धनांकडून यशवंतराव चव्हाणांच्या कार्य कर्तृत्वाचा आदर व्यक्त होताना मी ऐकला आहे. अशा या सह्याद्रिसारख्या कणखर व्यक्तिमत्त्वाची ही चरित्रगाथा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, साहित्य क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना प्रेरणादायी ठरेल यात शंकाच नाही. अनिल चव्हाण यांनी महात्मा फुले, यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे अनेक पुरोगामी चरित्रग्रंथ यापुढेही लिहावेत हीच त्यांच्याकडून अपेक्षा !

सुभाष के देसाई

**डॉ. सुभाष के. देसाई**

# अनुक्रमणिका


| अ. नं. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | जन्म | ९ |
| २. | बालपण व शिक्षण | ११ |
| ३. | स्वातंत्र्यलढ्यात सहभाग व तुरुंगवास | १६ |
| ४. | महाविद्यालयीन जीवन | १९ |
| ५. | महाराष्ट्राची निर्मिती व वाटचाल | २३ |
| ६. | परदेश दौरे | २८ |
| ७. | राजकीय वाटचाल | ३१ |
| ८. | संस्मरणीय क्षण | ४५ |
| ९. | चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व | ५९ |
| १०. | अखंड विचारांचा झरा | ६७ |
| ११. | यशवंतराव : एक प्रेरणास्त्रोत | ८० |
| १२. | अखेरचा प्रवास | ९२ |
| १३. | जीवनपट | ९७ |
| १४. | संदर्भ पुस्तके | १०१ |

# बहुमोल सहकार्य !

माझे जिवलग मित्र

श्री गुरुदत्त कन्स्ट्रक्शनचे प्रोप्रायटर

**श्री. रामचंद्र जी. कुंभार**

(इंजिनिअर्स अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोल्हापूर)

आणि

माझे मावसबंधू

**श्री. विनोद रा. बागडे**

(शिवाजीनगर, निपाणी)

यांच्या बहुमोल आर्थिक सहकार्यातून या पुस्तकाची छपाई झाली. त्यांच्या या बहुमोल सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार !

# १. जन्म

महाराष्ट्राच्या मराठमोळ्या मातीत अनेक दिग्गज थोर पुरुष होऊन गेले. ज्यांनी देशाला राजकीय, सामाजिक क्षेत्रात खूप मोठे योगदान दिले. स्वातंत्र्य चळवळीत मोठा लढा उभारून स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे क्रांतिकारक, नेते यांचा वारसा लाभलेली अशी ही महाराष्ट्र भूमी. सातारा जिल्ह्यामध्ये प्रतीसरकारची स्थापना करून ब्रिटिश सत्तेला मोठा हादरा देण्याचे काम क्रांतीसिंह नाना पाटलांनी केले. याच सातारा जिल्ह्यामध्ये आपल्या आजोळी **देवराष्ट्रे** येथे १२ मार्च १९१३ रोजी यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांचा जन्म झाला. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर देवराष्ट्रे हे गाव सांगली जिल्ह्यामध्ये समाविष्ट करण्यात आले. या गावाला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. सातवाहनांच्या काळात देवराष्ट्रे हे एक छोटेसे राज्य होते, असे मानले जाते. या गावात अनेक प्राचीन मंदिरे असून दह्यारी, तुपारी, ताकारी, लोणारी, यासारखी स्निग्ध सात्त्विक नावाची गावे आजुबाजुला आहेत. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन परिश्रम व लढाऊबाणा या गुणांच्या आधारे देशाच्या '**उपपंतप्रधान**' पदापर्यंत मजल मारण्याचे दिव्य काम यशवंतरावांनी केले. स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, देशप्रेमाने भारावलेले वातावरण, महात्मा गांधी, पंडित नेहरू आदी नेत्यांकडून घेतलेली प्रेरणा या जोरावर यशवंतरावांनी आपल्या जीवनाला आकार दिला. पुढील काळात राजकीय व सरकारी कामानिमित्त यशवंतरावांचा देशांतर्गत व सर्व जगात खूप प्रवास झाला, पण कृष्णाखोऱ्याची त्यांच्या मनातील ओढ मात्र कायमच राहिली. आपल्या आत्मचरित्रात त्यांनी तसे नमूद करून ठेवलेही आहे.

# यशवंतराव चव्हाण

## (वंशवृक्ष)

**मुळगांव :** ढवळेश्वर (ता.खानापूर, जि.सांगली)
**जन्मगाव :** देवराष्ट्रे, जि.सांगली (आजोळी)

- हिरोजी (मूळपुरुष)
  - बाळोजी
    - राणोजी (पणजोबा)
      - वाघोजी (आजोबा)
        - रामचंद्र (थोरले चुलते)
        - बळवंतराव(वडील)
          - ज्ञानदेव (थोरले भाऊ)
          - गणपतराव (मधले भाऊ)
          - **यशवंतराव - पत्नी वेणूताई**
            - (अपत्य नाही)

# २. बालपण व शिक्षण

यशवंतरावांच्या पूर्वजांचे मूळगांव खानापूर तालुक्यातील ढवळेश्वर हे होते. गावातील एका व्यक्तिला सावकराकडून कर्ज हवे होते. या कर्जासाठी चव्हाण कुटुंबातील एक पूर्वज जामीन झाला. कर्जदाराने कर्ज न भागविल्याने सावकाराने जामीनदाराचा जमीन-जुमला ताब्यात घेतला. जमीन गेल्याने निराधार झालेल्या चव्हाण कुटुंबाने ढवळेश्वर सोडले व उदरनिर्वाहासाठी विट्याला येऊन स्थायिक झाले. हा प्रसंग यशवंतरावांच्या पणजोबांच्या अगोदरचा आहे. यशवंतरावांच्या आजोबांना दोन मुलगे. यापैकी थोरले रामचंद्र व धाकटे बळवंतराव. रामचंद्र चार पुस्तके शिकल्यामुळे त्यांना 'बेलिफ' म्हणून सरकारी नोकरी मिळाली. पुढे काही वर्षांनी शेतीवर भागत नसल्याने त्यांनी आपले लहान बंधू म्हणजेच यशवंतरावांचे वडील बळवंतराव यांनाही बेलिफाची नोकरी मिळवून दिली. नोकरीनिमित्त यशवंतरावांच्या वडिलांनी विटे, दहिवडी, कराड या ठिकाणी जावे लागले. यशवंतरावांचा जन्म झाला त्यावेळी वडील कराड येथे नोकरीस होते. त्यांनी कराड येथे बरीच वर्षे नोकरी केल्यामुळे चव्हाण कुटुंब कराडला कायमचेच स्थायिक झाले. महाबळेश्वरमध्ये उगम पावून व कराडच्या उत्तरेकडून वहात येणारी कृष्णा व दक्षिणेकडून वहात येणारी कोयना या दोन बहिणींचा संगम कराड येथे होतो. पुढे त्यांचा एकच प्रवाह बनून तो पूर्वेकडे वहात जातो.

कराडला प्लेगची साथ आल्याने यशवंतरावांच्या वडिलांनी आपल्या पत्नीला व मुलाबाळांना आपल्या सासूरवाडीला 'देवराष्ट्रे' येथे पाठविले. देवराष्ट्रे येथील आजोळच्या लहानशा घरात ही सर्व मंडळी राहू शकणार नाहीत म्हणून यशवंतरावांच्या मामाने गावातीलच महिंदवाड्याच्या शेजारी असणाऱ्या एका वाड्यात त्यांची राहण्याची व्यवस्था केली. मामाच्या घरापासून हे घर जवळच असल्याने यशवंतराव व त्यांच्या अन्य दोन भावडांचे दिवसभराचे वास्तव्य मामाच्या घरीच असायचे. यशवंतरावाचे वय त्यावेळी अवघे चार वर्षाचे होते. दुपारच्या वेळी मामाच्या दारासमोर यशवंतराव खेळत

असताना त्यांना समोरून येत असणारे त्यांचे वडील दिसले. वडिलांच्या दर्शनाने सुखावलेल्या यशवंतरावांनी अत्यानंदाने त्यांना मिठी मारली. प्लेगच्या साथीत सापडलेले बळवंतराव आपल्या मुलाला कडेवर घेऊ शकले नाहीत. ते फक्त उद्‌गारले,

"बाळ, आपण घरी जाऊ या. मला बरं नाही."

वडिलांच्या बोटाला धरून यशवंतराव घरी आले. आईशी वडिलांचे बोलणे झाले व ते अंथरूणावर कलंडले. आई दु:ख करू लागली. गावातील लोकांची ये-जा सुरू झाली. ते अंथरूण बळवंतरावांचे शेवटचेच ठरले. एक-दोन दिवसातच वडिलांची प्रकृती खालावली. शेवटच्या क्षणी यशवंतराव व त्यांच्या भावंडांना घरासमोर असलेल्या तुळशीच्या एका कट्ट्यावर घोंगडे टाकून बसविण्यात आले होते. थोड्या वेळातच घरातून आईचा हंबरडा ऐकू आला. त्या आवाजाने कावरीबावरी झालेली मुले घराच्या दिशेने धावली. काही जाणकार मंडळींनी या मुलांना रोखले व सांगितले,

"बाबांनो, येथेच थांबा. घरात जाऊ नका."

वयाच्या अवघ्या चौथ्या वर्षी यशवंतरावांवरील पितृछत्र हरपले. यशवंतरावांना या वयात वडिलांच्या चेहऱ्याची नीट ओळखही झाली नव्हती. या काळात या मुलांना आजी व मामाचा आधार मिळाला.

थोड्याच दिवसात चव्हाण परिवार कराडला आपल्या भाड्याच्या घरी येऊन स्थायिक झाला. उदरनिर्वाह कसा करायचा हा मोठा प्रश्न होता. थोरले बंधू ज्ञानदेव हे सतरा-अठरा वर्षाचे होते. वडिलांच्या जागेवर त्यांना बेलिफाची नोकरी मिळावी यासाठी वडिलांच्याच काही बेलिफ मित्रांनी प्रयत्न केले. याकामी कराडच्या मुन्सफांनी शिफारस केली. हे शिफारस पत्र घेऊन आई तीन मुलांना सोबत घेऊन सातारला जिल्हा न्यायाधिशाकडे आली. कराड ते कोरेगाव रेल्वे प्रवास करून तेथून पुढे अकरा मैलाचा प्रवास त्यांनी बैलगाडीने केला. सातारच्या राजवाड्यात न्यायाधीशाचे कोर्ट होते. बराच वेळ बाहेर थांबल्यानंतर या सर्वांना आत बोलावणे झाले. इंग्रज न्यायाधिशाने सहानुभूती दाखवून यशवंतरावांच्या थोरल्या बंधूंना वडिलांच्या जागेवर 'बेलिफ' म्हणून

घेण्याचा आदेश काढला. आईच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. एक-दोन आठवड्यातच ज्ञानदेवाची बेलिफ म्हणून नेमणूक झाली. वडिलांच्या मृत्यूनंतर निराधार झालेल्या चव्हाण कुटुंबाला आधार मिळाला. यशवंतरावांच्या पुढील शिक्षणाला त्यामुळे फार मोठा हातभार लागला.

यशवंतरावांचे शिक्षण कराडमध्ये सुरू असताना प्रत्येक वर्षी दिवाळी व उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोळी देवराष्ट्रेला जाण्याची प्रथा मात्र सुरूच होती. आजोळच्या घराच्या आजुबाजुला रामोशी, धनगर समाजाची वस्ती होती. त्यांच्या मुलांशी खेळण्यात यशवंतरावांचे बालपण गेले. या समाजाची दुःखे, गरिबीचा संसार, दगडावर दगड रचून बांधलेली कमी उंचीची घरे याच्याशी यशवंतरावांचा संबंध आला. आजोळची गरिबी व त्याकाळातील सर्वसामान्य माणसांची जीवनपद्धती जवळून न्याहाळायला यशवंतरावांना मिळाल्याने त्यांना त्याचा पुढच्या जीवनात खूपच उपयोग झाला.

कृष्णेच्या पाण्यात पोहण्याचा छंद बालपणापासूनच लागलेल्या यशवंतरावांच्या जीवनातील एक प्रसंग अत्यंत महत्त्वाचा आहे. देवराष्ट्रे गावाच्या बाजूने एक ओढा वाहत जातो. या ओढ्याचे नाव सोनहिरा. ओढ्याच्या काठावर रामोश्यांच्या मुलांबरोबर एकदा यशवंतराव गेले होते. पावसाळ्याचे दिवस होते. दुपारची वेळ होती. ओढ्याला अचानक पाणी वाढले. कृष्णा आरपार करण्यात तरबेज असणाऱ्या यशवंतरावांना ओढ्याच्या प्रवाहाबद्दल विशेष काही वाटले नाही. त्यांनी ओढा पार करण्यासाठी उडी टाकली. मध्यापर्यंत गेल्यावर ओढ्याच्या वेगवान प्रवाहातून त्यांना पलिकडे जाता येईना. आपण आता बुडणार याची जाणीव होताच त्यांनी मदतीसाठी ओरडायला सुरूवात केली. प्रसंगावधान ओळखून सोबतच्या दोन-तीन मुलांनी ओढ्यात उड्या टाकल्या. यशवंतरावांना ओढ्याच्या काठावर आणण्यात आले. जणू यशवंतरावांचा तो पुनर्जन्मच होता. यशवंतराव आयुष्यात हा प्रसंग कधीच विसरू शकले नाहीत. नंतर मात्र कृष्णेच्या पाण्यात सुट्टीमध्ये दररोज दीड-दोन तास पोहण्याचा सराव त्यांनी केला. या व्यायामाचा त्यांना पुढे पुष्कळच उपयोग झाला.

आपल्या नावाची हकिगत त्यांना आपल्या आजीकडून समजली.

यशवंतरावांच्या जन्मावेळी त्यांची आई विठाई खूप आजारी होती. त्या काळात दवापाण्याची सोय नव्हती. घरगुती औषधाने गुण न आल्याने आजीने ग्रामदैवत सागरोबाला साकडे घातले, "अक्काला (यशवंतरावांची आई) वाचविण्यास माझ्या हाताला यश दे, तुझी आठवण म्हणून मुलाचं नाव यशवंत ठेवतो." सुदैवाने आई वाचली. मुलाचे नांव **यशवंत** ठेवण्यात आले, हा होता यशवंतरावांच्या नावाचा इतिहास.

मोठ्या बंधुंची बदली विट्याला झाल्याने ते तिकडे स्थायिक झाले. आई मात्र दोन मुलांना घेऊन कराडमध्येच राहिली. शिक्षणाचे मोल जाणून तिने मुलांना शिक्षण दिले. इयत्ता सातवीत शिकत असताना यशवंतरावांना वृत्तपत्र वाचनाची सवय जडली. 'विजयी मराठा', 'राष्ट्रवीर' या ब्राह्मणेत्तर चळवळीचा पुरस्कार करणाऱ्या वृत्तपत्रांचे ते वाचन करीत. आपले वाचन एकांगी राहू नये म्हणून ते मजूर, श्रद्धानंद, नवाकाळ, ज्ञानप्रकाश ही वृत्तपत्रेही वाचू लागले. देशात घडणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीतील आंदोलनाच्या बातम्या वाचून राष्ट्रभक्तीने त्यांचे मन प्रेरीत होत असे. मराठी सातवी इयत्ता पास झाल्यावर कराडमधील टिळक हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. याकाळात हरिभाऊ आपटेंच्या कादंबऱ्यांचे त्यांनी वाचन केले. शिवराम महादेव परांजपेंचे 'काळ' मधील निबंध, केळूसकरांनी लिहिलेले 'छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र', वऱ्हाड प्रांतातील पंढरीनाथ सिताराम पाटील यांनी लिहिलेले 'महात्मा जोतीराव फुलेंचे चरित्र' या पुस्तकांचे वाचन यशवंतरावांनी या काळात केले. वाचनामुळे त्यांची दृष्टी चौफेर बनली. आपले मधले बंधू गणपतरावांशी ते विविध विषयावर चर्चा करू लागले. जोतीराव फुलेंच्या संघर्षमय जीवनाचा आदर्श गणपतरावांनी घेतला होता. ते यशवंतरावांना याबद्दल मार्गदर्शन करत असत. यशवंतरावांच्या शिक्षणासाठी यांनी स्वतःच्या शिक्षणाचा त्याग केला व ते पोटापाण्याचा व्यवसाय करू लागले.

१९३१ मध्ये पुण्याच्या नुतन मराठी विद्यालयात वक्तृत्त्व स्पर्धेनिमित्त जाण्याचा प्रसंग यशवंतरावांवर आला. शिवाजीराव बटाणे या मित्रामुळे यशवंतरावांचा पुण्याला जाण्या-येण्याचा प्रश्न मिटला. या स्पर्धेत

आयत्यावेळी विषय देऊन बोलायला सांगत. 'ग्रामसुधारणा' या विषयावर प्रभावीपणे बोलल्यामुळे यशवंतरावांना पारितोषिक मिळाले. त्यांच्या शालेय जीवनातील वक्तृत्व स्पर्धेतील ते पाहिलेच यश होते.

शालेय जीवनात गणेशोत्सवातील नाटके पाहणे, तमाशे पाहणे आदी छंदही यशवंतरावांनी जोपासले. केशवराव दाते यांच्या 'प्रेमसंन्यास' नाटकाचा प्रयोग कोल्हापूरात होणार होता. 'नवाकाळ' मध्ये त्याची जाहिरात यशवंतरावांनी वाचली. आपले शिक्षक मित्र माधवराव घाटगे यांच्याबरोबर कोल्हापूरला जाऊन त्यांनी हे नाटक पाहिले. त्यावेळी हे नाटक 'पॅलेस थिएटर' मध्ये झाले होते. नाटक पाहून रात्रीचा मुक्काम कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनवर थंडीने कुडकुडत काढला. दुसऱ्या दिवशी सकाळच्या रेल्वेने कराड गाठले. असे एक ना अनेक प्रसंगांनी यशवंतरावांचे शालेय जीवन भरून गेले होते. प्रत्येक प्रसंगातून त्यांना जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाली.

आई बद्दलच्या आठवणी सांगताना यशवंतराव म्हणतात, "आईने आम्हा भावंडांना मन मोठे करायला शिकविले. परिस्थितीने गांगरून जायचे नाही हा जीवनातील पहिला धडा मी आईकडून शिकलो."



**कवि ना. धो. महानोर व अन्य कविंसोबत यशवंतरावांची रंगलेली कवितांची मैफल**

# ३. स्वातंत्र्यलढ्यात सहभाग व तुरूंगवास

कराडमधील केंद्र शाळेतून व्हर्नाक्यूलर फायनल परीक्षा पास झाल्यानंतर १९२७ मध्ये यशवंतरावांनी कराडच्याच 'टिळक हायस्कूल'मध्ये प्रवेश घेतला. माध्यमिक शिक्षण सुरू असतानाच देशभर क्रांतीचा वणवा भडकलेला होता. क्रांतीकारकांच्या विचारांचा मोठा प्रभाव या दरम्यान यशवंतरावांवर होता. वृत्तपत्रातील बातम्या वाचून राष्ट्रीय नेत्यांची चरित्रे वाचून यशवंतरावांचे मन देशप्रेमाने भारावून गेले होते. यतिंद्रदासांनी तुरूंगात केलेल्या आत्मबलिदानाने त्यांचे मन पेटून उठले. इ.स. १९२९ मध्ये भगतसिंग व त्यांच्या साथीदारांनी असेंब्लीत बॉम्ब फेकला. या घटनेनंतर ब्रिटिश सरकारने भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना पकडून फाशी दिले. 'इन्कलाब झिंदाबाद'च्या घोषणा देत हसत हसत फासावर जाणाऱ्या भगतसिंगाच्या कृतीतून प्रेरणा घेऊन यशवंतरावांनी निर्धार केला, 'येथून पुढचे संपूर्ण आयुष्य स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण करावयाचे.' यानंतर त्यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही.

इ.स. १९३०-३१ हा काळ संपूर्ण देशभर असहकार आंदोलनाने व्यापला होता. मिठावरील अन्यायकारक कराला विरोध करण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली देशाच्या कानाकोपऱ्यात कायदेभंग चळवळ सुरू होती. विद्यार्थी वर्गही यामध्ये कोठे कमी नव्हता. यशवंतरावांनी आपल्या विद्यार्थी दशेतच असहकार चळवळीत उडी घेतली. १९३२-३३ मध्ये त्यांना १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी भोगावा लागलेला यशवंतरावांच्या जीवनातील तो पहिलाच तुरूंगवास होता. यानंतर आंदोलने, चळवळी, भाषणे याने यशवंतरावांचे जीवन व्यापून गेले. प्रचंड वाचन, प्रभावी वक्तृत्व हे गुण याकाळात यशवंतरावांनी आत्मसात केले.

यशवंतरावांच्या जीवनात त्यांची पत्नी वेणूताईंचे योगदान खूपच मोठे मानावे लागले. २ जून १९४२ ला कराड येथे यशवंतराव वेणूताईंशी विवाहबद्ध झाले. वेणूताईंचे माहेर फलटण (जि.सातारा) येथील मोरे कुटुंबातील. सुसंस्कृत शेतकरी कुटुंबात संस्काराचे धडे वेणूताईंवर

बालपणापासूनच झाले होते. नम्रता, शालीनता व गुणग्राहकता या गुणांचा अंतर्भाव वेणूताईंच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. यशवंतरावाच्या झंजावाती वादळी जीवनाला साथ देण्याचे दिव्यकार्य वेणूताईंनी आयुष्यभर पार पाडले.



**सौ. वेणूताई समवेत यशवंतराव**

विवाहानंतर अवघ्या दोनच महिन्यात संपूर्ण देशभर 'चले जाव' आंदोलन भडकले होते. ९ ऑगस्ट १९४२ रोजी महात्मा गांधींनी मुंबईच्या 'गवालिया टँक' (आझाद मैदान) मैदानावरून देशवासियांना 'करा किंवा मरा' असा संदेश दिला. यशवंतरावांनी 'चले जाव' आंदोलनात सातारा जिल्ह्याचे नेतृत्त्व केले. प्रमुख राष्ट्रीय नेत्यांना अटक झाल्यावर यशवंतरावांनी भूमिगत राहून या लढ्याचे नेतृत्त्व केले. या लढ्यातील सहभागाबद्दल यशवंतरावांना तुरूंगात जावे लागले. यशवंतरावांचा एक पाय घरात तर दुसरा पाय तुरूंगात असायचा. या काळात पत्नी वेणूताईंनी कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. यशवंतराव भूमीगत असताना पत्नी वेणूताई खूप आजारी असल्याची बातमी त्यांना समजली. नुकतेच लग्न झालेले असताना आपण

पत्नीकडे लक्ष देऊ शकलो नाही, याबद्दल अपराधीपणाची भावना यशवंतरावांच्या मनाला बोचू लागली. काही झाले तरी पत्नी वेणूताईंना भेटायचेच असा निर्धार यशवंतरावांनी केला. आपल्या अन्य सहकाऱ्यांशी चर्चा करून यशवंतराव रात्री फलटणला जायला निघाले. मध्यरात्री फलटणला पोहचून, पत्नी वेणूताईंची विचारपूस करून पहाटे साडेचारला फलटण सोडायचे असा बेत आखण्यात आला. गाडीला अचानक खोळंबा झाल्याने फलटणला पोहचायला पहाटेचे साडेचार वाजले. तोपर्यंत यशवंतराव आल्याची बातमी पोलिसांना लागली. दुपारी वाड्याला पोलिसांचा वेढा पडला. यशवंतरावांना कैद करून त्यांची तुरूंगात रवानगी झाली.

१९४३ मध्ये थोरले बंधू ज्ञानदेव यांचे निधन झाले. बालपणात वडिलांच्या मृत्युनंतर यशवंतरावांना आधार देण्याचे काम मोठ्या बंधूंनी केले होते. त्यांच्या निधनाने यशवंतरावांचा मोठा आधार हरपला. प्राप्त परिस्थितीचा स्विकार करून येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याचे धैर्य यशवंतरावांनी बाळगले. देशाचे स्वातंत्र्य हे यशवंतरावांचे त्याकाळात प्रमुख उद्दिष्ट होते.

'राजकीय क्रांती' या विषयावर कविता-लिहिल्याबद्दल यशवंतरावांना तुरूंगवास भोगावा लागल्या. १९४५ मध्ये त्यांची तुरूंगातून सुटका झाली. अशा रितीने यशवंतरावांच्या तुरूंगातील फेऱ्या सतत सुरूच होत्या.



**महाविद्यालयीन जीवनातील यशवंतराव (१९३४)**

# ४. महाविद्यालयीन जीवन

१९३१ मध्ये यशवंतराव मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. यानंतर पुढे उच्च शिक्षण घेण्याची त्यांची खूप इच्छा होती. घरच्या आर्थिक अडचणींमुळे त्यांची प्रारंभीची तीन वर्षे वाया गेली. त्यांचे एक जवळचे मित्र गौरीहर सिंहासने यांनी केलेल्या अर्थिक सहकार्यामुळे यशवंतराव उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला आले. जून १९३४ मध्ये त्यांनी जुन्या राजवाड्याशेजारी असणाऱ्या राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. शहराचे मध्यवर्ती ठिकाण, उत्तम शिक्षकवर्ग, समृद्ध लायब्ररी, प्रशस्त व भव्य इमारत यामुळे यशवंतराव राजाराम कॉलेजमध्ये चांगलेच रूळले. डॉक्टर बाळकृष्ण हे कॉलेजचे प्राचार्य होते. इतिहास विषयाचे अभ्यासक, पल्लेदार वक्तृत्त्व, राष्ट्रीय वृत्ती हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रमुख गुण होते. प्राचार्यांना खास भेटण्यासाठी एक दिवस यशवंतराव त्यांच्या निवासस्थानी गेले. आपला पूर्वइतिहास त्यांच्यासमारे कथन केला. डॉ.बाळकृष्ण म्हणाले,

"लक्षात ठेव. हे संस्थानी राज्य आहे. मी पंजाबहून येथे आलेलो आहे. तू जोपर्यंत शैक्षणिक कामात प्रगती करत राहशील, तोपर्यंत माझा तुला पाठिंबा राहील, पण कृपा करून कोल्हापूर संस्थानच्या राजकारणात भाग घेऊ नकोस."

प्राचार्यांच्या सूचनेप्रमाणे यशवंतरावांनी अभ्यासात प्रगती केली. प्राचार्यांशी त्यांचा चांगला स्नेहसंबंध प्रस्थापित झाला. कोल्हापूरात असताना प्रजापरिषदेच्या कार्यकर्त्यांशी यशवंतरावांचा संबंध येऊ लागला. त्या काळात राजाराम कॉलेजमध्ये यशवंतरावांना डॉक्टर उपाध्ये, ख्यातनाम कादंबरीकार ना.सी.फडके, प्रा.माधवराव पटवर्धन (कवी माधव ज्युलियन), डॉ.बोस या प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. १९३४ ते १९३८ दरम्यान चार वर्षाच्या कोल्हापूरच्या वास्तव्यात त्यांनी शिवाजी पेठ, भुसारी वाडा व अन्य ठिकाणी स्वतंत्र खोली घेऊन शिक्षण पूर्ण केले.

प्रा.डॉक्टर उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंतराव अर्धमागधी शिकले. थोर साहित्यिक ना.सी.फडके यांच्याकडून तर्कशास्त्र हा विषय

यशवंतराव शिकले. त्या काळात प्रा.फडकेंच्या 'जादूगार' आणि 'दौलत' या कादंबऱ्या यशवंतरावांनी वाचल्या होत्या. खुद्द लेखकच आपल्याला शिकवायला असल्याने यशवंतराव त्यांचा तास कधीच चुकवत नसत. विषय सोपा करून मनोरंजकपणे शिकविण्याची वेगळी हातोटी त्यांच्याकडे होती. त्यामुळे मराठी, इतिहास या विषयांबरोबरच तर्कशास्त्र हा विषय यशवंतरावांच्या आवडीचा बनला. प्रा.फडकेंच्या कोल्हापूरात होणाऱ्या अन्य व्याख्यानांनाही यशवंतराव आवर्जून उपस्थिती लावत. प्रा.फडक्यांनी कॉलेजमध्ये स्थापन केलेल्या संगीत मंडळाचे यशवंतराव सभासद झाले. त्यावेळी कॉलेजच्या वरच्या मजल्यावरील हॉलमध्ये झालेल्या प्रसिद्ध गायिका हिराबाई बडोदेकर यांच्या संगीत मैफलीच्या आठवणी त्यांच्या स्मरणात चिरंतन कोरल्या गेल्या. प्रा.ना.सी.फडकेंमुळे यशवंतरावांच्यात साहित्याची अभिरूची निर्माण झाली. यातूनच त्यांच्या साहित्यिक मनाचा विकास झाला. पुढील काळात त्यांच्या हातून निर्माण झालेल्या साहित्यसंपदेचा पाया महाविद्यालयीन जीवनातच रचला गेला.

प्रा. माधवराव पटवर्धन उर्फ कवी माधव ज्युलियन यांनी यशवंतरावांना इंग्रजी कविता शिकविल्या. आपल्या विषयात तज्ज्ञ म्हणून त्यांची वेगळी ओळख होती. वक्तशीर असणाऱ्या प्रा.पटवर्धनांची विद्यार्थ्यांशी मात्र फारशी जवळीकता नव्हती. परिणामी यशवंतराव त्यांच्या फारसे जवळ जाऊ शकले नाहीत. बी.ए.च्या वर्गात असताना डॉ.बोस या इंग्रजीवर प्रभुत्व असणाऱ्या प्राध्यापकाकडून यशवंतराव इंग्रजी कविता शिकले. हायस्कूलमधील जीवनांत श्री.दत्तोपंत पाठक व कॉलेजमध्ये प्रा.डॉ.बोस हे दोनच इंग्रजीचे शिक्षक यशवंतरावांना खूप भावले. त्यांच्या इंग्रजी शिकविण्याच्या कौशल्यामुळे तो विषयही यशवंतरावांना आवडीचा वाटू लागला. भविष्यकाळात यशवंतराव देशाचे संरक्षणमंत्री असताना आपले गुरू प्रा.डॉ.बोस दिल्लीमध्येच वास्तव्यास आहेत याची माहिती यशवंतरावांना मिळाली. डॉ. बोस यांच्याशी फोनवरून यशवंतराव बोलले, ''मी तुमचा राजाराम कॉलेजचा विद्यार्थी आहे. तुम्ही माझ्याकडे चहाला याल का?''

प्रा.डॉ.बोसनी निमंत्रण स्विकारले व दिल्ली युनिव्हर्सिटीमध्ये प्राध्यापक असणाऱ्या आपल्या मुलग्याला घेऊन ते यशवंतरावांच्या निवासस्थानी आले. सुमारे तासभर चाललेल्या संवादातून कोल्हापूरातील कॉलेज जीवनाला उजाळा मिळाला. एक थोर गुरू व तितकाच महान शिष्य यांच्यातील हा संवाद म्हणजे सुवर्णक्षणच मानावा लागेल.

या काळात यशवंतरावांचे वाचन अखंडितपणे सुरूच होते. राजकारण, इतिहास, वाङ्मय या विषयांतील निवडक पुस्तकांचे वाचन सुरू होते. कॉलेजच्या लायब्ररीत वाचनामध्ये ते तासनतास गढून जात. इतिहासविषयक अनेक पुस्तकांचे वाचन त्यांनी याकाळात केले. प्रांत, भाषा याच्या पलिकडे जाऊन देश व जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी त्यांना वाचनामुळे लाभली. त्यांच्यात समाजवादी विचारांची रूजवणूक झाली. थोर इंग्रजी साहित्यिक एच.जी.वेल्स यांच्या 'आऊटलाईन ऑफ हिस्टरी' (Outline of History) या ग्रंथाच्या वाचनाने मानव जातीच्या विकासाची नवी दृष्टी त्यांच्यामध्ये आली.

जॉर्ज बर्नार्ड शॉं ची इंग्रजी नाटके, फ्रेंच लेखक व्हिक्टर ह्यूगो यांच्या 'लॉ मिझराब्ल' व अन्य कांदबऱ्या आदींचे वाचन केल्याने त्यांची दृष्टी व्यापक बनली. म.गांधींचे 'हरिजन' हे इंग्रजी साप्ताहिक यशवंतराव आवर्जून वाचत. या साप्ताहिकातील गांधीजींचे साध्या, सरळ भाषेतील विचार यशवंतरावांना प्रेरक ठरले.

यशवंतरावांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैचारिक जडणघडणीत मोठे योगदान कोल्हापूरातील महाविद्यालयीन कालावधीत झाले. भविष्यात त्यांच्या हातून निर्माण झालेल्या विपुल साहित्यसंपदेची बिजे या महाविद्यालयीन जीवनातच पहावयास मिळतात. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातील वैचारिक परिपक्वतेच्या दृष्टीने या काळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

थोर साम्यवादी नेते मानवेंद्रनाथ रॉय, एस्.एम्.जोशी, श्रीपाद अमृत डांगे यांच्या विचारांचा मोठा प्रभाव याकाळात यशवंतरावांवर होता. १९३५ मध्ये महाराष्ट्रात स्थापन झालेल्या समाजवादी पक्षामध्ये यशवंतरावांनी

पुढाकार घेतला. महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकीच एक म्हणून यशवंतरावांचा समावेश होतो.

कॉलेज शिक्षण व स्वातंत्र्यचळवळीतील सहभाग या दोन्हीही क्षेत्रात यशवंतराव आघाडीवर राहिले. 'इतिहास' व 'राजकारण' या त्यांच्या आवडीच्या विषयातून त्यांनी १९३८ मध्ये मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची पदवी प्राप्त केली. शिक्षण केवळ एवढ्यावरच न थांबविता त्यांनी पुणे येथे लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्यांची ज्ञानाची भूक थांबण्यासारखी नव्हती. एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व म्हणूनच त्यांनी आपल्या जीवनाची जडण-घडण केली. एल.एल.बी.ची पदवी चांगल्या गुणांनी प्राप्त करून त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. शिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी करावयाचा हा त्यांचा ध्यास होता. वक्तृत्त्वावरील प्रभाव, निर्णयक्षमता, लोकसंग्रह या गुणांचा त्यांना वकिलीच्या व्यवसायात खूपच उपयोग झाला.



**द्विभाषिक मुंबई राज्याच्या मुख्यमंत्रीपदी शपथविधीनंतर राज्यपाल एम. सी. छागला यांच्याशी हस्तांदोलन करताना यशवंतराव (१९५६)**

# ५. महाराष्ट्राची निर्मिती व वाटचाल

१९५४ साली मुंबई राज्यात पंचायत संघाची स्थापना झाली. या दरम्यान राज्य पुनर्रचना समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने मुंबई राज्यांची विभागणी करून विदर्भासाठी स्वतंत्र राज्य करून उर्वरित प्रदेशात मराठी व गुजराती भाषिकाचे संयुक्त राज्य स्थापन करण्यात यावे अशी शिफारस केली. मुंबई, विदर्भ, मराठवाड्यासह 'संयुक्त महाराष्ट्र राज्य' असावे या मागणीसाठी संपूर्ण राज्यभर आंदोलन पेटू लागले. काँग्रेस निष्ठा व्यक्त करत यशवंतरावांनी या आंदोलनाला विरोध दर्शवला. १ डिसेंबर १९५५ मध्ये सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सभेत यशवंतरावांनी घोषणा केली. ''उपोषण, संप, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे मार्ग नव्हेत. महाराष्ट्रापेक्षा राष्ट्रहित श्रेष्ठ आहे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याच्या प्रयत्नांत यापुढे शंकरराव देव यांचे नेतृत्त्व मी स्विकारणार नाही.''

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा जोर वाढत असताना प्रवाहाविरूद्ध भूमिका घेण्याचे धैर्य यशवंतरावांनी दाखविले. दरम्यानच्या काळात विशाल द्विभाषिक 'मुंबई राज्य' स्थापन करावे. असा ठराव लोकसभेत मंजूर झाला. त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले. वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी मुंबई राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान यशवंतराव चव्हाणांना मिळाला. पंडित नेहरू व काँग्रेस श्रेष्ठीवरील यशवंतरावांची असणारी निष्ठा याचा योग्य सन्मान काँग्रेसकडून झाला. मुख्यमंत्रीपदी निवड झाल्यावर यशवंतरावांनी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. मराठी व गुजराती भाषिक प्रदेशात समन्वय साधण्याची महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी पार पाडली.

एप्रिल १९५७ मध्ये झालेल्या मुंबई विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये मोठी चुरस निर्माण झाली होती. आपल्या पारंपरिक कराड विधानसभा मतदारसंघातून अटीतटीच्या लढतीत यशवंतराव पुन्हा विजयी झाले. मुंबई राज्याचे दुसऱ्यांदा मुख्यमंत्री बनण्याचा मान त्यांना मिळाला.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने याकाळात गती घेतली होती. एस्.एम्.जोशी, आचार्य अत्रे, नानासाहेब गोरे आदी मंडळींनी विदर्भ, मुंबईसह 'महाराष्ट्र राज्य' व्हावे या मागणीसाठी लढा तीव्र केला होता. आंदोलनाची व्याप्ती वाढत असतानाच प्रतापगडावरील शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्घाटन भारताचे तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी झाले. यशवंतराव खंबीरपणे या प्रसंगी नेहरूंसोबत राहिले. याप्रसंगीच्या आठवणी सांगताना यशवंतराव म्हणतात, 'पुण्याहून मोटारीने, मी व श्री.प्रकाशजी, पंडित नेहरूंसोबत प्रतापगडाच्या दिशेने निघालो होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी वाटेत निदर्शने होणार याची कल्पना मला होती. मोटारीत मध्ये नेहरूंनी बसावे म्हणून मी तसे पंडितजींना सूचविले. माझ्या बोलण्याचा अर्थ नेहरूंच्या लक्षात आला, पण त्यांनी स्वत: कडेलाच बसणे पसंत करून श्री प्रकाशजींना मध्ये बसविले. वाटेत निदर्शकांच्या मोर्चाला तोंड देत मोटारी प्रतापगडच्या दिशेने निघाल्या. वाटेत होणाऱ्या निदर्शकांना नेहरू न्याहाळत होते.

शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे उद्घाटन करून परतीच्या प्रवासात निदर्शकांच्या एका जमावाकडे पाहून नेहरू म्हणाले, ''तुम्हांला गंमत सांगतो. पंजाबचे लोकही खूप संतापतात. तुमच्या मराठ्यांप्रमाणेच तेही खूप रागीट आहेत. पण कितीही रागावले तरी लवकर थंड होतात. मराठ्यांचे तसे नाही. ते रागावतात उशिरा व थंड व्हायलाही त्यांना वेळच लागतो.''

प्रत्यक्ष गडावर कार्यक्रमप्रसंगी रस्त्याच्या एका बाजूला काँग्रेसचे कार्यकर्ते नेहरूंच्या स्वागताचे फलक घेऊन उभे होते, तर दुसऱ्या बाजुला संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते नेहरूंच्या निषेधाच्या घोषणा देत उभे होते. घोषणांचा गजर वाढला तेव्हा यशवंतराव सहजपणे फिरत जावे तसे समितीच्या नेत्यांजवळ पोहोचले. काही एक न बोलता त्यांनी आचार्य अत्रेंच्या बुशकोटाचे खुले राहिलेले वरचे बटण लावून दिले. सारा जमाव अवाक् झाला. यशवंतराव जसे गेले तसेच परत आपल्या जागी आले. यशवंतरावांच्या स्वभावातील विनम्रता, सहजता व विरोधकांना नकळत आपलेसे करण्याचे त्यांच्यातील

कसब या प्रसंगातून सहज दिसून येते. या कौशल्याआधारेच यशवंतरावांनी प्रथम मुंबई मग मराठवाडा, विदर्भ व संपूर्ण महाराष्ट्रच आपलासा करून घेतला.

विदर्भाला स्वतंत्र राहून नाही तर महाराष्ट्रात समाविष्ट होऊनच विकास साधता येईल अशी भूमिका यशवंतरावांनी घेतली. महाराष्ट्र व विदर्भाची सांस्कृतिक नाळ जुळावी या उद्देशाने फेब्रुवारी १९५८ मध्ये विसावे 'विदर्भ साहित्य संमेलन' संपन्न झाले. या संमेलनाचे उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते करण्यात आले. या दरम्यानच 'बेळगाव-कारवार' हा मराठी भाषिक भाग महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात यावा यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने चळवळ, आंदोलने सुरू होती. नवी दिल्ली येथेही या मागणीसाठी सत्याग्रह सुरू होता. 'द्विभाषिक राज्याच्या कारभार यापुढे जास्त काळ चालविणे केवळ अशक्य आहे', असे मत यशवंतरावांनी काँग्रेस श्रेष्ठींना कळविले. यशवंतरावांच्या या भूमिकेमुळे द्विभाषिक मुंबई राज्याच्या पुनर्रचनेसंबंधी विचारविनीमय सुरू झाला. यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी ९ सदस्यीय समिती काँग्रेस वर्किंग कमिटीकडून नेमण्यात आली. मराठी भाषिकांचे मुंबईसह महाराष्ट्र राज्य व गुजराती भाषिकांचे गुजरात अशी दोन राज्ये निर्माण करण्याचा ठराव नऊ सदस्यीय समितीकडून करण्यात आला. यशवंतरावांनी या ठरावाला दुजोरा दिला. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या दृष्टीने तो एक महत्त्वाचा टप्पा होता.

एप्रिल १९६० मध्ये लोकसभेत एक ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावानुसार महाराष्ट्र व गुजरात अशी दोन राज्ये निर्माण करण्यास लोकसभेने मंजुरी दिली. दीर्घकाळ सुरू असलेल्या संयुक्त महाराष्ट्र लढ्यास मूर्त स्वरूप प्राप्त होण्याचा तो एक महत्त्वाचा क्षण होता. **१ मे १९६०** रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाली. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा बहुमान यशवंतराव चव्हाणांना मिळाला. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर त्यांनी राज्याच्या विकासासंदर्भात अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. महाराष्ट्र विधिमंडळाचे दरवर्षी हिवाळी अधिवेशन नागपूरात घेण्याचा निर्णय यशवंतराव चव्हाणांनीच

घेतला. विदर्भ विकास परिषदेचे उद्घाटन करून त्यांनी विदर्भाच्या विकासाला गती दिली. प्रशासनाच्या व लोकांच्या सोयीसाठी राज्याचे सहा विभाग पाडण्यात आले. मराठवाडा विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ यांच्या स्थापनेसाठी पुढाकार घेतला. देशातील पहिले सैनिक स्कूल सातारा येथे स्थापन केले. शिक्षणाची गंगा आदिवासींच्या दारी पोहचविण्यासाठी आश्रमशाळांचीही स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात सहकार चळवळ रूजविण्यातही यशवंतरावांचे योगदान खूपच मोठे राहिले.

महाराष्ट्राचे भाग्य उजळून टाकणाऱ्या कोयना जलविद्युत प्रकल्पाचे पहिले जनित्र १६ मे १९६२ रोजी यशवंतरावांच्या हस्ते बसविण्यात आले. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रातील साहित्य व संस्कृती यांच्या संवर्धनासाठी 'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे' उद्घाटन यशवंतरावांनी केले. वाई (जि.सातारा) येथील मराठी विश्वकोष कार्यालयाचे उद्घाटनही त्यांनी केले. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्यात महत्त्वाची भूमिका यशवंतरावांनी बजावली. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील कारभार, पत्रव्यवहार मराठी भाषेतून होऊ लागले. मुंबई शहराला दूध पुरवठा करण्यासाठी वरळी दूध डेअरी योजना सुरू करणे, दिवा-पनवेल रेल्वे मार्गाचे काम, बौद्ध धर्माचा स्विकार करणाऱ्या हरिजनांना त्यांच्या योजनांचा लाभ पूर्ववत सुरू ठेवणे, नागपूर येथील दीक्षा भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारणे व डॉ.आंबेडकरांच्या जयंतीदिनी १४ एप्रिल रोजी सार्वजनिक सुट्टी जाहिर करणे, गुढीपाडव्याला सार्वजनिक सुट्टी असे कितीतरी महत्त्वपूर्ण निर्णय यशवंतरावांच्या कारकीर्दीत घेण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर या मराठी भाषिक राज्याचे नाव काय असावे याबाबत मत मतांतरे होती. 'मुंबई राज्य', 'मुंबई महाराष्ट्र राज्य' व 'महाराष्ट्र राज्य' यापैकी कोणते नाव ठेवावे याबाबत एकमत होत नव्हते. यशवंतरावांनी कॉंग्रेस विधीमंडळ पक्षाचे सदस्य व विरोधी पक्षांच्या सदस्यांत एकमत घडवून आणून **'महाराष्ट्र राज्य'** या नावावर शिक्कामोर्तब केले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीत व जडण-घडणीत महत्त्वपूर्ण

योगदान यशवंतराव चव्हाणांनी दिल्यानेच त्यांना **'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार'** म्हणून गौरविण्यात येते.

यशवंतरावांना राजकारणाबरोबरच साहित्यक्षेत्राचाही खूप मोठा व्यासंग होता. मराठी भाषेच्या वृद्धीसाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. नवी दिल्ली येथे १९६१ मध्ये भरलेल्या ४३ व्या 'अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे' स्वागताध्यक्षपद त्यांनी स्विकारले. १९६२ मध्ये सातारा येथे भरलेल्या अ.भा.मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन यशवंतरावांच्या हस्ते झाले. नांदेड येथे भरलेल्या मराठी नाट्य परिषदेचे उद्घाटनही त्यांच्या हस्तेच झाले. मराठी भाषा वाढली पाहिजे, ती समृद्ध बनली पाहिजे यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसून येते.



**संयुक्त महाराष्ट्र स्थापनाप्रसंगी मंगल कलशाचे स्वागत करताना यशवंतराव चव्हाण (दि. १ मे, १९६०)**

# ६. परदेश दौरे

यशवंतराव चव्हाण यांनी जगातील बहुतांश देशांना भेटी दिल्या. इंग्लंड, अमेरिका, लॅटिन अमेरिका, कॅनडा, पेरू, रशिया, युगोस्लाव्हिया, इजिप्त, सिरीया, थायलंड, मलेशिया, केनिया, लेबनान, सायप्रस, इटली, फ्रान्स, स्वीडन, सिंगापूर, सिलोन (श्रीलंका), बांग्लादेश, जपान, मेक्सिको, जमैका, कॅरेबियन समुद्रातील बेटे, आफ्रिका (खंड) इत्यादी अनेक देशांना त्यांनी भेटी दिल्या. जवळ-जवळ संपूर्ण जगाचीच सफर त्यांनी केली. वेगवेगळे देश, तेथील माणसे, त्यांची भाषा, संस्कृती, चालीरिती, तेथील साहित्य, कला व इतिहास यांचे ज्ञान यशवंतरावांनी या काळात घेतले. भारतीय संस्कृती व परदेशातील संस्कृती यांचा तुलनात्मक अभ्यास यशवंतरावांनी केला. परदेशात स्थिरावलेला भारतीय हिंदी समाज हा यशवंतरावांच्या दृष्टीने अभ्यासाचा व कुतुहलाचा विषय बनला. यशवंतराव म्हणतात, ''सुमारे दीडशे वर्षांपूर्वी मजूर व गुलाम म्हणून परदेशात गेलेले भारतीय व नंतरच्या काळात उच्च शिक्षण घेऊन परदेशात नोकरी-व्यवसायानिमित्त गेलेले सुशिक्षीत भारतीय यांच्या जगण्यात व राहणीमानात फरक आहे.''

यशवंतराव ज्या-ज्या वेळी परदेशात गेले त्यावेळी त्यांनी तेथे वास्तव्यास असणाऱ्या भारतीय समाजाची आवर्जुन माहिती घेतली. अशा प्रसंगी त्यांचे साहित्यिक मन जागे व्हायचे. कॅरेबियन समुद्रातील त्रिनिदाद, गियाना, मॉरिशस, मलेशिया आदी लहान लहान देशांत भारतीयांची संख्या तुलनेने अधिक आहे. गियाना येथे गेल्यावर तेथील भारतीयांची यशवंतरावांनी खास भेट घेतली. त्यांच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती लावली.

परदेशातील भारतीयांच्या मनात आपल्या देशाबद्दल व आपले पूर्वज व त्यांच्या प्राचीन इतिहासाबद्दल आस्था असल्याचे यशवंतरावांना पहावयास मिळाले. भारत सरकारने या सर्वांशी संस्थात्मक संबंध निर्माण करावेत असा प्रयत्न यशवंतरावांनी प्रथम केला. हिंदी भाषा, संगीत, नृत्य, वाङ्मय यांचा प्रसार परदेशात करून तेथील हिंदी समाजाशी ऋणानुबंध प्रस्थापित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका यशवंतरावांनी बजावली.

रशियात प्रथमत: ज्यावेळी १९६३ मध्ये यशवंतराव गेले त्यावेळी त्यांनी तेथील संस्कृती व त्या देशाचा इतिहास जाणून घेतला. रशियन राज्यक्रांतीचे शिल्पकार लेनिन व जगप्रसिद्ध साहित्यिक लिओ टॉलस्टॉय यांच्या समाधीचे दर्शन घेतले. वोल्गा नदीच्या किनाऱ्यावरील दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणी, तेथील एका टेकडीवर उभारलेले युद्धाचे दृश्य व ते दृश्य निर्माण करणारा कलावंत यांचीही भेट त्यांनी घेतली.

टॉलस्टॉयच्या समाधीचे दर्शन घेताना तेथील परिसर यशवंतरावांनी आपल्या नजरेत कायमचा साठवून ठेवला. टॉलस्टॉयने संपूर्ण विश्वाचे चिंतन करण्यात सारी हयात जेथे घालविली त्या 'यास्ना पलाना' या ठिकाणाला भेट दिल्यानंतर तेथील आठवणी सांगताना यशवंतराव म्हणतात, ''टॉलस्टॉयचे हे स्मारक म्हणजे एक जिवंत, बोलके, रम्य मनोहर असे तपोवन आहे. बालपणी टॉलस्टॉयने ज्या वृक्षांचे बीजारोपण केले तेच वृक्ष आता त्याच्या समाधीवर चवऱ्या ढाळत आहेत, फुलांचा वर्षाव करीत आहेत.''

इंग्लंड या देशाच्या भेटीप्रसंगी यशवंतराव म्हणतात, ''इंग्रजांनी जतन करून ठेवलेल्या जुन्या इतिहासाचे दालन म्हणजे कर्तृत्ववान देशाच्या चारशे-पाचशे वर्षाच्या क्रियाशीलतेचे दर्शन. लंडनमधील हे इतिहासाचे दालन युरोपातील इतिहासाने भरलेले आहे. या लोकांनी समुद्र व्यापला, साम्राज्ये निर्माण केली, युरोपचे जीवन घडविले. सुंदर नाटके पाहण्याचे जगातील उत्तम ठिकाण म्हणजे लंडन. महान इतिहासाबरोबरच कलेवर भरभरून प्रेम करणारी माणसे मला इंग्लंडमध्ये पहावयास मिळाली.''

अमेरिकेच्या भेटीप्रसंगी यशवंतरावांनी अमेरिकेचे पाहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या निवासस्थानाला आवर्जून भेट दिली. या ठिकाणचे वर्णन करताना ते म्हणतात, ''या निवासस्थानात जॉर्ज वॉशिंग्टन तेव्हा जसा रहात होता त्यावेळचे रूप जसेच्या तसे जतन करून ठेवले आहे. त्याचे झोपण्याचे ठिकाण, ग्रंथालय, स्वयंपाकघर, त्याची बसण्याची बग्गी हे सर्व नजरेत साठवून ठेवण्यासारखे आहे. बंगल्याच्या सभोवती शेकडो एकर जमीन आहे. हे ठिकाण पाहताना जॉर्ज वॉशिंग्टन यांचे संपूर्ण जीवनचरित्र नजरेसमोर उभे रहाते.''

जगातील विविध देशांना भेटी दिल्यानंतर तेथील प्रवासवर्णने यशवंतरावांनी शब्दबद्ध करून ठेवली. भव्य-दिव्य गोष्टी पाहताना त्यांच्यातील साहित्यिक जागरूक होत असे.

जगभरातील मोठी शहरे ही नदीकाठी वसल्याचा आवर्जून उल्लेख ते आपल्या प्रवासवर्णनात करतात. सागराच्या प्रचंड जलाशयाइतकेच त्यांना हिरव्यागार नदीकाठाचे विलक्षण आकर्षण होते. भरलेले नदीपात्र, तीरावरील हिरवीगार झाडी, पिकाने भरलेले शेत पाहून यशवंतरावांचे मन आनंदून जाई. त्यांचे बालपणच मुळात नदीकाठावर गेल्याने स्वाभाविकच त्यांना त्याचे वेड होते. देशविदेशातील नदीपात्र पाहताना यशवंतरावांना कृष्णा-कोयनेच्या पाण्यात मनसोक्त डुंबतानाच्या आठवणी होत. कृष्णेच्या विशाल काठावर वाळूत पहुडणे, सवंगड्यांबरोबर नदी पार करणे, या बालपणीच्या आठवणी त्यांच्या डोळ्यासमोर तरळून जात.

भारतातील नद्यांकडे पाहण्याची भारतीयांची दृष्टी धार्मिकतेची राहिली. धार्मिकदृष्ट्या पवित्र मानले गेलेले पाण्याचे साठे तीर्थक्षेत्राच्या नावाखाली धार्मिक विधी करून अस्वच्छ झाले तरी त्याकडे आपण लक्ष देत नाही. अमेरिका, इंग्लंड, रशियासारख्या देशांत मात्र नदीपात्र स्वच्छ ठेवण्यासाठी घेतलेली काळजी यशवंतरावांच्या नजरेत मात्र पटकन भरते.

परदेशातील लोकांचे नदीबद्दलचे प्रेम कसे आहे हे सांगताना ते म्हणतात, ''या लोकांचे नदीबद्दलचे प्रेम जबरदस्त आहे, पण ते धार्मिक स्वरूपाचे नाही.''

पंडित नेहरूंनी राबविलेल्या अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाचा प्रभाव जगातील अनेक विकसनशील राष्ट्रांवर पडला. जगभरातील शंभरावर राष्ट्रे अलिप्तवादी चळवळीत सहभागी झाली. 'जागतिक शांततेसाठी आंतरराष्ट्रीय तंटे शांततेच्या मार्गाने सुटावेत.' पंडित नेहरूंच्या वरील धोरणाचा कालांतराने जगातील अनेक देशांनी स्वीकार केल्याचा अनुभव यशवंतरावांना परदेश प्रवासात आला. एकंदरित परदेश दौऱ्यातून यशवंतरावांची दृष्टी व्यापक बनत गेली. भारताचे परराष्ट्र धोरण आखत असताना, देशाला विकासाच्या मार्गावर घेऊन जाण्यासाठी यशवंतरावांनी आपल्या परराष्ट्र मंत्रीपदाचा पुरेपुर वापर केला.

# ७. राजकीय वाटचाल

पंडित नेहरूंविषयीच्या आपल्या आठवणी सांगताना यशवंतराव चव्हाण म्हणतात,

"पं.नेहरूंना मी प्रथम १९३१ मध्ये कराडला पाहिले. त्यावेळी मी शाळेत शिकत होतो. पंडितजी बंगलोर मेलने जाणार होते. ही रेल्वे मध्यरात्री कराड स्टेशनवर येते. पाचशे विद्यार्थ्यांना सोबत येऊन मध्यरात्री आम्ही कराड स्टेशनवर पोहचलो. बंगलोर मेल येताच पं.नेहरू ज्या डब्यात बसले होते तो डबा शोधून काढण्यात आला. झोपेत असणारे नेहरू जागे झाले. काहिशा रागीट मुद्रेने त्यांनी सर्वांकडे पाहिले, पण अल्पकाळातच त्यांचा तो राग मावळला. सुमारे ५ मिनीटे ते बालगोपाळात रमले. नेहरूंचे मला झालेले हे पहिले दर्शन."

यानंतर अनेक वर्षांच्या कालखंडानंतर पं. नेहरूंचा प्रत्यक्ष सहवास यशवंतरावांना लाभला. नेहरूंची पुस्तके, त्यांच्या आत्मकथांचे वाचन मात्र सुरूच होते. नेहरूंच्या निरनिराळ्या सभांना हजारों श्रोत्यांपैकी एक या नात्याने यशवंतरावांची उपस्थिती असायची. पंडितजींशी प्रत्यक्ष भेट मात्र अनेक वर्षानंतर १९५२ साली झाली. त्यावेळी यशवंतराव मुंबई सरकारमध्ये अन्नधान्य पुरवठामंत्री होते. मुंबई शहराला रेशनिंगच्या काळात मिळणारे धान्य यापुढेही चालू रहावे या मागणीसाठी यशवंतरावांनी दिल्लीला जाऊन पंडितजींसमोर आपली भूमिका पटवून दिली. यानंतर १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न निर्माण झाला आणि त्याद्वारे यशवंतरावांचे वक्तृत्त्व, प्रश्नाच्या मूळाशी जाण्याचा त्यांचा स्वभाव व कामावरील निष्ठा यामुळे पंडितजींचा यशवंतरावांवरील विश्वास उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेला. १९५६ मध्ये द्विभाषीक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री, १९६० ला नवीन स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व १९६२ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळात संरक्षणमंत्री आदी विविध जबाबदाऱ्या नेहरूंनी यशवंतरावांवर सोपविल्या.

आपल्या कार्याला मर्यादा घालून घेणे हे यशवंतरावांच्या स्वभावातच

नव्हते. नेतृत्त्वगुण व स्वातंत्र्यलढ्यातील योगदान याच्या आधारे यशवंतराव १९४० मध्ये सातारा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढील काळात त्यांचा राजकीय क्षेत्रातील आलेख उंचावतच गेला.

हिंदुस्थानला लवकरच स्वातंत्र्य द्यावे लागणार याची ब्रिटिश सरकारला जाणीव झाली होती. प्रशासनाच्या सोयीसाठी हिंदुस्थानचे वेगवेगळ्या इलाख्यात वर्गीकरण केले गेले. १९४६ मध्ये मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळासाठी निवडणूक झाली. सातारा मतदारसंघातून यशवंतराव कायदेमंडळावर निवडून गेले. तत्काळ त्यांची गृहखात्याच्या पार्लमेंटरी बोर्डवर सेक्रेटरी म्हणून निवड झाली. या निवडीद्वारे यशवंतरावांनी मुंबई राज्याच्या जडण-घडणीत मोठे योगदान दिले. राजकीय धामधुमीच्या या काळात यशवंतरावांच्या कुटुंबावर एक आघात कोसळला. मधले बंधू गणपतराव यांचे १५ डिसेंबर १९४७ रोजी निधन झाले. थोरल्या बंधुंच्या निधनानंतर अवघ्या चारच वर्षांत दुसऱ्या बंधुंचे निधन झाल्याने यशवंतराव दोन प्रमुख आधारस्तंभांना मुकले.

कौटुंबिक दु:खांना सामोरे जात असताना काँग्रेसची संघटनात्मक जबाबदारीही यशवंतरावांवर येऊन पडत होती. १९४८ साली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस चिटणीस पदाची जबाबदारी यशवंतरावांवर सोपविण्यात आली. चार वर्षे काँग्रेस पक्ष वाढीची जबाबदारी निष्ठेने पार पाडली. १९५२ साली विधानसभेच्या पहिल्या निवडणुका संपन्न झाल्या. कराड मतदारसंघातून यशवंतराव विधीमंडळावर निवडून गेले. मुंबई राज्याचे नागरी पुरवठा मंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. विकासाचे विविध टप्पे पार पाडण्यास त्यांनी याप्रसंगी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नागपूर करारावर पश्चिम महाराष्ट्राचा प्रतिनिधी या नात्याने बाजू मांडून स्वाक्षरी केली.

यशवंतरावांच्या काळात काँग्रेस महाराष्ट्रात जनमानसात रूजली गेली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर नव्या राज्याला स्थैर्य देण्यात व काँग्रेसला बळकटी आणण्यात यशवंतरावांचे योगदान खूपच मोठे ठरले. १९६२ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीत काँग्रेसला २६५ पैकी २१४

जागा मिळाल्या. इतके मोठे यश काँग्रेस पक्ष केवळ यशवंतरावांच्या कारकीर्दीतच महाराष्ट्रात मिळवू शकला. राज्याच्या विकासाबरोबर देशाचा विकासही काँग्रेसच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. महाराष्ट्राप्रमाणेच संपूर्ण देशभरात काँग्रेस पक्षाची पाळेमुळे घट्ट रूजविण्यासाठी काँग्रेस श्रेष्ठींना यशवंतरावांची गरज वाटू लागली. आता महाराष्ट्राचे नेतृत्त्व दुसऱ्या फळीतील नेतृत्त्वाकडे देऊन यशवंतरावांना दिल्लीच्या राजकारणात आणण्याची आवश्यकता श्रेष्ठींना वाटू लागली.

१९६२ साली भारत-चीन यांच्यात युद्ध झाले. चीनच्या अचानक आक्रमणामुळे भारताला नामुष्कीजनक पराभव पत्करावा लागला. चीनचे राष्ट्राध्यक्ष माओ-से-तुंग यांच्याकडून झालेला विश्वासघात नेहरूंच्या जिव्हारी लागला. 'हिंदी-चीनी भाई भाई'या घोषणेला चीनने दगा दिला. याप्रसंगी देशाच्या संरक्षणमंत्रीपदावरून श्री.व्ही.के.कृष्णमेनन यांना काढून त्या जागेवर यशवंतरावांना बसवावे असे नेहरूंना वाटू लागले. यावेळी यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. यशवंतराव मुंबईत सचिवालयात दैनंदिन कामकाज पहात असताना त्यांना दिल्लीवरून पंतप्रधान पंडित नेहरूंचा फोन आला. चिटणीसांनी घाईघाईने तो निरोप यशवंतरावांना दिला. यशवतंरावांनी फोन उचलताच त्यांच्या कानावर शब्द पडले, ''मी जवाहरलाल बोलतो आहे. जवळपास कोणी बसलेले नाही ना?'' ''कोणी नाही'' असा यशवंतरावांकडून निर्वाळा मिळताच जवाहरलाल बोलले, ''सरंक्षण खात्याची जबाबदारी, मी तुमच्यावर सोपवू इच्छितो. तुम्ही दिल्लीला आले पाहिजे असे मला वाटते. येणार ना तुम्ही? आणि त्याची फारशी चर्चा न करता हो किंवा नाही एवढेच उत्तर मला हवे आहे.'' थोडा वेळ विचार करून यशवंतराव म्हणाले, ''मला एका व्यक्तिला विचारावे लागेल.'' काहीशा रागानेच नेहरू म्हणाले, ''अशी कोणती व्यक्ती आहे, की जिला विचारल्याशिवाय काम अडणार आहे?'' यावर यशवंतराव बोलले, ''मुंबई सोडून दिल्लीला जाण्याची परवानगी मला किमान माझ्या पत्नीकडून अगोदर घ्यावयास हवी.'' यशवंतरावांच्या या उत्तरावर मनमुराद हसून नेहरू बोलले, ''हो जरूर!

सौ.चव्हाणांशी तुम्ही जरूर बोला आणि दोन दिवसांत तुमचा निर्णय मला कळवा.'' दोन दिवसाने यशवंतरावांनी आपण दिल्लीला येण्यास तयार असल्याचे नेहरूंना कळविले. अशारितीने यशवंतरावांचा दिल्लीत सन्मानाने प्रवेश झाला. 'महाराष्ट्राचा सह्याद्री देशावरील संकट दूर करण्यासाठी हिमालयाच्या मदतीला धावला' अशा शब्दात यशवंतरावांच्या दिल्ली प्रवेशाचे देशभर स्वागत करण्यात आले.

२२ नोव्हेंबर १९६२ रोजी देशाचे संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांचा शपथविधी झाला. शपथविधी नंतर अवघ्या तासाभराच्या आत यशवंतरावांनी तिन्ही सेनादलाच्या प्रमुखांची बैठक बोलावली. सहा महिन्याच्या आत संसदेचे सदस्य होणे गरजेचे होते. नाशिक लोकसभा मतदारसंघातून यशवंतराव बिनविरोध निवडून गेले. पुढील काळात त्यांचा दिल्लीच्या राजकारणातील दबदबा उत्तरोत्तर वाढतच गेला. केंद्रीय गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री अशी महत्त्वपूर्ण खाती त्यांनी पुढील काळात सांभाळली.

केंद्रीय मंत्रिमंडळात विविध खात्यांची जबाबदारी सांभाळताना यशवंतरावांचे अनेक आंतरराष्ट्रीय नेत्यांशी संबंध आले. अमेरिकन संरक्षण खात्याचे सचिव मॅक्नोरा यांच्या निमंत्रणावरून त्यांनी अमेरिकेस भेट दिली. यशवंतरावांच्या जीवनातील ती पहिलीच परदेश भेट होती. यानंतर त्यांचा जगातील विविध देशांशी संबंध आला. रशिया, इंग्लंड या देशांचेही त्यांनी दौरे केले. त्यांचा परदेश प्रवास हा केवळ सरकारी कामासाठीच असायचा.

१९६५ हे साल भारत-पाक यांच्यातील लढाईच्या धुमश्चक्रीचे होते. यादरम्यान यशवंतरावांच्या मातोश्री विठाबाई या खूप आजारी होत्या. कराडहून त्यांना उपचारासाठी मुंबईला आणले गेले. वय झाले होते. आयुष्यभर खूप कष्ट करून ती माता थकलेली होती. १८ ऑगस्ट १९६५ रोजी त्यांनी जगाचा निरोप घेतला. यावेळी यशवंतराव दिल्लीत होते. देश युद्धाच्या खाईत असल्याने यशवंतरावांना आपल्या मातेचा अखेरचा सहवास लाभला नाही. तळहातावरील फोडाप्रमाणे यशवंतरावांना जपणाऱ्या मातेजवळ तिच्या अखेरच्या प्रसंगी आपल्याला राहता आले नाही याचे शल्य त्यांना खूप बोचले.

मातेच्या अस्थी घेऊन यशवंतराव अलाहाबादला 'गंगा-यमुना-सरस्वती'च्या त्रिवेणी संगमावर गेले. गंगेत अस्थी सोडताना भूतकाळाचा एकमेव धागा झट्दिशी तुटल्याची भावना यशवंतरावांच्या मनाला छेदून गेली. आठ-नऊ वर्षाचे असताना आईबरोबर बैलगाडीतून पंढरपूरला गेल्याच्या आठवणी डोळ्यासमोर तरळल्या. आईचे बोट धरून विठ्ठलाच्या मंदिरात केलेला प्रवेश आठवला. विठ्ठलाच्या पायावर मस्तक ठेवल्याचे आठवू लागले. आयुष्यात कधी पंढरपूरला जाण्याचा योग येईल त्यावेळी आईचे धरलेले बोट आता मिळणार नाही या आठवणींनी यशवंतरावांचे मन गलबलून गेले.

१९६५ च्या युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळविलेला पहिला विजय देशाने पाहिला. १९७१ च्या युद्धात भारताने पाकिस्तानचा निर्णायक पराभव करून त्याचे दोन तुकडे केले तेव्हा तर त्या यशावर प्रशस्तीची मोठी कमान उभी राहिल्याचेच देशाला दिसले. संरक्षणमंत्री या नात्याने यशवंतरावांनी केलेले काम केवळ औपचारिक मार्गदर्शनाचे नव्हते. राम प्रधानांनी संपादित केलेली त्या काळातील यशवंतरावांची डायरी नुसती चाळली तरी शस्त्रबळाच्या वाढीपासून सेनेच्या प्रत्यक्ष हालचालींपर्यंत त्यांनी उचललेले निर्णायकी पाऊल नजरेत भरले. १९६५ च्या युद्धाच्यावेळी अखंड दिवसरात्र सेनेच्या प्रमुखांशी, आघाडीवरील पथकांच्या नेत्यांशी, तोफखाना व हवाईदलाच्या प्रमुख सैनिकांशी व अधिकाऱ्यांशी सततचा संपर्क कसा राखला होता व त्यातून त्यांना केवढे मोलाचे मार्गदर्शन केले होते याची जाणीव होते. पश्चिम सीमेवर युद्ध सुरू असताना पूर्वेला तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानात (बांग्लादेशात) आघाडी न उघडण्याचा व सारी भारतीय सैन्यशक्ती पश्चिमेकडे एकवटण्याचा निर्णय सेनाप्रमुखाचा नव्हता, तर तो यशवंतरावांचाच होता.

यानंतर जानेवारी १९६६ मध्ये भारताचे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री व पाकिस्तानचे पंतप्रधान आयुबखान यांच्यात रशियामध्ये 'ताश्कंद' येथे एक करार संपन्न झाला. रशियन पंतप्रधान कोसिजीन यांच्या पुढाकारातून हा करार झाला होता. या करारावेळी भारताचे संरक्षणमंत्री या नात्याने यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. दुर्दैवाने 'ताश्कंद करार' झाला त्या रात्रीच

लालबहादुर शास्त्रींचे निधन झाले. पंडित नेहरूंच्या निधनानंतर अवघ्या दोनच वर्षात भारताच्या दुसऱ्या पंतप्रधानांचे निधन झाल्याने भारताच्या राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. याप्रसंगी तरुण, तडफदार नेतृत्त्व उदयास आले. पंडित नेहरूंच्या कन्या इंदिराजी गांधी यांची देशाच्या तिसऱ्या पंतप्रधान म्हणून एकमताने निवड करण्यात आली. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनण्याचा मानही इंदिराजींना मिळाला. देशाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी मंत्रीमंडळात काही फेरबदल केले. त्यानुसार यशवंतरावांवर देशाच्या गृहमंत्रीपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली. गृहमंत्रीपदाच्या कारकीर्दीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. पहिल्या सहा महिन्यातच नव्याने १० राज्यपालांची नियुक्ती केली गेली. देशाची अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखण्यात ते यशस्वी ठरले.

जून १९७० मध्ये केंद्रीय अर्थमंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली. देशाची आर्थिक घडी पुढील चार वर्षात बसविण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. पाकिस्तान आणि चीन यांच्या भारतविरोधी कारवायांनी संघटित स्वरूप घेतले, तेव्हा देशाने यशवंतरावांची नियुक्ती ऑक्टो. १९७४ मध्ये परराष्ट्र खात्याच्या मंत्रीपदावर केली. देशाचे परराष्ट्र धोरण निश्चित करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. जगातील विविध देशांना भेटी देऊन भारताला जगभरात मान-सन्मान मिळवून देण्यात यशवंतरावांचे योगदान खूपच महत्त्वपूर्ण ठरले.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेच्या ऐन मुहूर्तावरच ग.त्र्यं.माडखोलकर यांनी 'हे मराठी राज्य की मराठा राज्य?' असा जळजळीत पण परखड प्रश्न यशवंतरावांना आपल्या संपादकीयातून विचारला. माडखोलकर संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या विचारांचा कलही डाव्या राष्ट्रीयत्वाकडे झुकणारा होता. शिवाय यशवंतरावांएवढेच अनेक राजकीय नेत्यांशी त्यांचे जवळचे संबंध होते. त्यांना नागपूरच्या सभेत उत्तर देताना यशवंतरावांनी त्यांच्या लेखणीचा गौरव करीत, 'हे मराठी राज्यच असेल' अशी ग्वाही त्यांच्यासकट साऱ्या महाराष्ट्राला दिली. दुर्दैवाने लोकशाहीतले राजकारण

आकड्यावर उभे होते. त्यामुळे आपला शब्द यशवंतरावांना नेहमीच खरा करता आला नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात एकवेळ अशी होती की, विधानसभेतील २८८ आमदारांपैकी २२२ जणांची जात एकच होती. तसेच त्यातल्या ८८ जणांचे आडनावही एकच होते. नंतरच्या काळात महाराष्ट्रातील अनेक मराठेत्तर जातींनी इतर पक्षांच्या झेंड्याखाली जाणे पत्करले. तरीही यशवंतरावांच्या काळात एका जातीचा राजकारणावरील वरचष्मा पुढल्या काळातल्याएवढा बटबटीतपणे कधी पुढे आला नाही.... या बाबीला एका चमत्कारिक वास्तवाची असणारी पार्श्वभूमी एवढ्या वर्षानंतरही आज लक्षात घ्यावी अशी आहे. १९३७ च्या निवडणुकीच्या काळात यापुढे बहुजनांचीच सत्ता येणार असे म्हणत मराठा समाजाचे अनेक मान्यवर नेते काँग्रेसमध्ये आले. या निवडणुकीनंतर मात्र बाळासाहेब खेर यांना तेव्हाच्या मुंबई राज्याचे पंतप्रधानपद वल्लभभाई पटेलांनी देऊ केले. त्यावेळी 'काँग्रेस ब्राह्मणांची झाली' असे म्हणत निवडणूकीपूर्वी काँग्रेसमध्ये दाखल झालेले नेते काँग्रेसबाहेर पडले. पुढे १९५६ मध्ये यशवंतराव नव्या मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा 'काँग्रेस बहुजनांची झाली' असे म्हणत ते सारे नेते पुन्हा काँग्रेसमध्ये परत आले. राजकीय पक्षांचे जातीयीकरण आपल्यात फार वर्षापूर्वी सुरू होऊन नंतरच्या काळात त्याने खऱ्या लोकशाहीवर मात करणे यांचा इतिहास एवढा जुना व एका नेत्याला आवर घालता येण्याजोगा नव्हता हे यावरून लक्षात येते.

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा सुसंस्कृतपणा व संवेदनशीलता सांगणारा एक प्रसंग संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या दरम्यान घडला. त्यांच्या कुटुंबात मूल जन्माला आले नाही. त्यांची ती दुबळी बाजू हेरून आयार्च अत्र्यांनी त्यांच्यावर एकदा कमालीची क्रूर टिका केली. त्यांच्या मौनाची आणि नेहरूनिष्ठेची टवाळी करण्याच्या नादात यशवंतरावांच्या शारीरिक अभावावरच त्यांनी नको तसे बोट ठेवले. त्या टिकेला उत्तर देताना यशवंतराव म्हणाले, ''आचार्य अत्रे हे महाराष्ट्राचे थोर लेखक आहेत. त्यांचे साहित्य वाचतच मी लहानाचा मोठा झालो. त्यांच्या आताच्या टीकेने मी संतापलो

नाही. माझे दु:ख वेणूताईविषयींचे आहे. त्या गरोदर असताना आम्ही दोघेही स्वातंत्र्य लढ्यात होतो. एका सोजिराने (इंग्रज सैनिक) पोटावर लाथ मारल्याने वेणूताई अत्यवस्थ झाल्या आणि जन्माला येणारे मूल जन्म घेऊ शकले नाही. ते दु:ख आम्ही मुकाटपणे गिळले. अत्र्यांनी केलेल्या टीकेमुळे वेणूताईंना ज्या वेदना झाल्या त्यामुळे मी कळवळतो आहे.'' पुढे अत्र्यांनी यशवंतरावांची क्षमा मागितली. पण, घडू नये असा प्रमाद आचार्य अत्रेंच्या हातून घडून गेला होता.

यशवंतरावांना त्यांच्या चतुरस्त्र, अभ्यासपूर्ण व्यक्तिमत्त्वाबद्दल अनेक विद्यापीठांनी मानद पदव्या देऊन सन्मानित केले. २३ फेब्रुवारी १९६९ मध्ये कानपूर विश्व विद्यालयाने 'डॉक्टर ऑफ लॉ' ही सन्मापूर्वक पदवी त्यांना बहाल केली. लगेचच दुसऱ्या वर्षी फेब्रुवारी १९७० मध्ये मराठवाडा विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी देऊन कानपूर विद्यापीठाची पुनरावृत्ती केली. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठानेही डिसेंबर १९७४ मध्ये यशवंतरावांना 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी प्रदान केली. मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी याचेकडून जाने.१९७६ मध्ये 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' देऊन गौरविण्यात आले. मार्च १९८४ मध्ये पुणे विद्यापीठाची सन्माननीय 'डी.लीट' पदवी बहाल करण्यात आली. अशारितीने विविध विद्यापीठांनी यशवंतरावांना अनेक सन्माननीय पदव्या बहाल करून त्यांच्या कार्याचा यशोचित्त गौरव केला. राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तिच्या दृष्टीने हा दुर्मिळ योगायोगच मानावा लागेल. अर्थात यशवंतरावांच्या विद्वत्तेचाच तो गुणगौरव होता.

ऑक्टोबर १९७६ मध्ये अमेरिका भेटीप्रसंगी यशवंतरावांना हेस्टन येथील टेक्सास शहरातर्फे 'सदिच्छा राजदूत' म्हणून मानपत्र देऊन गौरविण्यात आले. देश-विदेशातील सन्मान स्विकारत असतानाच राजकीय क्षेत्रातील उलथापालथीतही यशवंतराव अग्रेसर होते. १९७२ च्या लोकसभेच्या पंचवार्षिक निवडणूकीत महाराष्ट्रात काँग्रेसला ४३ जागा मिळाल्या. यशवंतराव 'सातारा' लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले. यानंतरची त्यांची केंद्रीय

परराष्ट्रमंत्री पदाची कारकीर्द खूप उल्लेखनीय ठरली.

१९७१ च्या मध्यावधी निवडणूकीत काँग्रेसला मोठे यश मिळाले. याच सालात भारत-पाकिस्तान यांच्यात युद्ध झाले. इंदिरा गांधींच्या कणखर नेतृत्त्वासमोर पाकिस्तानचा टिकाव लागला नाही. पाकिस्तानचा सपशेल पराभव करून बांग्लादेशाची निर्मिती करण्यात भारताने मोठी भूमिका पार पाडली. इंदिराजींच्या कणखर नेतृत्त्वावर शिक्कामोर्तब झाले. यावेळी यशवंतराव देशाचे अर्थमंत्री होते. १९७४ नंतर इंदिरा गांधींचा प्रभाव हळूहळू कमी होऊ लागला. लोकनायक जयप्रकाश नारायणांच्या 'संपूर्ण क्रांतीच्या' आंदोलनाची व्याप्ती संपूर्ण देशभर वाढू लागली. प्रथम गुजरात नंतर बिहार पाठोपाठ संपूर्ण देशभर हे आंदोलन पसरले गेले. याच दरम्यान ५ जून १९७५ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची लोकसभेतील निवड रद्द ठरवली. शिवाय येथून पुढे सहा वर्षे निवडणूक लढविता येणार नाही असा ऐतिहासिक निकाल दिला. या निकालावर मात करण्यासाठी देशात आणीबाणी लागू करणे हा एकमेव पर्याय इंदिरा गांधींसमोर होता. २५ जून १९७५ रोजी देशांत अंतर्गत आणीबाणी लागू करून नागरिकांचे मूलभूत अधिकार गोठविण्यात आले. अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरूंगात डांबण्यात आले. देशभर इंदिरा गांधींच्या निर्णयाविरूद्ध असंतोषाची लाट निर्माण झाली. याप्रसंगी पक्षनिष्ठेला प्राधान्य देऊन यशवंतराव इंदिरांजींसोबत राहिले.

लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्याचा आग्रह धरणारा जयप्रकाशांच्या नेतृत्त्वाखालील एक वर्ग तर दुसऱ्या बाजुला इंदिरा गांधींची एकाधिकारशाही अशी भारतीय राजकारणाची विभागणी झाली होती. भारतीय राजकारण एका विशिष्ट वळणावर येऊन पोहचले होते. याचा अपेक्षित तो परिणामी आगामी लोकसभेच्या निवडणूकीत दिसून आला.

१९७७ च्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेसला सपाटून पराभव पत्करावा लागला. विचारवंत, नागरी स्वातंत्र्यावर निष्ठा असणारा वर्ग जयप्रकाशांसोबत गेला. इंदिरा गांधी, शंकर दयाळ शर्मा, संजय गांधी असे दिग्गज उमेदवार

पराभूत झाले. यशवंतराव मात्र महाराष्ट्रातून विजयी झाले. जयप्रकाश नारायणांच्या नेतृत्त्वाखालील जनता पक्षाची देशभर लाट निर्माण झाली.

**'अंधेरे में एक प्रकाश, जयप्रकाश ! जयप्रकाश!'**

ही घोषणा देशभर लोकप्रिय झाली होती. जनता लाटेत काँग्रेस सरकार पराभूत झाले. यावेळी मोरारजीभाई, जगजीवनराम, चंद्रशेखर, मोहन धारिया आदी नेते जयप्रकाशांच्या सोबत होते. मोरारजीभाई देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली जनता पक्षाचे सरकार केंद्रात सत्तेवर आले. जनसंघ, समाजवादी, व स्वतंत्र आदी पक्षांचे हे सरकार होते. काँग्रेसला विरोधी बाकावर बसावे लागले. यशवंतरावांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून काँग्रेसने त्यांना लोकसभेतील विरोधी पक्षनेता म्हणून निवडले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथमच लोकसभेतील मान्यताप्राप्त पक्षाचे विरोधी पक्षनेतेपद यशवंतरावांना मिळाले. विरोधी पक्षनेता कसा असावा याची प्रचिती यशवंतरावांनी लोकसभागृहात दाखवून दिली. मोरारजीभाई देसाईंचे सरकार जास्त काळ टिकले नाही. अंतर्गत मतभेदामुळे जनता पक्षात फूट पडली. कशीबशी दोन वर्षाची कारकीर्द पूर्ण केलेले मोरारजीभाईंचे सरकार कोसळले व चौधरी चरणसिंग यांच्या नेतृत्त्वाखाली जुलै १९७९ मध्ये नवीन सरकार केंद्रात सत्तेवर आले. इंदिरा गांधींच्या अप्रत्यक्ष पाठिंब्यानेच या सर्व घडामोडी घडत होत्या.

यशवंतरावांना अंतर्गत पाठिंबा देऊन नवीन सरकारमध्ये उपपंतप्रधानपद स्विकारण्यास इंदिरा गांधींनी उद्युक्त केले. यशवंतराव देशाचे **उपपंतप्रधान** झाले.

लोकसभेचा विरोधी पक्षनेता ते देशाचा उपपंतप्रधान असा यशवंतरावांचा राजकीय जीवनातील अत्यंत महत्त्वाचा प्रवास म्हणून या घटनेकडे पाहिले जाते. इंदिरा गांधींनी चरणसिंग सरकारला दिलेला पाठिंबा अल्पावधीतच काढून घेतला. परिणामी लोकसभेला सामोरे न जाताच चरणसिंग सरकारला राजीनामा द्यावा लागला.

यशवंतरावांचे उपपंतप्रधानपदही त्यामुळे औटघटकेचेच ठरले. इंदिरा गांधी विरोधकांचे सरकार पाडण्यात यशस्वी ठरल्या, पण यशवंतरावांचा यामध्ये

राजकीय बळी गेला. आयुष्यभर काँग्रेसशी पक्षनिष्ठा सांभाळलेल्या यशवंतरावांना न केलेल्या चुकांची फळे भोगावी लागली.

१९८० च्या निवडणूकीत काँग्रेस दोन गटात विभागली गेली. इंदिरा काँग्रेस विरूद्ध निलम संजीव रेड्डींच्या नेतृत्त्वाखालील काँग्रेस असे काँग्रेसचे दोन भाग पडले. यशवंतराव रेड्डी काँग्रेसमध्ये दाखल झाले. 'गरिबी हटाओ' ही इंदिरा गांधींची घोषणा त्या काळात लोकप्रिय ठरली. देशात पुनश्च एकदा इंदिरा गांधींची लाट आली. इंदिरा काँग्रेस देशात स्वबळावर सत्तेवर आली. रेड्डी काँग्रेसचे एकमेव उमेदवार म्हणून यशवंतराव महाराष्ट्रातून विजयी झाले. यशवंतरावांचा राजकीय वनवास येथून पुढे खऱ्या अर्थाने सुरू झाला. स्वबळावर सत्ता मिळविलेल्या काँग्रेसला आता यशवंतरावांची गरज वाटेनाशी झाली. पुढचा काळ यशवंतरावांना केवळ वाट पहाण्यातच घालवावा लागला. नेहरूंपासून १९८० पर्यंत प्रत्येक वेळी यशवंतरावांना सन्मानाने केंद्रीय मंत्रिमंडळात बोलावून घेऊन संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्रमंत्री, अर्थमंत्री अशी महत्त्वाची खाती देण्यात आली होती. यावेळी मात्र स्वाभिमानी विचाराच्या यशवंतरावांनी सत्तेपासून दूर राहणेच पसंत केले. पंतप्रधानांचा निरोप आला तरच जायचे, विचारलेला सल्ला तेवढा द्यायचा आणि परत आपल्या एकांतात गढायचे, असा राजकीय विजनवासाचा काळ त्यांच्या जीवनात सुरू झाला.

आपल्या वैयक्तिक जबाबदाऱ्या पार पाडणे, येणाऱ्या प्रसंगांना हसतमुखाने सामोरे जाणे हा स्वभाव यशवंतरावांना त्या काळात उपयुक्त ठरला. या काळात यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ' हे आपले आत्मचरित्र लिहिण्यास घेतले.

दोनच वर्षात यशवंतरावांची गरज इंदिरा गांधींना भासू लागली. १९८२ साली यशवंतरावांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. याचवर्षी देशाच्या आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. बिगर राजकीय पद देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात आले. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात अनेक राजकीय स्थित्यंतरे होत गेली. यशवंतराव अनेक वर्षे दिल्लीत होते तरीही महाराष्ट्राचा मुख्यमंत्री त्यांच्या सल्ल्यानेच ठरवला जायचा. नंतरच्या काळात

मात्र यशवंतरावांचा सल्ला फक्त घेतला जायचा पण त्याची अंमलबजावणी मात्र होत नव्हती.

महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्रीपद भुषविलेल्या व केंद्रात चार महत्त्वाच्या मंत्रिपदाबरोबरच उपपंतप्रधानपदापर्यंत पोहचलेल्या या द्रष्ट्या नेत्याची जीवनाच्या अखेरच्या काळात खूपच उपेक्षा झाली. वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रीपदाला अगोदर यशवंतरावांची संमती घेण्यात आली होती. शंकरराव चव्हाणांच्या नावालाही यशवंतरावांनी फार पूर्वीच संमती दिली होती व तसे त्यांनी इंदिरा गांधींना सांगितलेही होते. मात्र 'आम्ही तयार आहोत पण अगोदर यशवंतरावांची संमती मिळवा,' असे दरवेळी शंकररावांना पंतप्रधानांच्या निवासस्थानी सांगितले जायचे. परिणामी शंकररावांसह मराठवाड्यातील अन्य काँग्रेस नेत्यांमध्ये यशवंतरावांबद्दल गैरसमज निर्माण झाला. प्रत्यक्षात या दिलदार मनाच्या नेत्याने राजकारणात कोणाचीही अडवणूक केली नव्हती.

१९७७ मध्ये वसंतदादांचे सरकार खाली खेचून शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. काँग्रेसमधून बाहेर पडून शरद पवारांनी पुलोद (पुरोगामी लोकशाही दल) स्थापन करून महाराष्ट्राची सत्ता प्रथमतः ताब्यात घेतली. या काळात यशवंतरावांचे मानसपूत्र म्हणून शरद पवारांना ओळखले जात होते. स्वर्णसिंगांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्षपद सोडल्यामुळे या पदाची तात्पुरती जबाबदारी यशवंतरावांवर सोपविण्यात आली होती. स्वाभाविकच यशवंतराव पक्षाध्यक्ष असताना त्यांच्याच मार्गदर्शनाखाली राजकारणाचे धडे घेतलेल्या शरद पवारांनी काँग्रेसमधून बाहेर पडून वसंतदादांचे सरकार पाडणे याबद्दल यशवंतरावांकडे संशयाने पाहिले जाऊ लागले. प्रत्यक्षात यशवंतरावांनी असा कोणताही सल्ला शरद पवारांना दिला नसल्याचे नंतरच्या काळात स्पष्ट झाले. बंडाचे निशाण उभारणाऱ्यांना कायमचे तोडणे यशवंतरावांच्या स्वभावात नसल्यानेच त्यांच्याबाबत असा गैरसमज निर्माण झाला असावा असे मानावे लागेल.

दिल्लीकरांनी यशवंतरावांच्या क्षमतेचा वापर आपल्या राजकारणासाठी

करून घेतला आणि यशवंतरावांनीही त्यांना तो करू दिला. यशवंतरावांच्या अनुयायांनीही स्वतःच्या वाढीसाठी त्यांचे मोठेपण जेवढे वापरता येईल तेवढे वापरले आणि यशवंतरावांनीही त्यांना ते वापरू दिले. यशवंतरावांनी कोणाला नकार दिला नाही व थांबा म्हणूनही सांगितले नाही. यश जितक्या शांतपणे पचविले तितकेच अपयशही त्यांनी सहजतेने पचविले. तत्त्वनिष्ठा व पक्षनिष्ठा त्यांनी अखेरपर्यंत सांभाळली. १९८० मध्ये रेड्डी काँग्रेस व इंदिरा काँग्रेस अशा दोन गटात झालेली काँग्रेसची विभागणी म्हणजे यशवंतरावांच्या जीवनातील कसोटीचा काळ होता. दोन्ही गट मूळचे काँग्रेसचेच असल्याने यशवंतरावांनी रेड्डी काँग्रेसला साथ दिली. त्यांच्या या निर्णयाला पक्षविरोधी कृती म्हणता येणार नाही. राजकारणात अतिरिक्त विश्वास हा अपराध ठरू शकतो. राजकीय तत्त्ववेत्ते व राजकीय नेते यामध्ये फरक आहे. एखाद्या नेत्याच्या निर्णयावर राजकीय टिकाटिप्पणी करणे हे राजकीय विश्लेषकाचे काम असते. प्रत्यक्षात निर्णय घेताना काय बिकट अवस्था असते हे त्या नेत्यालाच माहित. संघर्षमय लढ्यातील नेतृत्त्व हे त्यागावर अवलंबून असते तर राजकारणातील शांततेचा काळ भोगावर अवलंबून असतो. या काळातील भूमिकेबाबत सर्वस्वी त्या राजकीय नेत्याला जबाबदार धरता येत नाही. संत, समाजसुधारकांचे ज्याप्रमाणे मूल्यमापन केले जाते त्याप्रमाणे राजकीय माणसे मोजून चालत नाहीत. ज्याला स्पर्धक नाही आणि ज्याच्याशी कोणाला स्पर्धा करता येणार नाही अशी उंची मोजण्याचे क्षेत्र राजकारण नव्हे. यशवंतरावांच्या राजकीय निर्णयावरून त्यांच्या यशापयशाचे मूल्यमापन करणेही चुकीचे ठरेल.

एक माणूस नेता म्हणून यशवंतरावांकडे पहावे लागेल. काँग्रेसमधील समाजवादी विचारांचा नेता म्हणून त्यांची प्रतिमा उच्च स्तरावरील होती. घार आकाशात कितीही वर गेली तरी तिचे लक्ष पिलाकडे असते, त्याप्रमाणेच यशवंतरावांचे महाराष्ट्रावर विशेष प्रेम होते. महाराष्ट्राच्या उभारणीची पायाभरणी करणारा व आपल्या असामान्य बुद्धीकर्तृत्त्वाने महाराष्ट्राला देशात एक नंबरवर नेण्यात यशवंतरावांचे योगदान खूपच मोठे आहे. जोपर्यंत नेता उपयुक्त ठरतो तोपर्यंत अनुयायी नेत्याची पालखी खांद्यावर घेऊन मिरवतात.

जेव्हा नेता निरूपयोगी ठरतो, त्यावेळी अनुयायाला नेत्याची पालखी जड वाटू लागते. यशवंतरावांच्या अखेरच्या काळात दिल्लीच्या राजकारणात एकाकी पडल्यावर त्यांच्याच पाठिंब्यावर मोठ्या झालेल्या अनुयायांना यशवंतराव निरूपयोगी वाटू लागले. राजकारणातील तो अलिखित नियमच असल्याने यशवंतरावांनीही तो मोठ्या मनाने स्विकारला.

तत्त्वनिष्ठेचे राजकारण केलेल्या या लोकनेत्याने कधी सत्तेचा रूबाब व संपत्तीचा लोभ धरला नाही. देशाच्या उपपंतप्रधान पदावर पोहचलेल्या या नेत्याने कधी दिल्लीत स्वत:चे घर बांधले नाही की मुंबईत स्वत:साठी फ्लॅट घेतला नाही. महाराष्ट्रात अनेक साखर कारखाने उभारण्यात योगदान देणाऱ्या या नेत्याने स्वत:च्या नावाने अगर स्वत:च्या मालकीचा एकही साखर कारखाना सुरू केला नाही. महाराष्ट्रात एक एकरही जमीन त्यांनी राजकीय लाभापोटी मिळविली नाही. आयुष्याच्या अखेरीस त्यांच्या खात्यावर स्टेट बँकेत केवळ ३६ हजार रूपयांची शिल्लक होती. राजकारणात राहून इतकी पारदर्शकता व कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचारापासून अलिप्त असणारे निष्कलंक व्यक्तिमत्त्व अशा शब्दातच यशवंतराव चव्हाणांची राजकीय उंची मोजावी लागेल. त्यांचे हे त्यागमय संघर्षमय जीवन महाराष्ट्रातील तमाम राजकीय नेत्यांना आजपर्यंत प्रेरणादायी ठरत आले आहे. म्हणूनच त्यांचे राजकीय स्थान अबाधित राहिले गेले.



**पंडित नेहरू व इंदिरा गांधी यांच्यासमवेत यशवंतराव**

# ८. संस्मरणीय क्षण

यशवंतरावांच्या जीवनात त्यांच्या पत्नी वेणूताईंचे स्थान खूपच मोठे आहे. वेणूताईंचे माहेर फलटण. त्यांचे वडील रघुनाथराव मोरे हे बडोदा संस्थानात नोकरीस होते. वेणूताईंच्या विवाहापूर्वीच वडिलांचे निधन झाल्याने त्या पितृप्रेमाला पोरक्या झाल्या. घरची परिस्थिती बऱ्यापैकी स्थिर होती. यशवंतरावांशी वेणूताईंचा विवाह २ जून १९४२ रोजी मराठा बोर्डींग कराड याठिकाणी झाला. विवाहानंतर जेमतेम दोन-तीन महिने झाले नाही तोच यशवंतरावांना स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याबद्दल तुरूंगात जावे लागले. तुरूंगातून सुटका झाल्यानंतर पुण्यात भूमिगत राहून त्यांनी काम सुरू ठेवले. १९४२ च्या लढ्याने तीव्र रूप धारण केले होते. १४ जानेवारी, १९४३ रोजी पोलीसांनी वेणूताईंना अटक केली. तो दिवस संक्रांतीचा होता. लग्नानंतरच्या पहिल्या संक्रातीला वेणूताईंना तुरूंगात जावे लागले. यशवंतरावांना ही बातमी पुण्यात समजली, तेव्हा त्यांना खूप दुःख झाले. वेणूताईंना सुमारे सहा आठवडे कराड व इस्लामपूरच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या जीवनातील तो पहिलाच तुरूंगवास होता. पोलीसांचे उद्‌धट प्रश्न, निकृष्ट जेवण, आरोपीप्रमाणे वागणूक हा त्रास वेणूताईंनी सहन केला. जेलमधून सुटल्यानंतर यशवंतरावांनी वेणूताईंना विचारले,

"पोलीसांनी कशी वागणूक दिली?"

यावर वेणूताई बोलल्या,

"पोलीस इतर कैद्यांना जशी वागणूक देतात, तशीच दिली."

वेणूताईंनी तुरूंगातील त्रास निमूटपणे सहन केला. यशवंतरावांना तुरूंगात व तुरूंगाबाहेर दोन्हीही ठिकाणी वेणूताईंनी समर्थपणे साथ दिली. एका चळवळी दरम्यानच एका इंग्रज सैनिकाने वेणूताईंच्या पोटावर लाथ मारली. यावेळी वेणूताईंना दिवस गेले होते. त्यांच्या पोटात तीव्र कळ आली. त्या अत्यवस्थ होऊन खाली कोसळल्या. त्या गोऱ्या सैनिकाने इतक्या निर्दयपणे लाथ मारली होती की, त्यामुळे पोटातील मूल मरण पावले. यानंतर

यशवंतरावांना पुत्रपाप्ती कधीच झाली नाही. वेणूताई व यशवंतरावांनी हे हिमालयासारखे मोठे दु:ख निमूटपणे गिळले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी त्यांना त्यांच्या वैवाहिक जीवनात इतकी मोठी किंमत मोजावी लागली.

वेणूताई तुरूंगातून सुटल्या त्यावेळी यशवंतरावांचे मोठे बंधू ज्ञानदेव खूप आजारी होते. मधले बंधू गणपतराव यांना अटक करून तुरूंगात पाठविण्यात आले होते. थोरल्या बंधूंचा मधल्या बंधुवर खूप जीव होता. गणपतरावांची तुरूंगातून सुटका करून घेण्यासाठी मोठ्या बंधूंना आपण स्वत: आजारी असल्याचे सर्टिफिकेट डॉक्टरांकडून हवे होते. ज्ञानदेवांच्या पाठिला लहानसे आवळू उठले होते. या आवळूचे डॉक्टरांकडून ऑपरेशन करून घ्यावे व त्याचे सर्टिफिकेट पोलीसांत देऊन मधल्या भावाची तुरूंगातून सुटका करून घ्यावी असा निर्णय ज्ञानदेवांनी घेतला. त्यांची पत्नी व आईला हा निर्णय मान्य नव्हता. पण ज्ञानदेवांनी घरचा विरोध डावलून स्वत:चे ऑपरेशन करवून घेतले. विश्रांतीची गरज असताना ऑपरेशननंतर केवळ एक तास दवाखान्यात थांबवून त्यांना टांग्यातून घरी आणण्यात आले. जखम वाढत गेली. जखमेत सेप्टिक होऊन त्यांना निमोनिया झाला. आठ ते दहा दिवस ते जखमेशी झगडत होते. तुरूंगातून नुकत्याच सुटलेल्या वेणूताई मोठे दीर ज्ञानदेवांच्या सेवेसाठी होत्या. शेवटी परिस्थिती हाताबाहेर गेली. ज्ञानदेवांचा त्यातच अंत झाला. यशवंतराव आपल्या मोठया दादाला मुकले. भूमिगत असणाऱ्या यशवंतरावांना ज्ञानदेवांच्या निधनानंतर सुमारे पंधरा दिवसांनी पुण्यात ही दु:खद बातमी समजली. ते खूप कळवळले. वेणूताईंचा तुरूंगवास व मोठ्या भावाचा मृत्यू हे दोन मनाला तीव्र वेदना देणारे प्रसंग त्यांना सहन करावे लागले.

ज्ञानदेवांच्या मृत्यूसमयी त्यांच्या शेजारी बसून असणाऱ्या वेणूताईंना तो धक्का सहन झाला नाही. त्या बेशुद्ध पडल्या. यानंतर त्यांची प्रकृती दिवसें-दिवस बिघडत गेली. अशाप्रसंगी योग्य उपचार होणे गरजेचे होते. यशवंतराव आपला मुंबईचा मुक्काम हलवून पुण्यास आले. एका नातेवाईकामार्फत गाडी पाठवून पुढील उपचारासाठी वेणूताईंना पुण्यास आणण्यात आले. नामांकित

डॉक्टरांकडून उपचार सुरू होते. त्या वरचेवर बेशुद्ध पडत. या उपचाराने फारसा फरक न पडल्याने यशवंतरावांनी वेणूताईंना एका नातेवाईकासोबत आपल्या माहेरी फलटणला पाठविले. यशवंतराव भूमिगत असल्याने त्यांना वेणूताईसोबत राहणे शक्य नव्हते. वेणूताईंची वयस्कर चुलती व धाकट्या बहीण, भावाने त्यांची सेवा केली. वेणूताईंच्या प्रकृतीत मात्र फारसा फरक पडला नाही. त्यांची तब्येत अत्यंत चिंताजनक असल्याची बातमी यशवंतरावांना कळली. अस्वस्थ बनलेल्या यशवंतरावांनी काही झाले तरी फलटणला जायचेच असा निश्चय केला. रात्री भाड्याची टॅक्सी काढून प्रवास सुरू झाला. वाटेत नीरा स्टेशनजवळ गाडी बंद पडली. रात्रभर टॅक्सी ड्रायव्हरने केलेल्या खटापटीमुळे अखेर पहाटे टॅक्सी सुरू झाली. सूर्योदय होण्यापूर्वी यशवंतराव फलटणच्या सासुरवाडीच्या घरी पोहचले.

यशवंतरावांच्या दर्शनाने वेणूताईंना मोठा धीर आला. या शारीरिक आजाराप्रसंगी मानसिक आधाराची त्यांना खूप गरज होती. यशवंतरावांनी दिवसभर तेथे थांबून वेणूताईंची विचारपूस केली. डॉक्टर बर्वे यांना बोलावून वेणूताईंवर योग्य उपचार करवून घेतले. चांगल्या डॉक्टरकरवी वेणूताईंवर योग्य उपचार करवून घेण्यास सहकार्य करा असा आग्रह त्यांनी डॉक्टर बर्वेंकडे केला. त्यांनीही वेणूताईंवर योग्य उपचार केला जाईल असा शब्द यशवंतरावांना दिला. यशवंतराव फलटणला आल्याची वार्ता तोपर्यंत वाड्याबाहेर गेली होती. फलटण संस्थानच्या पोलीसांचा घराला वेढा पडला. यशवंतरावांचे धाकटे मेहुणे बाबासाहेब मोरे यांनी घरी येऊन यशवंतरावांना सांगितले,

''पोलीसांचा घराला वेढा पडला आहे.''

यशवंतरावांना कळून चुकले आता आपणाला अटक होणार. पोलीसांनी घरात प्रवेश करून यशवंतरावांना वेणूताईंच्या समोरच अटक केली. जाताना यशवंतरावांनी वेणूताईंना धीर देत म्हटले,

''मला काही होणार नाही. आता तू स्वत:च्या प्रकृतीची काळजी घे आणि फलटणला जास्त काळ न थांबता आईकडे कराडला जा.''

यशवंतरावांची राजबंदी म्हणून फलटण संस्थानच्या जेलमध्ये रवानगी झाली. त्यांच्या मातोश्रींना ही बातमी कळताच त्या यशवंतरावांना भेटण्यास जेलमध्ये आल्या. यशवंतरावांच्या मोठ्या भावाचे नुकतेच निधन झाल्याने ही माता खचली होती. यशवंतरावांना भेटताच मातेने हंबरडा फोडून आपल्या दु:खाला मार्ग मोकळा करून दिला. दोघे माय-लेकरे खूप वेळ दु:ख सागरात गढून गेली. काही वेळाने यशवंतरावांनी स्वत:ला सावरले. आईला धीर देण्याचा प्रयत्न केला. आईची समजूत काढून तिला शांत केले.

दहा दिवसांच्या वास्तव्यानंतर यशवंतरावांची रवानगी सातारा जेलमध्ये करण्यात आली. तेथे दोन आठवडे यशवंतराव होते. या जेलमध्ये दरोडे घालण्यात तरबेज असणाऱ्या एका भारदस्त शरीरयष्टीच्या म्हातारबा रामोशी कोतावडेकर यांच्याशी यशवंतरावांचा संपर्क आला. दरोडे घालण्याची पिढीजात परंपरा असणाऱ्या म्हातारबाकडून दरोडा घालण्याची पद्धत, पंचांग पाहून दिवस निश्चित करणे, आपल्या हद्दीतील पोलीस स्टेशनच्या बाहेर जाऊन दरोडा घालणे, दरोड्यातील पंचवीस टक्के रक्कम गरिबांना दान करणे, स्त्रियांच्या अंगावर हात टाकायचा नाही आदी दरोड्यासंबंधीचे नियम ऐकून यशवंतराव चकीत झाले.

साताऱ्याहून यशवंतरावांची कराड जेलमध्ये रवानगी झाली. यशवंतरावांवर खटला भरण्याचा निर्णय झाला. ऑगस्ट १९४२ मध्ये तांबवे येथील सभेत केलेल्या ब्रिटीशविरोधी भाषणाबद्दल खटला दाखल करण्यात आला. खटल्यातील आरोप यशवंतरावांनी मान्य केले. सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावून यशवंतरावांना पुण्याच्या येरवडा जेलमध्ये पाठविण्यात आले. पेशाने वकील असल्याने त्यांना न्यायाधिशांनी 'बी' वर्गाची शिक्षा घोषित केली. येरवडा जेलमध्ये राजबंदी असणाऱ्या सदाशिवराव पेंढारकर, स्वामी रामानंद भारती आदी मंडळींचा सहवास यशवंतरावांना लाभला. या काळात त्यांनी 'आर्थर कोस्लर'यांची 'डार्कनेस ॲट नून' ही कादंबरी वाचली. रशियातील स्टॅलिनच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्ट राजवटीने आपल्या विरोधकांच्या केलेल्या छळाची करूण कहाणी या पुस्तकात मांडली

होती. याकाळात इंग्लंडची औद्योगिक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती यासंबंधीच्या पुस्तकांचे वाहनही यशवंतरावांनी जेलमध्ये केले. त्यामुळे जागतिक इतिहासाचे चांगले ज्ञान त्यांना आले. तुरूंग हे जणू ज्ञान घेण्याचे एक चांगले विद्यापीठच यशवंतरावांच्या दृष्टीने ठरले.

तुरूंगातील राजबंद्यांशी चर्चा व वाचनात शिक्षेचे सहा महिने गेले. एकेदिवशी सकाळी त्यांना सांगण्यात आले,

"तुमची शिक्षा संपलेली आहे. आता तुम्हाला आम्ही सोडून देत आहोत."

जेलमधून अन्य सहकाऱ्यांचा निरोप घेऊन यशवंतराव बाहेर पडले. सरकारने दिलेले प्रवासाचे वॉरंट बरोबर घेऊन रेल्वेने यशवंतराव कराड स्टेशनवर पोहचले. तो प्रसंग जानेवारी १९४४ चा होता. स्टेशनवरून टांग्यात बसून यशवंतराव आपल्या घरी आले. वाटेत लोकांनी त्यांचे स्वागत केले. सुमारे वर्षभरानंतर यशवंतराव आपल्या घरी आले होते. मधले बंधु गणपतरावही नुकतेच जेलमधून सुटून घरी आले होते. क्षयाच्या विकाराने ते त्रस्त झाले होते. डॉक्टरांना दाखवून त्यांच्यावर औषधोपचार करवून घेण्यात आले. पत्नी वेणूताईंच्या प्रकृतीची विचारपूस करण्यात आली. वेणूताईंच्या आग्रहास्तव यशवंतराव वेणूताईंसोबत दोन दिवसांच्या मुक्कामाकरता फलटणला आले. पोलीस कायद्याचे उल्लंघन केल्याने पुन्हा यशवंतरावांना फलटणमधून अटक करण्यात आली. वेणूताई पश्चात्तापाने उद्‌गारल्या, "मी तुम्हाला फलटणला यायचा आग्रह कशाला केला?"

पत्नीची समजूत घालून तिला पोलीसांची परवानगी घेऊन यशवंतरावांनी कराडला पोहचते केले. यशवंतरावांची पुन्हा पुण्यात येरवडा कारागृहात रवानगी झाली. तीन महिन्याच्या शिक्षेनंतर त्यांची पॅरोलवर सुटका झाली. आपल्यामुळे आपल्या कुटुंबियांना खूप त्रास सहन करावा लागतो आहे. आता काही झाले तरी घराकडे लक्ष द्यायचेच, असा निर्णय यशवंतरावांनी घेतला.

बंधू गणपतरावांची प्रकृती बिघडत चालली होती. त्यांना मिरजेला उपचारासाठी आणण्यात आले. त्यांच्या सेवेला गणपतरावांची पत्नी व मोठी

बहीणही होती. यशवंतराव आपली वकिली पुन्हा सुरू करून गणपतरावांवरील उपचार व कुटुंबाचा खर्च पाहू लागले. घराला थोडीशी स्थिरता आली. याकाळात सातारा जिल्ह्यात प्रतिसरकारने मोठा जोर धरला होता. अनेक कार्यकर्ते भूमिगत राहून चळवळ वाढवत होते. १९४४-४५ मध्ये दुसऱ्या जागतिक महायुद्धाने गती घेतली होती. हिंदुस्थानला काही वर्षातच स्वातंत्र्य द्यावे लागणार हे स्पष्ट होऊ लागले होते. इंग्लंडमधील निवडणुकीत चर्चिल सरकार सत्तेवरून पायउतार होऊन त्याजागी मजूर पक्षाचे क्लेमंट अॅटली यांचे सरकार सत्तेवर आले. पुढे हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने अॅटली सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला.

१९४२ च्या 'चले जाव' लढ्यातील अनेक नेते आता तुरूंगातून सुटले होते. १९४५ मध्ये म. गांधी विश्रांतीसाठी पाचगणीला आले होते. यशवंतराव आपल्या काही सहकाऱ्यांना घेऊन गांधीजींना भेटले. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीची माहिती गांधीजीसमोर कथन केली. काही कालावधीतच पंडित नेहरूंनीही मुलाखतीद्वारे भूमिगत चळवळीला पाठिंबा व्यक्त केला. यशवंतरावांसह भूमिगत चळवळीत काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला त्यामुळे नैतिक बळ मिळाले.

बंधु गणपतरावांच्या प्रकृतीत सारखा चढउतार होत होता. १९४५ च्या अखेरीस त्यांची प्रकृती खूपच खालावली. यशवंतराव बंधुंच्या सेवेसाठी मिरजेतील दवाखान्यात होते. यावेळी प्रांतिक विधी मंडळासाठी निवडणूका येऊ घातल्या होत्या. काही कार्यकर्ते दवाखान्यात येऊन त्यांनी यशवंतरावांना निवडणूक लढविण्याचा आग्रह केला. बंधू आजारी असताना त्यांना सोडून निवडणूक लढविणे यशवंतरावांना पटले नाही. अखेरीस बंधू गणपतरावांनीच सांगितले,

"माझ्या आजारासाठी तू जर ही निवडणूक लढवणार नसलास, तर या दवाखान्यात मी क्षणभरही राहणार नाही. दुराग्रह सोडून निवडणुकीला तयार रहा."

अखेरीस बंधू गणपतरावांच्या आग्रहास्तव यशवंतरावांनी निवडणूक

लढविली. त्यांच्यासह सातारा जिल्ह्यातील काँग्रेसचे चारही उमेदवार प्रचंड मतांनी विजयी झाले. निवडणूक प्रचारात बंधू गणपतराव आपला आजार विसरून सहभागी झाले. मिरजेहून त्यांनी आपला मुक्काम कराडला हालविला. प्रत्यक्ष मतमोजणीला यशवंतरावांचे प्रतिनिधी म्हणून स्वतः गणपतराव साताऱ्याला गेले. निवडणुकीच्या राजकारणात यशवंतरावांचा प्रवेश केवळ बंधू गणपतरावांच्यामुळेच झाला. यानंतर त्यांनी आपल्या आयुष्यातील पुढल्या ४० वर्षात एकंदर दहा निवडणुका लढविल्या. या सर्व निवडणुकीत ते विजयी झाले. राजकारणात ते सर्वोच्च स्थानावर जाऊन पोहचले. या दैदिप्यमान वाटचालीचा प्रारंभ मात्र आपल्या बंधुमुळेच झाल्याचे यशवंतराव आर्वजून सांगतात.

मार्च, १९४६ च्या निवडणुकीनंतर काँग्रेस पार्लमेंटरी पार्टीची सभा मुंबईत झाली. के.डी.पाटील, श्री.गौरीसिंह सिंहासने व यशवंतराव एका खाजगी मोटारीने मुंबईला गेले. तेथील माधवाश्रम येथे त्यांचा मुक्काम होता. पक्षाच्या सभेत बाळासाहेब खेर यांची पक्षनेता म्हणून निवड करण्यात आली. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री बनले. यानंतर मंत्रिमंडळ बनविण्याची चर्चा सुरू झाली. यशवंतरावांना मंत्रिमंडळात जाण्यात विशेष रस नव्हता. त्यांच्या काही विधीमंडळ सदस्यांनी यशवंतरावांना आग्रह केला. बाळासाहेब खेर, मोरारजीभाई देसाईंना आपण मंत्रिमंडळात घेण्यासंदर्भात भेटून आग्रह करावा असे सुचविले. यशवंतराव आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले,

"मला मंत्रिमंडळात जाण्याची मुळीच इच्छा नाही. शिवाय आपलं काम आणि आपलं नाव पुढाऱ्यांना माहित पाहिजे, नाहीतर ते कसले पुढारी."

एकेदिवशी आमदार बाबासाहेब शिंदे व वकील व्यवसाय करणारे माधवराव देशपांडे 'माधवाश्रम' येथे येऊन यशवंतरावांना घेऊन गेले. कुठे जायचे आहे याची कल्पना त्यांनी यशवंतरावांना दिली नाही. मोटारीने बराच वेळ प्रवास केल्यानंतर त्यांना सांगण्यात आले, "बाळासाहेब खेरांनी तुम्हाला बोलवले आहे."

काही वेळानंतर बाळासाहेब खेर यांच्या बंगल्यापाशी गाडी थांबली.

बंगल्यात प्रवेश करताच बाळासाहेब पुढे आले व त्यांनी हसून सर्वांचे स्वागत केले. बाळासाहेब खेर यशवंतरावांना म्हणाले,

"मी तुम्हाला मंत्रिमंडळात घेऊ शकत नाही. पण पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मी तुमची निवड करत आहे."

यशवंतरावांना पार्लमेंटरी सेक्रेटरीपदात विशेष रस नव्हता. ते म्हणाले,

"मी घरी जाऊन येतो. मी काही तातडीने हजर होणार नाही."

बाळासाहेबांचा निरोप घेऊन हे तिघे बाहेर पडले. आमदार बाबासाहेब शिंदे गाडीत बसल्यावर यशवंतरावांना म्हणाले,

"यशवंतराव, चूक कराल हं! नाही म्हणू नका."

कराडला परत आल्यावर बंधू गणपतरावांनीही पार्लमेंटरी सेक्रेटरीपद स्विकारण्याचा सल्ला दिला. पत्नी वेणूताईंना विचारताच त्या बोलल्या,

"आजपर्यंत एवढे कठीण निर्णय घेतलेत, तेव्हा तुमच्या मनात चलबिचल नव्हती. मग आताच असं का?"

पत्नी वेणूताईंच्या संमतीनंतर यशवंतरावांनी आपल्या मातोश्रींना विचारले. त्या म्हणाल्या,

"मला तुझ्या राजकारणातलं काही समजत नाही. पण तुला काही नवीन काम करण्याची संधी चालून आली आहे. आता नाही म्हणू नकोस."

शेवटी सर्वांच्या आग्रहास्तव यशवंतरावांनी मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला. आईच्या पायावर डोके ठेवून तिचा आशीर्वाद घेतला. पत्नीचा निरोप घेतला. यशवंतरावांनी मुंबईत पोहचल्यावर पार्लमेंटरी सेक्रेटरीपदाची जबाबदारी स्विकारली. राजकारणातील नव्या अध्यायाला सुरूवात झाली.

यशवंतराव राजकीय क्षेत्रात 'साहेब' या नावाने परिचित होते. घरात मात्र सर्व भावांची मुले त्यांना 'काका' म्हणून हाक मारीत. त्यांचे मधले बंधू गणपतराव यांच्या निधनानंतर गणपतरावांचा मुलगा अशोकराव याच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी यशवंतरावांनी पार पडली. १९५१ च्या दरम्यान यशवंतराव पार्लमेंटरी बोर्डाचे सेक्रेटरी होते. त्यांच्या मुंबई-दिल्ली वाऱ्या सतत होत असत. यावेळी बंधू गणपतराव व त्यांच्या पत्नीचे निधन झाल्याने

यशवंतरावांनी त्यांच्या मुलांच्या पालनपोषणाकडे विशेष लक्ष दिले. पुतणे अशोकराव यांना त्यांनी बोर्डी, जि.ठाणे येथील शारदाश्रम वसतिगृहात शिक्षणासाठी ठेवले. अन्य दोन मुलांची पुण्यात शिक्षणाची सोय केली. अशोकराव मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले, त्यावेळी यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होती. अशोकरावास जवळ घेऊन यशवंतरावांनी सांगितले,

"अशोक, झालं ते सारं विसरून जा. पुन्हा मन लावून अभ्यास कर."

अशोकची शिक्षणात रूची नाही हे लक्षात येताच, यशवंतरावांनी त्यास पुण्यात व्यवसायाचे प्रशिक्षण दिले व पुढे कराडमध्ये दोन लेथ मशिन घेऊन व्यवसायात गुंतविले. काही काळ अशोकने ट्रान्सपोर्टचा व्यवसाय केला. या काळातील एक आठवण सांगताना अशोकराव म्हणतात,

"एकदा मी माझ्या ट्रकमधून मुंबईहून कराडकडे जात असताना लोणावळा घाटाजवळ मागून काकांची गाडी आली. गाडीत ताई (वेणूताई) होत्या. वाहनांच्या गर्दीतून काकांनी (यशवंतराव) माझी गाडी पटकन ओळखली. ट्रक थांबविण्याची सूचना करून माझी व घरातल्यांची चौकशी त्यांनी केली. मी अजून जेवायचो आहे हे लक्षात येताच गाडीतील डबा काढून दिला व सांगितले, अशोक वेळेत जेवत जा. प्रकृतीकडे लक्ष दे."

यशवंतराव मुख्यमंत्री असताना, त्यांचे मेहुणे बाबासाहेब मोरे व पुतणे अशोकराव चव्हाण यांना त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. यशवंतराव प्रशासन किती कुशलतेने हाताळतात, हे त्यांना जवळून पहावयास मिळाले. कोणताही कागद हातात आल्यावर एका दिवसातच तो पुढील कार्यवाहीसाठी ते पाठवित. त्यांच्या कामाची गती प्रचंड होती. प्रत्येक पत्राला उत्तर देण्याची तत्परता ते दाखवत. ते बोलण्यात खूपच स्पष्टवक्ते होते. यशवंतरावांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांचे पुतणे त्यांच्याजवळच मुंबईतील बंगल्यात राहत होते. त्यावेळी यशवंतराव म्हणाले,

"अशोक तू माझ्या बंगल्यात राहतोस, कोणाकडून कामासाठी पैसे घेतल्याचे मला समजले तर या बंगल्याचे दरवाजे तुझ्यासाठी कायमचे बंद होतील."

यशवंतरावांनी सार्वजनिक जीवनात स्वतःच्या चारित्र्याला खूप जपले. आपल्या पदाचा गैरवापर आपल्या कुटुंबियांनाही त्यांनी करू दिला नाही. जे मिळवायचे ते स्वप्रयत्नाने व कष्टपूर्वकच हा त्यांचा दंडक होता. सारा देश त्यांना साहेब म्हणत होता, पण ते साहेबासारखे कधीच वागले नाहीत. केंद्रात संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी स्विकारल्यावर त्यांनी मुख्यमंत्र्यांचा मुंबईतील सह्याद्री बंगला आठ दिवसांत सोडून आपल्या कुटुंबाची व्यवस्था त्यांनी एका खाजगी ठिकाणी केली. ते वेळेला व वचनाला खूप पक्के होते.

निवृत्त सनदी अधिकारी व माजी खासदार श्रीनिवास पाटील यशवंतरावांच्या आठवणी सांगताना म्हणतात,

''आम्ही यशवंतरावांना काका असे म्हणायचो. वयाच्या चौथ्या वर्षापासून मी त्यांना पहात आलो आहे.'' यशवंतराव द्विभाषीक राज्याचे मुख्यमंत्री असताना पुण्यात शिकत असणाऱ्या श्रीनिवास पाटील यांनी सातारा विद्यार्थी संघटना सुरू केली होती. याच्या उद्घाटनास यशवंतराव आले होते. त्यावेळी श्रीनिवास पाटील एस.पी.कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. डेप्युटी कलेक्टरची परीक्षा पास झाल्यानंतर ते पेढे घेऊन यशवंतरावांना भेटण्यास गेले. त्यावेळी यशवंतराव म्हणाले,

''हे पेढे एल.एल.बी.चे की उपजिल्हाधिकारी परीक्षेतील यशाचे श्रीनिवास लक्षात घे, शासकीय सेवेत जाण्यासाठी तुझा होकार असेल तर मी पेढा खाईन.''

श्रीनिवास पाटील यांना प्रशासकीय सेवेत जाण्याचा सल्ला यशवंतरावांनीच दिला. पुढे यशवंतरावांचे मानसपुत्र शरद पवारांच्या सहकार्यातून श्रीनिवास पाटील कराड लोकसभा मतदार संघातून खासदार झाले. शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी यशवंतरावांचा पुतळा संसद भवनच्या प्रवेश द्वारापाशी उभा केला. श्रीनिवास पाटील प्रथम खासदार झाले, त्यावेळी संसदेत प्रवेश करताना यशवंतरावांच्या पुतळ्यासमोर ते नतमस्तक झाले. जुन्या आठवणी त्यांच्या डोळ्यासमोर तरळून गेल्या.

१९५८ - ५९ मध्ये बेळगांव, निपाणी, कारवार सीमा भागात संयुक्त

महाराष्ट्र चळवळीचे आंदोलन उग्र बनले होते. त्यावेळी बेळगांवचे तत्कालीन जिल्हा पोलीस प्रमुख श्री.लुईस यांनी दिलेल्या आदेशाने आंदोलकांवर बेछुट गोळीबार करण्यात आला. नऊ आंदोलकांचा बळी गेला. यावेळी महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजारामबापू पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ बेळगांवला पाठवून घडलेल्या परिस्थितीची माहिती यशवंतरावांनी घेतली. याचा योग्य तो परिणाम होऊन श्री.लुईस यांची उचलबांगडी होऊन त्यांची रवानगी आसामला करण्यात आली.

यशवंतरावांचे साहित्यप्रेम सर्वश्रुत आहे. दिवसांत किमान ५० पाने वाचल्याशिवाय ते झोपत नसत. मोटार प्रवास व विमान प्रवासात ते आपला वाचनाचा छंद जोपासत. यशवंतरावांनी विकत घेतलेल्या पुस्तकांची निगा राखण्याचे काम वेणूताईंना करावे लागे. सध्याचा विचार करता राजकीय नेते वाचन, साहित्यप्रेम व साहित्यिक, विचारवंतापासून फटकून राहत असल्याचे दिसून येते. विचारवंत, साहित्यिक यापैकी कोणाचे निधन झाल्यास पांढरी वस्त्रे परिधान करून १५-२० मिनिटे सांत्वनासाठी अगर अंत्यदर्शनासाठी जायचे आणि मोठी पोकळी निर्माण झाली आहे अशा पद्धतीची ठोकळ प्रतिक्रिया व्यक्त करायची या पलिकडे आजच्या राजकारण्यांची फारशी मजल जात नाही. यशवंतरावांचे मात्र साहित्यजगताशी खूपच जवळचे संबंध होते. पु.ल.देशपांडेंच्या विनोदी वक्तृत्वावर ते पोट धरून हसत. ग.दि.माडगुळकरांच्या गीत रामायणातील काव्ये त्यांना तोंडपाठ होती. ना.धो.महानोर या ख्यातनाम कवीशी त्यांनी आयुष्यभर ऋणानुबंध जपले.

ख्यातनाम कादंबरीकार रणजीत देसाई यांच्या 'स्वामी' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यावेळी यशवंतराव केंद्रीय गृहमंत्री होते. ज्यावेळी रणजीत देसाई 'स्वामी'ची प्रत घेऊन यशवंतरावांच्या निवासस्थानी गेले त्यावेळी यशवंतराव म्हणाले, ''माझ्याकडे 'स्वामी'ची प्रत असून मी ती वाचली आहे. 'स्वामी'ला पुरस्कार मिळाला. त्याबद्दल मला अत्यानंद झाला आहे. पण, रणजीत तुम्ही एवढ्यावरच थांबू नका.

यापेक्षाही अधिक दर्जेदार लेखन करा.'' यशवंतरावांनी मोगऱ्यांचा हार रणजीत देसाईंच्या गळ्यात घालून त्यांचे अभिनंदन केले. पुढे रणजीत देसाईंनी 'श्रीमान योगी' कादंबरी लिहिली. त्यावेळी मुंबईत स्वत: येऊन यशवंतरावांनी त्यांच्या हातात सोन्याचे कडे घातले.

बा.भ.बोरकर, मंगेश पाटगांवकर, कवी अनिल, पु.भा.भावे, वसंत कानेटकर, वसंत सबनीस, चितरंजन कोल्हटकर, लक्ष्मण माने आदी असंख्य साहित्यिकांशी यशवंतरावांचा घनिष्ट संबंध होता. साहित्य क्षेत्राबरोबरच शास्त्रीय संगीताचेही ते चांगले भोक्ते होते. बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर, कुमार गंधर्व, पं. भीमसेन जोशी, अब्दुल करीम खाँ यांच्या गायनाच्या मैफिलींना ते आर्वजून उपस्थित राहत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना यशवंतरावांनी पं.भीमसेन जोशींच्या गायनाची मैफल नागपूरमध्ये आयोजित केली होती. यावेळी लोडतक्क्यावर काही आमदार, खासदार मंडळी एकमेकांशी गप्पा मारण्यात गर्क होती. मध्यंतरानंतर व्यासपीठावर जाऊन यशवंतरावांनी, 'ज्यांना कुणाला गुजगोष्टी मारायच्या असतील, त्यांनी घरी जावे.' असा दम मारला. एकंदरीत यशवंतरावांचे संगीतप्रेम हे विलक्षण होते. वेणूताईंच्या निधनानंतर त्यांच्या पुण्यतिथीला कराडमध्ये यशवंतरावांनी पं.भीमसेन जोशींच्या शास्त्रीय संगित गायनाचा कार्यक्रम ठेवला होता.

राज्याचा कृषी औद्योगिक विकास व्हावा यासाठी यशवंतराव व केंद्रीयमंत्री अण्णासाहेब शिंदेंनी मोठे योगदान दिले. शेती व उद्योग यांची सांगड घालण्याचे काम त्यांनी चांगल्याप्रकारे केले. यशवंतरावांच्या कारकीर्दीतच त्रिस्तरीय ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेची स्थापना झाली. त्यानुसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची निर्मिती करण्यात आली. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणाची मुळे ग्रामीण भागात रूजली गेली. कोयना व उजनी जलविद्युत प्रकल्प उभारले गेले. राज्यात कृषी विद्यापीठे स्थापण्यास प्रारंभ झाला. त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रात सुमारे अठरा सहकारी साखर कारखाने सुरू झाले. सहकार क्षेत्राबरोबरच उद्योग क्षेत्राच्या उभारणीतही त्यांचे मोलाचे योगदान होते. किर्लोस्कर उद्योग समूहाचे प्रमुख

शंतनुराव किर्लोस्करांशी त्यांचा 'छोडो भारत' आंदोलनापासून चांगला स्नेह होता. भूमिगत असताना यशवंतराव अनेकदा किर्लोस्करवाडीला येऊन राहत असत. पुण्याचा औद्योगिक विकास व्हावा, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. शेती व प्रवास यासाठी उपयुक्त ठरणारी लहान विमाने बनविण्याच्या शंतनुराव किर्लोस्कराच्या योजनेला यशवंतरावांनी पाठिंबा दिला. पण नागरी हवाई वाहतूक व विमान निर्मिती क्षेत्रात खाजगी उद्योगाला परवानगी नसल्याने ही योजना प्रत्यक्षात कार्यान्वित होऊ शकली नाही.

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखानदारी वाढवण्यास वसंतदादा पाटील यांना यशवंतरावांनी मोठे पाठबळ दिले. राज्यात खरेदी-विक्री संघ, दूध संघ, प्रक्रिया संघ, ग्राहक संघ, सेवा सोसायटी, सहकारी बँका अशा माध्यमातून सहकाराचे जाळे विणण्यात यशवंतरावांची कल्पकता व परिश्रम प्रामुख्याने कारणीभूत आहेत. महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना सुरू करणारे विठ्ठलराव विखे-पाटील, अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ, वैकुंठभाई मेहता यांच्याशी यशवंतरावांची सहकाराच्या वृद्धीसाठी सतत चर्चा होत असे. त्यांच्या कार्याचा आवाका इतका प्रचंड होता की, ते कधी कार्यशून्य अवस्थेत बसले आहेत, असे सापडणे केवळ अशक्य असे.

खेळाडू, कलावंत, गायक, अभिनेते, सिनेमा दिग्दर्शक, पत्रकार, साहित्यिक, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ, उद्योजक अशा समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांशी असणारे ऋणानुबंध त्यांनी आयुष्यभर जपले.

मुंबईत हॉटेल कामगारांना संघटित करण्याचे काम जॉर्ज फर्नांडीस यांनी केले. त्यावेळी 'हॉटेल कामगारांवर अन्याय करू नका.' असा गर्भीत इशारा यशवंतरावांनी हॉटेल मालकांना दिला.

एकदा शिरूरला (घोडनदी) यशवंतरावांची सभा झाली. सभेत भाषण करताना यशवंतरावांनी १९४२ च्या लढ्यात आपल्याला घरात आश्रय देणाऱ्या एका शिंप्याची आठवण सांगितली. त्यावेळी सभेत उपस्थित असणारा शिंपी ओरडून म्हणाला, 'मी जीवंत हाये.' यशवंतरावांनी त्या दृष्टी कमी झालेल्या शिंप्यास स्टेजवर बोलावून घेऊन त्याची विचारपूस केली. त्याच्या मुलास

जिल्हा परिषदेत नोकरी लावून त्याच्या कुटुंबास आर्थिक मदतही केली. यशवतरावांच्या जीवनातील असे कितीतरी अनुभव त्यांच्यातील गरिबांबद्दलची कणव व दिलदारपणाची साक्ष देतात.



**चौफेर वाटचाल**

# ९. चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व

लोकनेते यशवंतराव चव्हाण जर राजकारणात आले नसते तर एक थोर साहित्यिक म्हणून नावारूपास आले असते, असे त्यांच्याबद्दल अनेक नामवंत साहित्यिकांनी नमूद करून ठेवले आहे. चव्हाणसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू त्यांच्या वाटचालीतून स्पष्ट होतात. जीवनाचे नम्र उपासक असलेल्या चव्हाणसाहेबांच्या प्रत्येक कृतीत व बोलण्यात सहजता असायची. कोणतेही काम सहजपणे हाताळण्याची कुशलता हा अन्य कोणामध्ये सहजासहजी न आढळणारा पैलू यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये होता.साहित्य, वृत्तपत्र संपादक, उद्योजक, कलाकार, शिक्षणतज्ज्ञ, राजकारण अशा समाजातील विविध स्तरात यशवंतरावांचा खूप मोठा मित्रपरिवार होता. कोणत्याही क्षेत्रातील माणसांत ते सहजपणे मिसळत. राजकारणात अनेक चढउतार पाहिलेल्या व आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर देशभर नावलौकिक मिळविलेल्या यशवंतरावांचा सामान्यातील सामान्य माणसाशी थेट संबंध होता. शेतकरी हा विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांनी राजकारण केले. भाषावाद, प्रांतवाद ही समस्या देशाला विनाशाच्या गर्तेत नेणारी आहे. प्रत्येक भारतीयाने राष्ट्रवाद जोपासला पाहिजे हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. राजकारणातील तत्त्वनिष्ठता त्यांनी आयुष्यभर जोपासली. गल्लीपासून दिल्लीपर्यंत स्वयंतेजाने तळपणारे हे व्यक्तिमत्त्व प्रत्येक भारतीयास हवेहवेसे वाटत राहिले. यशवंतरावांची व्यापक दृष्टी, चौफेर वाटचाल, विविध क्षेत्राशी असणारा संबंध म्हणूनच एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले गेले.

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यातील अनुभव हाच यशवंतराव चव्हाणसाहेबांचा खऱ्या अर्थाने गुरू मानावा लागेल. यशवंतरावांचा राजकारणातील प्रवेशही काहीसा वेगळ्या पद्धतीने झाला. तो काळ पारतंत्र्याचा होता. नव्यानेच निर्माण झालेल्या मुंबई राज्यासाठी १९४६ साली निवडणूक झाली. सत्तास्थानी आलेल्या काँग्रेसने मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून बाळासाहेब खेर यांची निवड केली. नवीन मंत्रिमंडळ बाळासाहेब खेर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण

करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. दक्षिण सातारा मतदारसंघातून विधिमंडळ सदस्य म्हणून निवडून आलेले यशवंतराव आपले अन्य सहकारी सदस्यांबरोबर मुंबईस पोहचले. मुंबई राज्याच्या गृहमंत्रीपदावर निवड झालेल्या मोरारजीभाई देसाईंनी यशवंतरावांची मागणी गृहखात्याच्या पार्लमेंटरी सेक्रेटरीपदासाठी केली. यशवंतरावांची मात्र राज्याच्या मंत्रिमंडळात काम करण्याची इच्छा होती. पण वरिष्ठाकडूनच पार्लमेंटरी सेक्रेटरी पदासाठी आपल्या नावाची मागणी झाल्याने यशवंतरावांनी ती जबाबदारी आनंदाने स्विकारली. प्रथम मिळालेली संधी म्हणजे पुढील वाटचालीचा पाया आहे हे जाणून घेऊन यशवंतरावांनी कामाला प्रारंभ केला. आपले ज्ञान, कल्पकता, नवी दृष्टी व कामात झोकून घेण्याची वृत्ती यातून त्यांनी आपल्या कामाचा वेगळाच ठसा त्याकाळात मुंबई राज्यात उमटविला. त्यांच्या कामावर खुश झालेल्या मुख्यमंत्री बाळासाहेब खेर व मोरारजी देसाईंनी यशवंतरावांना लवकरच मंत्रिमंडळात घेतले. मंत्रिमंडळात सहभागी झाल्यावर त्यांची राजकारणातील चौफेर वाटचाल सुरू झाली. राज्याच्या मंत्रिमंडळात पुढील काळात त्यांनी वेगवेगळ्या खात्याचा कारभार पारदर्शकपणे व कार्यक्षमपणे हाताळला. कामाची गती, निर्णयक्षमता व चौफेर दृष्टी यातून यशवंतरावांची राजकीय वाटचाल बहरत गेली. नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री बनण्याचा मान त्यांना १ मे १९६० रोजी मिळाला. पुढीलकाळात महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावांनी फार मोठे योगदान दिले. त्यांच्या या कार्याची पोचपावती म्हणूनच यशवंतरावांकडे **'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार'** म्हणून पाहिले गेले.

चव्हाणसाहेबांचे वाचन प्रचंड होते. दिवसातील १२ ते १५ तास काम केल्यानंतरही रात्रीचे वाचन केल्याशिवाय ते झोपत नसत. रात्री जेवणानंतर सुमारे तास - दीडतास ते वाचन करत. एकाचवेळी चार-पाच पुस्तके वाचण्यास घेत. वेगवेगळ्या पुस्तकातील संदर्भ वेगवेगळ्या कारणासाठी वापरत. दिवसभराच्या व्यापातूनही चाळीस ते पन्नास पाने न चुकता वाचन करत. प्रवास करताना वाचनाचे साहित्य वेगळे असे. त्यामध्ये प्रामुख्याने मासिके व

वृत्तपत्रांचा सहभाग अधिक असायचा. चौफेर वाचनामुळे त्यांचे ज्ञान सर्वस्पर्शी बनले. या वाचनातूनच त्यांच्यात विविध कादंबऱ्यांचे समिक्षण करण्याचे सामर्थ्य निर्माण झाले. रिकाम्या वेळेत वाचनाचा छंद त्यांनी चांगल्यापद्धतीने जोपासला. कोल्हापूरात महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शिवाजी पेठेतील भुसारी वाड्यात यशवंतराव रहाण्यास होते. त्याकाळात त्यांचा एक मित्र यशवंतरावांकडे ख्यातनाम साहित्यिक वि. स. खांडेकर यांची 'दोन ध्रुव'ही कादंबरी घेऊन आला. ते दिवस पावसाळ्याचे होते. दुपारच्या वेळी यशवंतरावांनी ती कादंबरी हातात घेतली. या नव्या कोऱ्या पुस्तकाच्या पानांचा येणारा सुरेखसा वास हुंगत यशवंतरावांनी 'दोन ध्रुव' ही कादंबरी बसल्या बैठकीलाच वाचून पूर्ण केली. या कादंबरीतून खांडेकरांनी समाजमनाचा घेतलेला मागोवा यशवंतरावांच्या मनाला भावला. यशवंतरावांच्या मनातील भावूकता या कादंबरीने जागृत केली. साहित्यावर प्रेम करण्याची ओढ त्यांना या कादंबरीमुळेच लागली. पुढील काळात चव्हाणसाहेबांनी अनेक साहित्यिकांच्या साहित्यकृतीचे वाचन केले. भालचंद्र नेमाडे, अरूण साधू, ना. धो. महानोर, अनिल अवचट, ग. दि. माडगूळकर व नव्या दमाचे उपेक्षित समाजाचे साहित्यिक लक्ष्मण माने यांच्या साहित्यावरही यशवंतरावांनी भरभरून प्रेम केले. विविध साहित्यिकांच्या साहित्यसंपदेवर त्यांनी अभ्यासपूर्ण भाष्य केले. अनेक साहित्यिकांनी दिलेल्या निमंत्रणाचा यशवंतरावांनी आनंदाने स्वीकार केला. विविध साहित्य-संमेलनांना आवर्जून उपस्थिती लावली. कधी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तर कधी अध्यक्ष म्हणून ते उपस्थित रहात. साहित्य, कला, संस्कृतीवरील आपले प्रेम त्यांनी आपल्या भाषणातून या संमेलनांत व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांच्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मांडलेल्या प्रतिक्रियेतून अधिक चांगल्या रितीने स्पष्ट होतात. चव्हाणसाहेबांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची प्रचिती तमाम मराठी बांधवास या प्रतिक्रिया वाचल्यानंतर येते.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व सध्याचे केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्र पवार

यशवंतराव चव्हाणसाहेबांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हणतात, ''यशवंतराव चव्हाणसाहेबांबरोबरचे आपले वैयक्तिक संबंध व त्यांचे मिळालेले राजकीय मार्गदर्शन याचा माझ्या सुरवातीच्या राजकीय जीवनात मला फार मोठा फायदा झाला. माझ्यावर त्यांचे अपार ऋण आहेत. मी ते कधीही विसरू शकणार नाही. ते केवळ आधुनिक महाराष्ट्राचेच शिल्पकार नव्हते, तर एक महान देशभक्त होते. चव्हाणसाहेबांचा लोकशाही समाजवादावर दृढ विश्वास होता. भारत हे एक कणखर व स्थिर राष्ट्र व्हावे असे त्यांचे स्वप्न होते. देशाचे सार्वभौमत्व टिकविण्याच्या दृष्टीने सामाजिक विषमता रहित देश त्यांना बनवायचा होता. हा देश धर्मनिरपेक्ष असलाच पाहिजे या तत्त्वावर त्यांची दृढ निष्ठा होती.''

'दै. मराठा' या वृत्तपत्रांचे संपादक व ख्यातनाम वक्ते, थोर साहित्यिक आचार्य प्र. के. अत्रे यशवंतरावांबद्दल म्हणतात, ''यशवंतरावांच्या बुद्धिमत्तेचा पल्ला केवळ राजकारणापुरताच मर्यादित नाही, तर ते एक साहित्यप्रेमी, कलाप्रेमी व नाट्यरसिक आहेत. त्यांना समाजजीवनाच्या सर्व अंगांविषयी रस आहे. ते उत्कृष्ट वक्ते आहेत, संभाषणचतुर आहेत, शिष्टाचारात निपुण आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न आहे, म्हणूनच आम्हाला त्यांच्याविषयी आपुलकी वाटते.''

मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या दै. महाराष्ट्र टाइम्सचे माजी संपादक द्वा. भ. कर्णिक म्हणतात, ''ना. यशवंतराव चव्हाण यांनी पंडितजींवर, काँग्रेसश्रेष्ठींवर व दिल्लीवर छाप टाकली. आपल्या निष्ठेची पक्षश्रेष्ठींना जाणीव करून देताना त्यांनी ती अबोल कर्तृत्वाने करून दिली हे विशेष आहे. ना. यशवंतराव चव्हाण दिल्लीच्या लोकांना प्रभावित करतात ते त्यांच्या मुंबई व महाराष्ट्र राज्यातील कर्तृत्वाने. त्यांचे दर्शन वा भेट ज्यांना होते त्यांना ते अघळपघळ बोलताना दिसत नाहीत. अवास्तव घोषणा करताना तर मुळीच दिसत नाहीत. यशवंतराव चव्हाण यांचा व्यासंग चांगला असून, बोलण्यात ते वाक्बगार आहेत. त्यांचे बोलणे मोजके व मुद्देसूद होते. राजकीय जीवनात लोकांना कृतिशून्य पण शब्दसूर लोकांच्या तोंडाचा पट्टा चाललेला ऐकण्याची सवय

झालेली आहे. या स्थितीतही अबोल व मितभाषी अशा ना. यशवंतरावांची त्यांच्यावर मोहिनी पडली हे विशेष मानावे लागेल.''

पत्रपंडित पां. बा. गाडगीळ म्हणतात, ''दिल्लीत मंत्रिमंडळात जाऊनही ज्यांनी महाराष्ट्रात आपला पाठिंबा टिकविला. महाराष्ट्राच्या दैनंदिन प्रश्नात आपले लक्ष कायम ठेवत, महाराष्ट्राची प्रतिष्ठा दिल्लीत वाढवली. या तीनही गोष्टी एकट्याने करणारे यशवंतराव चव्हाण पहिलेच महाराष्ट्रीय पुढारी आहेत. आर्थिकदृष्ट्या महाराष्ट्र मागासलेला आहे म्हणून अंतर्गत राजकीय तेढी महाराष्ट्रास परवडणार नाहीत याची पूर्ण जाण असलेले व ती सतत मनांशी बाळगून गेली कित्येक वर्षे वागत आलेले ना. यशवंतराव हेच पहिले महाराष्ट्रीय पुढारी आहेत.''

साप्ताहिक 'गतिमान'चे संपादक श्री. नरूभाऊ लिमये लिहितात, ''राजकारणाच्या मैदानातील अष्टपैलू यशवंत खेळाडू माझ्या संघाला विजय मिळवून द्यावयाचा आहे, असे यशवंतरावांचे वर्णन करून यशवंतरावजींचे मोठेपण त्यांच्या साडेतीन हात देहात सामावलेले नाही, त्यांच्या वैयक्तिक मान सन्मानात सामावलेले नाही, तर त्यांनी महाराष्ट्राकरता आणि महाराष्ट्रातर्फे देशाकरता केलेल्या कामात, सोसलेल्या यातनात सामावलेले आहे. महाराष्ट्र निर्मितीच्या महाभारतात मराठी मनावर एवढे आघात झालेले होते की, केंद्रातून न्याय मिळत नाही तर आपला आपण स्वतंत्र विचार करावा असे अस्पष्ट बोलले जात होते. त्या काळात काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात मजबुती आणण्याच्या कामात यशवंतरावजींचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आणि अविस्मरणीय होता. त्यावेळची नेतेपणाची निवडणूक आठवली तर स्वतःला 'सूर्याजी पिसाळ' हे संबोधन मिळत असताना सांगलीच्या जाहिर सभेत संयुक्त महाराष्ट्र की पंडित नेहरू असा प्रश्न निर्माण झाला तर मी नेहरू नेतृत्व पसंत करेन, असे सांगणाऱ्या नेत्याचे विस्मरण भारतीयांना होता कामा नये. तामिळनाडू भलत्या विस्मरण मार्गावर गेला. तो राष्ट्रीय प्रवाहात परत आणताना के. कामराजसारखे नेते पुरे पडले नाहीत. तेथे आपल्या राजकीय जीवनाची बाजी लावून यशवंतरावजींनी महाराष्ट्राला भावनेच्या धारेतून

थोपवून धरले.''

लोकसभेतील विरोधी पक्षाच्या नेतृत्वात झालेल्या बदलासंबंधी आपले विचार स्पष्टपणे मांडताना ख्यातनाम राजकीय विश्लेषक वि. ना. देवधर लिहितात, ''दिल्लीच्या राजकारणात स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या ३० वर्षात प्रभावीपणे गाजलेल्या महाराष्ट्रीय नेत्यांची नावे मी सहज आठवली. हाताची बोटे काही पुरी भरली नाहीत. पहिले नाव आले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे. भारतीय घटनेचे शिल्पकार व पहिल्या राष्ट्रीय सरकारातील कायदामंत्री म्हणून त्यांचे नाव इतिहासात नमूद झाले आहे, त्यांचे समकालीन काकासाहेब गाडगीळ हे ही नेहरूंच्या पहिल्या मंत्रिमंडळातील एक महत्त्वाचे मंत्री. त्यांच्यापाठोपाठ नाव पुढे येते चिंतामणराव देशमुख आणि त्यानंतर कुणाचे नाव पुढे येत असेल तर ते यशवंतराव चव्हाण यांचे. ही संसदेतील महत्त्वाची मंडळी झाली. संसदेत व त्यातही लोकसभेत विरोधी बाकावर बसून नाव गाजविणारे आणखी एक नेते म्हणजे बॅ. नाथ पै, ह. वि. पाटसकर, र. के. खाडिलकर, अण्णासाहेब शिंदे, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ, शिवाजीराव देशमुख आदींनी आपल्या परीने कर्तृत्व गाजविले, पण राष्ट्रीय महत्त्वाच्या व्यक्ती म्हणून मी वर उल्लेखिल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, काकासाहेब गाडगीळ, चिंतामणराव देशमुख, यशवंतराव चव्हाण, बॅ. नाथ पै या महाराष्ट्राच्या सुपुत्रांचा उल्लेख करावा लागेल.''

नागपूर दीक्षा मैदानावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कोनशिला समारंभप्रसंगी दि. ३० ऑगस्ट १९६१ रोजी भाषण करताना यशवंतराव म्हणतात, ''हे दीक्षा मैदान सरकारने दिले ते मेहेरबानी म्हणून दिले असे मी कधीच मानले नाही. महाराष्ट्र राज्याचे ते कर्तव्यच होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आमच्या राज्याचे नागरिक होते, याचा महाराष्ट्र राज्याला अभिमान आहे. त्यांचे हे जे येथे स्मारक होत आहे, याबद्दलही महाराष्ट्र राज्याला अभिमान वाटतो.''

१९६६ साली संरक्षणमंत्री असताना स्वातंत्र्य दिनानिमित्ताने सैनिकांना व जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात यशवंतराव म्हणतात, ''भारतीय

सैनिकांनी या देशातील नागरिकांविषयी जशी राष्ट्रीय भावनेने आस्था बाळगली पाहिजे. तसेच नागरिकांनीही सैन्याकडे कौटुंबिक भावनेने पाहिले पाहिजे. रक्त गोठविणाऱ्या हिमालयाच्या थंडीत, उष्णतेने भाजून काढणाऱ्या राजस्थानच्या सीमेवर किंवा आसामच्या कीर्र झाडीत आपल्या सीमेचे रक्षण करीत उभा असलेला भारतीय सैनिक आपल्या विशाल कुटुंबाचा घटक आहे, ही भावना भारतीयांनी मनात जागविली पाहिजे. त्यांच्याशी आपले नाते कृत्रिम नाहीतर, कौटुंबिक जिव्हाळ्याचे आहे असे मानले, तरच भारतीय सैनिकांच्या खडतर जीवनात त्याला मोठा आधार वाटेल."

यशवंतरावांचा आपल्या वाणीवरील ताबा विलक्षण होता. खरे सांगायचे तर ते लोकोत्तर पुरूष होते. मोजके, मृदु, मुद्देसूद बोलण्यात ते अग्रेसर होते. आपले मत ठामपणे मांडताना ते प्रतिपक्षावर वाणीचे जखमी प्रहार करत नव्हते. मुद्याने मुद्दा खोडून, ते वस्तुस्थितीने विरोध हाणून पाडत. प्रांजळपणाने प्रतिपक्षाची सत्यता पटकन मान्य करत.

यशवंतराव चव्हाणसाहेबांबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्या भावना वरील शब्दात व्यक्त केल्या. त्यांच्या त्या प्रतिक्रियेतून चव्हाणसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समाजासमोर आले. राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेकांचे आधारवड असलेले यशवंतराव हे त्यांचे प्रेरणास्थानच होते. त्यांच्या संपर्कात जे जे आलेत त्यांच्या जीवनाचे यशवंतरावांनी सोने केले. ते प्रत्येक वेळी प्रसंगानुरूप विविध विषयावर बोलत. समोर असणारा विषय समजून घेऊन त्या समस्येतून मार्ग दाखवत. कोणाचे उणेदुणे काढणे यशवंतरावांच्या स्वभावातच नव्हते. मोकळ्या मनाने बोलणे, सल्ला देणे, समस्येच्या मूळाशी जाऊन त्यातून मार्ग काढणे हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायिभाव होता. आपल्या धर्मपत्नी वेणूताईंच्या निधनानंतर अवघ्या वर्षभरातच यशवंतरावांचे निधन झाले. कृष्णा- कोयनेच्या संगमावर कराडला असणारी यशवंतरावांची समाधी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील असंख्य बुजुर्गांना मार्गदर्शक ठरली.

चव्हाणसाहेबांचे राष्ट्र उभारणीत असलेले योगदान विचारात घेऊन त्यांचा

पुतळा भारताच्या संसदेच्या आवारात बसविण्यात आला ३ मे १९९४ रोजी पुतळ्याचे उद्घाटन तत्कालिन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तत्कालीन उपराष्ट्रपती के. आर. नारायणन, महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार, लोकसभा सभापती शिवराज पाटील, केंद्रीय गृहमंत्री शंकरराव चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी यशवंतरावांचे राष्ट्र उभारणीतील योगदान कथित करताना पी. व्ही. नरसिंहराव म्हणाले,

''आधुनिक भारतातील एक महान संसदपटू व नेते असलेल्या यशवंतरावांचा पुतळा अनावरण करण्याची मला मिळालेली संधी आपणास फार भाग्याची वाटते. यशवंतराव हे एक दूरदृष्टीचे नेते होते. त्याचबरोबर त्यांचे पाय भक्कमपणे वास्तवात रोवलेले होते. तळागाळातील माणसाबद्दलची करूणा त्यांच्याजवळ होती. यशवंतरावांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत महत्त्वाची समजली जाणारी बहुतेक खाती सांभाळली; परंतु यशवंतरावांच्या संरक्षण, गृह व अर्थ या खात्यातील कामगिरीचा विशेष उल्लेख करायला हवा. अत्यंत कठीण अशा काळात यशवंतरावांनी ही तीन खाती सांभाळली. १९६२ मध्ये चीनने केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर यशवंतरावांनी संरक्षणखात्याची जबाबदारी सांभाळली. १९६६ ते ७० या काळात त्यांनी गृहमंत्रीपद सांभाळले. या काळात अनेक राज्यांत काँग्रेसत्तर आघाडीची सरकारे सत्तेवर आली होती. एक प्रकारची अनिश्चितता व अस्थिर राजकीय परिस्थिती त्यामुळे निर्माण झाली होती, परंतु ही अस्थैर्याची राजकीय परिस्थिती यशवंतरावांनी कौशल्याने हाताळली १९७० ते ७४ या अर्थमंत्रीपदाच्या कारकीर्दीत विविध आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम त्यांनी राबविला. या तीन खात्यामार्फत त्यांनी देशाला नवी दिशा देण्याचे काम केले.''

यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या बद्दल विविध क्षेत्रातील समाजधुरिणांनी व्यक्त केलेल्या या प्रतिक्रियेतूनच त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची प्रचिती येते. यशवंतरावांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचा त्यातून साक्षात्कार होतो. नेता कसा असावा याचा आदर्श नव्या पिढीसमोर त्यातून उभा राहतो.

# १०. अखंड विचाराचा झरा



**प्रभावी वक्ता**

यशवंतराव चव्हाणांसारखे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राला लाभल्यानेच देशात महाराष्ट्र राज्य आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रस्थानावर पोहोचले. राजकारणात असलेला एक महान तत्त्वचिंतक म्हणूनच त्यांच्याकडे पहावे लागेल. साहित्यावर भरभरून प्रेम करणाऱ्या यशवंतरावांनी कलाकारांनाही राजाश्रय दिला. त्यांची विविध विषयावरील भाषणे खूपच गाजली. त्यांच्यासारखे सभा जिंकण्याचे कौशल्य असणारा त्यांच्या तोडीचा नेता शोधून सापडणे ही केवळ अशक्य. प्रचंड वाचनामुळे त्यांचे ज्ञानही सर्वस्पर्शी होते. कोणत्याही जटील प्रश्नांवर सहजपणे प्रतिक्रिया व्यक्त करून चुटकी सरशी ती समस्या सोडविण्याची हातोटी यशवंतरावांकडे होती. त्यांची भाषणे अभ्यासपूर्ण असत. पल्लेदार वाक्यरचना हे त्यांच्या भाषणाचे आणखी एक वैशिष्ट्य. स्पष्टवक्तेपणा, मांडणीतील सरळपणा व सहजता यामुळे त्यांच्याबद्दल जनतेत प्रचंड विश्वासार्हता होती. जनतेशी असणारा थेट संपर्क व प्रचंड लोकप्रियता यशवंतरावांइतकी अन्य कुणा नेत्याला लाभली नाही.

छोडो भारत आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व राजकीय पटलावरील त्यांची भाषणे खूप गाजली.

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा काळ नजिक आला होता. त्यावेळी दि.५ व ६ जानेवारी, १९६० रोजी यशवंतरावांचे भाषण मिरज व सांगली येथे झाले. या भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमागील आपले मत मांडताना यशवंतराव म्हणतात,

''आपणांस सर्वच काही मनासारखे सदैव भेटत गेले असते, तर आपण सर्वच जण राजे झालो असतो. आपण महाराष्ट्र मागितला. तो कसा हवा याबाबत नकाशे मांडले. आज सर्व प्रमुख मागण्यासह महाराष्ट्र निर्माण होत आहे. कांही मंडळी जे मिळाले आहे ते जाणून घेण्यापेक्षा व आपला विजय होत आहे ते ओळखण्यापेक्षा जे कोठे लहानसे मिळालेले नाही त्याचाच जप करीत बसली आहेत. मला त्यांना आणि आपणा सर्वांना असे विचारावेसे वाटते की, अशी सदैव हताश पराभवाची पकड आपल्या मनावर आपण किती दिवस राहू देणार? आज खरी गरज आहे, तीन कोटी मराठी जनतेच्या कल्याणाची. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास साधावयाचा आहे. ही गोष्ट एकटी दुकटी व्यक्ती करू शकणार नाही. मुख्यमंत्री आणि त्यांचे दहा-पाच सहकारी यांच्या हातून हे काम होणारे नाही. तीन कोटी जनतेचे हात या कार्याला लागले पाहिजेत. येथे कमी पडले, तेथे तो तुकडा गेला, अशा विफलतेच्या मानसिक अवस्थेच्या आहारी आपण जाता कामा नये. जनतेला त्या वैफल्याच्या अंध:कारात लोटण्याचे काम कोणी करू नये, अशी माझी त्या सर्वांना आग्रहाची विनंती आहे. महाराष्ट्र सर्वांगीणरित्या समर्थ बनला, तरच आपण आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यास समर्थ होऊ. हे काम एकाचे नाही, ते सर्वांचे आहे. सर्व पक्ष, पंथ, लोकांचे ते काम आहे. महाराष्ट्र निर्मितीकडे मी पक्षाभिनिवेशाने पहात नाही. याबाबतीत संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्याचेहि मी मूल्यमापन करतो. गेल्या तीन वर्षाच्या काळात महाराष्ट्र निर्मितीची भवना जनतेमध्ये जागृत ठेवण्याचे काम समितीने केलेले आहे. ही त्यांच्या जमाखर्चाच्या पानावरची जमेची बाजू आहे. मी ती आनंदाने

मान्य करीत आहे. पण राज्य मिळविणे आणि चालविणे यांत अंतर आहे. त्याचा सर्वांनी विचार केला पाहिजे.''

ग्रामीण शिक्षण व ग्रामीण जीवन याबाबतची आपली भूमिका मांडताना यशवंतराव म्हणतात,

''ग्रामीण जीवन व शहरी जीवन यांच्यातील अंतर कमी करण्याचा एकच मार्ग, तो म्हणजे खेड्यातील शेती व अन्य उद्योगधंद्याची गतिमानता वाढविणे.''

कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी अधिकाऱ्यांनी जनतेशी कसे वागावे, याबाबत यशवंतराव म्हणतात,

''मला न्याय मिळेल असा विश्वास लोकांमध्ये निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची व सरकारी अधिकाऱ्यांची आहे. अधिकाऱ्यांचे चुकले आहे किंवा आपल्याला न्याय मिळत नाही हे निर्भिडपणे अधिकाऱ्यांना येऊन सांगण्याचे धैर्य लोकांच्या ठिकाणी असले पाहिजे आणि हा धीर आणि विश्वास जनतेमध्ये अधिकाऱ्यांनी निर्माण केला पाहिजे.''

पोलीस दलाचे जनतेशी नाते कशाप्रकारे असावे याबाबत पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना यशवंतराव सांगतात,

''जनतेच्या मनात आपल्याविषयी विश्वास उत्पन्न होईल असे काम पोलीस दलाने केले पाहिजे. अडी-अडचणीच्या वेळी जनतेने पोलीस दलाच्या मदतीसाठी धावले पाहिजे असे ऋणानुबंध जनतेशी निर्माण करा. आपण सर्व पोलीस अधिकारी आपल्या हाताखालच्या पोलीस ठाण्यास अकल्पित भेट देऊन तपासणी करता की नाही मला माहित नाही. मला स्वत:ला पोलीस ठाण्यात भेट देण्याची इच्छा होते. इन्स्पेक्टर जनरलनी आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणे पोलीस ठाण्याचा अधिकारी हा हॉस्पिटलमधील डॉक्टरसारखा असला पाहिजे. त्यांच्याकडे कोणी तक्रार घेऊन गेला तर डॉक्टरकडे येणाऱ्या रूग्णासारखी त्याची विचारपूस केली पाहिजे. त्याची तक्रार समजून घेण्यास मदत होईल असे प्रश्न विचारले पाहिजेत. मला वाटते असे अजून तरी घडत नाही. हा हेतू साध्य होण्यासाठी कोणते मार्ग व व्यवस्था करावी त्याचा शोध घेतला पाहिजे.

पददलित म्हटल्या जाणाऱ्या हरिजनांना आपण सर्व तऱ्हेची मदत दिली पाहिजे. स्वत: वैयक्तिकरितीने तपास करून सत्य शोधून काढा. आपण लोकांत अशी जाणीव निर्माण केली पाहिजे की, चुकीच्या गोष्टी शासनाशिवाय सुटणार नाहीत. आपण लोकशाही जमान्यात रहात आहोत; मतामतांचे अंतर कितीही असो, पण समाजातल्या कुठल्याहि वर्गाला कोणी दहशत दाखविता कामा नये. हरिजनांना असा विश्वास वाटला पाहिजे की, आपली छळवणूक होणार नाही. मी मुद्दाम या गोष्टीचा उल्लेख केला. कारण मला या गोष्टीची बोच अतिशय तीव्रतेने वाटते. अशा प्रसंगी जरूरी वाटेल तेव्हा जिल्हाधिकाऱ्यांना सांगून सर्व पक्षीय शांतता कमिट्यांची स्थापना करावी."

पोलीस खात्यातील लाचलुचपतीच्या तक्रारी यशवंतरावजींच्या कानावर बऱ्याचदा येत असत. यासंदर्भात कडक शब्दात त्यांनी अधिकाऱ्यांना सुनावले. याबाबत गर्भित स्वरूपाचा इशारा देताना ते म्हणतात,

"मी अशा ठाम निर्णयाला आलो आहे की, जर लाचलुचपत थांबली नाही, निदान तिला पायबंद बसला नाही तर या देशाचे भवितव्य ठीक नाही. आर्थिक क्षेत्रात विकास होणार नाही की, वागणुकीत सुधारणा दिसणार नाही. तुम्ही ही जाणीव स्वत:मध्येच निर्माण करून भागणार नाही, तर तुमच्या हाताखालच्या लोकांमध्येही ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. हाताखालच्या लोकांना शिक्षा करण्याचे कामी संयम ठेवू शकाल, त्यांना सुधारण्याची संधीहि देऊ शकाल. पण ही संधी एकदाच मिळावी. गुन्ह्याची पुनरावृत्ती झाली तर त्याला माफी नाही. लाचलुचपत प्रतिबंधक यंत्रणा आपल्यामध्ये निर्माण करण्याचा विचार आहे. या प्रतिबंधक उपायांबाबत आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही. कारण प्रामुख्याने आम्ही पोलीस दलावर विसंबून राहिलो म्हणून या लाचलुचपत प्रतिबंधक यंत्रणेचा संबंध इतर खात्याशी ठेवण्यासंबंधी मी विचार करीत आहे. हा फार महत्त्वाचा प्रश्न असून मी त्यातून खात्रीने मार्ग शोधून काढीन."

सरकारच्या प्रसिद्धी विभागाच्या संपर्क अधिकाऱ्याने आपली जबाबदारी कशारितीने पार पाडली पाहिजे याबाबत मार्गदर्शन करताना

यशवंतराव सांगतात,

"प्रसिद्धी ही काही एकमार्गी वाहतुक नाही, ती दुहेरी आहे. ज्याप्रमाणे तुम्ही तुमच्या कल्पना घेऊन लोकांच्याकडे गेले पाहिजे, त्याचप्रमाणे तुम्ही तुमचे अंत:करण मोकळे ठेवले पाहिजे. कान उघडे ठेवले पाहिजेत; हे जर आपण करू शकलो नाही तर आपण जी प्रसिद्धी पत्रके किंवा साहित्य काढू ते सर्व निरर्थक होईल म्हणून प्रथमत: आपण लोकांना समजून घेतले पाहिजे. दुर्दैवाने अनेक वेळा मला असं पहावयास मिळते की, प्रसिद्धी अधिकारी आपल्या भोवतालच्या इतर नोकरशाही पद्धतीच्या मार्गानेच जाण्याचा प्रयत्न करतात. मला काही तरूणांची माहिती आहे, ते प्रसिद्धी खात्यात नोकरीस येण्यापूर्वी धाडशी, हुशार होते. चांगले चिकीत्सक होते आणि ते लिहितांना किंवा बोलतांना त्यांचे विचार मोठे परिणामकारक होते. परंतु ते प्रसिद्धी खात्यात नोकरीस लागल्यानंतर दोन-चार वर्षातच सरकारच्या इतर खात्यांतील अधिकाऱ्यांप्रमाणेच ठोकळेबाज बनले. मला केवळ त्यांना दोष द्यावयाचा नाही. नोकरीच्या पद्धतीतील काही मूलगामी कारणेही या गोष्टीला जबाबदार असतील, म्हणून आपण हे असं कां व कसे घडते, याचे कारण शोधून पहाणे अत्यावश्यक आहे.सातत्याने प्रयत्न करून का होईना याचा आपण शोध घेतला पाहिजे."

शासनाची ध्येयधोरणे, कामे यांची पुरेपुर माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी प्रसिद्धी विभागाची आहे. याबाबत मार्गदर्शन करताना ते म्हणतात,

"लोकांचे समोर विषयाची मांडणी करणे ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ज्यावेळी प्रकाशित पुस्तकाद्वारा लोकांना खऱ्या कल्पना देता येत नाहीत, त्यावेळी आपण फिल्म व रेडिओचा उपयोग केला पाहिजे. कित्येक वेळा रेडिओवरील भाषणांचा आपल्या कल्पना लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी खरा उपयोग होतो की नाही हे निश्चितपणे सांगता येणार नाही. आपण कुठेतरी चुकत असल्याचे मला वाटते. पुष्कळवेळा लोकांचेसाठी मी जी भाषणे करतो त्यांतील १० टक्के देखील कल्पना ज्यांचेसाठी भाषण केलेले असते, त्यांना

समजली की नाही याची मला शंका वाटते. आपण हे चांगले कसे करू याचा मार्ग शोधला पाहिजे. या प्रयत्नांतच आपण आपणालाही आणि सरकारलाही मदत करू शकतो. विषयाची मांडणी अशी पाहिजे की ती लोकांना समजली पाहिजे.''

सरकारी अधिकाऱ्यांनी प्रसारमाध्यमांसमोर जाताना पूर्ण तयारीनिशी जावे. याबाबत चिकित्सक मार्गदर्शन करताना यशवंतराव म्हणतात.

''वृत्तसंस्थेशी संबंध ठेवताना आपण ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, आपण ज्यांच्या हातांत शब्द सामर्थ्याची सत्ता आहे अशा चाणाक्ष लोकांशी संवाद साधत असतो. जगात शब्दासारखी सत्ता कशातही नाही. शब्द हे कदाचित अॅटम बॉम्बपेक्षाही अधिक प्रभावी असतील. शब्द कोणत्याही गोष्टीची उलथापालथ करू शकतात. शब्दांनी क्रांत्या निर्माण केल्या आहेत आणि कदाचित अॅटम बॉम्बची उत्पत्तीसुद्धा शब्दातूनच झाली असावी. मी तुम्हाला शब्दाचे महत्त्व सांगत बसत नाही. कारण तुम्ही शब्दसृष्टीचे राजे आहात हे गृहित आहे; परंतु ज्यावेळी तुम्ही वृत्तसंस्थेशी संबंध ठेवाल त्यावेळी एक गोष्ट विसरू नका की, ज्याचे शब्दरचनेवर प्रभुत्व आहें व ज्यांना शब्दांची कसरत करता येते अशांच्या संपर्कात राहून तुम्ही आपले काम करीत आहांत, म्हणून तुम्हाला फार सावधगिरी बाळगली पाहिजे. ज्यावेळी त्यांच्याकडे जाल त्यावेळी मोठ्या कलात्मकरितीने तुम्ही तुमचे काम केले पाहिजे.''

आदर्श राज्याच्या निर्मितीमध्ये सरकार इतकीच जबाबदारी नागरिकांचीही आहे. याबाबत आपले विचार खालील शब्दांत यशवंतराव मांडतात,

''आदर्श राज्यात सरकारला कमीत कमी महत्त्व असते. म्हणून प्रत्येक नागरिकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, तो राज्याचा एक भाग आहे, महत्त्वाचा घटक आहे आणि त्याच्यावर काही जबाबदाऱ्या आहेत. सरकारचा राज्यकारभार पाहणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे आणि हे कर्तव्य तो ज्या प्रमाणात पार पाडतो त्या प्रमाणात तो राज्याला उपयुक्त आहे. कल्याणकारी राज्यात सरकार नागरिकाचे मदतीस तत्पर असते. एवढेच नव्हे तर नागरिकही सरकारला मदत करणेस तत्पर असतात. असे कल्याणकारी राज्य अनुभवास

येणेस अवधी लागेल. परंतु, सर्वांनी आतापासूनच प्रामाणिकपणे आणि उत्साहाने या प्रयत्नास लागले पाहिजे."

महाराष्ट्राचा कोकण किनारा निसर्गसान्निध्यात भरून गेला आहे. विपूल प्रकारची नैसर्गिक साधनसंपत्ती कोकणात आहे. या साधनसंपत्तींचा आजपर्यंत योग्यरितीने वापर न झाल्यानेच कोकणचा विकास खुंटला आहे. कोकणची भौगोलिक रचना व विविध उद्योग याबाबत सखोल विवेचन यशवंतराव खालील शब्दांत करतात,

"कोकणामध्येहि तीन वेगवेगळे भाग आहेत. रत्नागिरी हा एक वेगळा भाग मानला पाहिजे. कुलाबा, ठाण्याचा वेगळा भाग मानला पाहिजे. रत्नागिरीमध्येही काही ऐतिहासिक कारणामुळे - निव्वळ राजकीय ऐतिहासिक कारणामुळे नव्हे, तर सामाजिक परिस्थितीच्या कारणामुळे दक्षिण रत्नागिरी आणि उत्तर रत्नागिरी असे भाग पडतात. ही गोष्ट काही भाग पाडण्याच्या दृष्टीने नव्हे तर परिषदेपुढे असणाऱ्या कार्याचा अंदाज घेण्यासाठी मी आपल्या नजरेसमोर आणू इच्छितो. या दृष्टीने कोकणचे जे प्रश्न आहेत, त्यांचा विचार करीत असताना कोकणचा समुद्र किनारा, तिथे पडणारा पाऊस, तेथे असणारी मनुष्य-संपत्ती, तेथील जमिनीचा एकंदरीत असणारा कस आणि परिस्थिती यांचा विचार करूनच तेथील विकासाचे कार्यक्रम निश्चित करता येतील. आम्ही नुसत्या मनामध्ये विकासाच्या योजना मांडून यश मिळणार नाही. त्यासाठी कृतीची गरज आहे."

"उन्हाळ्यामध्ये जाऊन तिथला चांगला आंबा खाण्याकरिता आणि दौरे करण्याकरिता मी कोकणमध्ये पुष्कळच फेऱ्या मारल्या आहेत. परंतु, पावसाळ्यांत पुराने वेढलेले, पीक वाहून गेलेले कोकण मी अगदी अलिकडेच म्हणजे गेल्याच वर्षी पाहिले आणि त्यावेळी असे लक्षांत आले की, सगळी कर्तबगार माणसे जिल्हा सोडून बाहेर गेली आहेत. त्यामुळे रत्नागिरीच्या आर्थिक जीवनामध्ये एक प्रकारची अगतीकता निर्माण झाली आहे."

"समुद्र किनाऱ्यावरच्या मच्छीमारीचा धंदा, विचार करण्यासारखा आहे. छोट्या छोट्या ठिकाणी उद्योगधंद्याची वाढ करतां येण्याची शक्यता आहे.

मोठ्या उद्योजधंद्यांची वाढसुद्धा करता येण्याची शक्यता आहे. मोठ्या उद्योगधंद्याचा विचार श्री.वर्देनी मांडला. ते त्यातले तज्ज्ञ आहेत. ते याबाबत विचार करतील. परंतु, छोट्या - छोट्या शहरांत छोट्या उद्योगधंद्यांना लागणारी साधने पुरविण्याची गोष्ट महत्त्वाची आहे, असं मी मानतो."

ज्येष्ठ नेते वसंतदादा पाटील यांनी सांगली येथे सहकारी साखर कारखाना सुरू केला. त्याच्या उद्घाटन समारंभास यशवंतरावांना निमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी सहकारी साखर कारखानदारी व वसंतदादांचे परिश्रम याबाबत यशवंतरावांनी बहुमोल मार्गदर्शन केले. ते म्हणतात,

"गेल्या दोन - तीन वर्षात आमच्या नेहमीच्या कामाच्या धांदलीमध्ये वसंतदादा कोठे दिसत नसत. काही लोक विचारीत होते, वसंतराव राजकारणास कंटाळले आहेत काय? आम्ही त्यांना सांगत होतो, ते राजकारणाच्या नव्या प्रवाहात शिरले आहेत. सभा, संमेलने-मोर्चे, मिरवणुका हा एक राजकारणाचा अविभाज्य भाग होता. आता अशा परिस्थितीत राजकारण राहिले नाही. मोठ्या कड्यावरून उडी घेतांना धबधबा असतो, नदी मात्र धबधब्यातून उडी टाकून जेव्हा जेव्हा जमिनीवर उतरते तेव्हा जमिनीच्या पातळीवर येते. त्याचे अवती-भोवतीची जमीन काळी करीत पुढे जात असते. राजकारण्यांनी धबधब्यासारख्या उड्या घेतल्या. वसंतरावांनी मात्र नदीसारखी जमिनीशी एकरूप होणारी पातळी गाठली. राजकारण देशाचे हित करण्याच्या मार्गाला लागले आहे. त्यामुळे मोर्चे आणि घोषणा ज्यांना करावयाच्या असतील त्यांना बंदी नाही. त्यांच्याकरिता परवानगी आहे. परंतु आज लोककल्याणाचा मार्ग स्विकारून पुढे जाण्याचा प्रयत्न करण्याकरिता त्याची जरूरी नाही. कोठेतरी शांतपणाने ठरलेल्या योजनेची अंमलबजावणी कशी करावयाची याचा मार्ग शोधणे गरजेचे आहे. गेली दोन वर्षे अशा अज्ञातवासात वसंतरावदादा होते असे माझे मत आहे. या बुधगावच्या आणि सांगलीच्या माळावरती एक नवीन दुनिया निर्माण करण्याच्या कामात ते गुंतले होते. या नवीन दुनियेचे कुलूप त्यांचे संमतीने मी खोलीत आहे. बरेच दिवस आम्ही या गोष्टींची स्वप्ने पहात होतो की, शेतकऱ्यांचे एक नवीन

आर्थिक जीवन तयार केले पाहिजे. मोठ्या-मोठ्या घोषणा आम्ही करीत होतो. परंतु या घोषणांचा अर्थ आता आम्हांला समजू लागला आहे. शेतकऱ्यांचे राज्य आले पाहिजे. हे वाक्य ऐकलं म्हणजे मनाला बरं वाटतं. अंग जरासे शहारून येते. परंतु त्याची जबाबदारी, त्याची अडचण काय? त्यांच्यासाठी काय केले पाहिजे? शेतकऱ्यांच्या या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रातील शेतीच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रातील शेतीच्या प्रश्नांची काय स्थिती आहे. मी या सहकारी कारखान्याच्या दृष्टीने हे विचार अवश्य बोलून दाखविले पाहिजेत. कारण मी माझ्या मनातील विचार स्पष्ट करतो. स्वतः माझेसाठी, जमलं तर दुसऱ्यांसाठी!''

''आमच्या कोयनेच्या आणि कृष्णेच्या काठी माणसे जरा तिखट आहेत. पण त्या पाण्यामध्ये साखर जास्त आहे, असं शास्त्रज्ञांचे मत आहे. आता ही साखर कारखानदारी आम्ही उभी केली. ज्यांनी महाराष्ट्रामध्ये साखर कारखानदारी प्रथम सुरू केली त्यांना मी धन्यवाद देणार आहे. कोणी खाजगी उद्योजकांनी ही गोष्ट केली म्हणून तर ती आम्हांला कळू शकली. त्यांना तर आपण शाब्बासकी दिलीच पाहिजे. परंतु त्यांच्या हाताला साथ देऊन त्याची जोखीम ही बाकीच्या लोकांनी हाताशी घेतली पाहिजे. दहानी-पाचांनी-शंभरांनी-हजारांनी एकत्र येऊन सगळ्यांच्या मालकीची कारखानदारी म्हणजे काय चीज आहे ते महाराष्ट्रात उभे करायचे ठरले तर दहा-पंधरा कारखाने उभे राहिले. त्यातला एक कारखाना सांगलीच्या शिवारामध्ये मला पहावयास मिळतो. एक अतिशय चांगली गोष्ट येथे घडली आहे.''

ना. यशवंतराव चव्हाण यांनी पूज्य विनोबांना ५ हजार रूपये देणगी दिली. यशवंतरावांना त्यांच्या मित्राने विचारले, ''विनोबांना तुम्ही पैशाच्या रूपात अल्पस्वल्प हातभार लावला हे ठीक आहे. पण त्यांनी चालविलेल्या कार्यामुळे भारताची उन्नती होईल, यावर आपला विश्वास बसतो काय?''

यावर यशवंतराव म्हणाले, ''हो! बसतो की, प्रथम तुम्ही असा विचार करा की त्यांनी जे कांही कार्य चालवलं आहे ते वाईट आहे का? त्यांत कुणावर जुलुम

होतो कां? हिंसा कुठं केली जाते कां? अविचार घडतो कां? जर यापैकी कांहीच घडत नसेल तर ते कार्य चांगलं आहे असं लोकांनी कां मानू नये? त्यांचे कार्य दानावर आधारलेलं आहे. दान हे देणाऱ्याच्या मर्जीवर अवलंबून असते. ज्याच्या त्याच्या इच्छेने घडणारी ही गोष्ट आहे. देशात प्रचंड गोरगरीब वर्ग आहे. दान देणाऱ्याच्या संख्येपेक्षा दान घेणाऱ्यांची संख्या अधिक आहे. भारत देश दीन दुबळा आहे. विनोबाजींच्या कार्याने संपूर्णपणे हा प्रश्न मिटेल असं जरी नसलं तरी पुष्कळ गरीबांना सुख मिळू शकेल. म्हणून मला हे कार्य आवडतं!''

त्या मित्राने प्रश्न केला, ''तुम्ही विनोबाजींना पैशाच्या रूपात दान केल्याचं समजलं, पण तुम्ही भूदान केलं नाही अजून? विनोबांनी म्हटलं आहे की, 'भूदान' हा शब्द शाळेतील लहान पोरंसुद्धा उच्चारतात. तेव्हा भूदान करण्याला अधिक महत्त्व आहे. म्हणून तुम्ही भूदान केलं असतं तर बरं झालं असतं, असं आपलं मला वाटतं!''

यशवंतराव थोडा वेळ स्तब्ध राहिले, गालांतले गालांत हसले व मान हलवीत म्हणाले, ''मला भूदान करतां आले असते, तर बरे झाले असते, असे तुमच्याप्रमाणे मलाहि वाटतं, पऽऽण''

''पण काय?''

''त्याचं असं आहे, ज्याचे जवळ 'भू' आहे त्यानंच दान करावयाचं. मी तर भूमीहीन माणूस आहे. एक आणा सुद्धा सरकारी सारा मी भरत नाही. मग मी भूदान कसं करणारं बरं?''

यशवंतरावांच्या या उत्तराने तो मित्र निरूत्तर झाला. खरोखरच यशवंतरावांनी त्यांच्या पुऱ्या आयुष्यात एक गुंठा जमिनही स्वतःच्या नावावर केली नाही. राजकारणातील निष्कलंक व्यक्तिमत्त्वाचे यापेक्षा अन्य चांगले उदाहरण आणखी कोणते असावे?

यशवंतरावांची समाजवादावर खूप मोठी श्रद्धा होती. भारतासारख्या विशाल, खंडप्राय, देशाला तारणारा एकमेव मार्ग म्हणजे समाजवाद, असे यशवंतरावांचे ठाम मत होते. याबाबत आपले अभ्यासपूर्ण विचार मांडताना यशवंतराव म्हणतात,

''देशात समाजवाद आला नाही तर लोकशाही राहूच शकणार नाही. जे समाजवाद नको असे म्हणतात त्यांना स्वत:ला तरी बदलावे लागेल किंवा समाज तरी बदलला पाहिजे. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी ही समाजवादाची दृष्टी ठेवली नाही तर त्यांना बाजुला व्हावे लागेल.'' मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असताना ना. यशवंतराव चव्हाणांनी कोल्हापूर येथे शिवाजी उद्यमनगरांत झालेल्या एका कार्यक्रमात वरील उद्‌गार काढले. कोल्हापूर शहरांतील अल्प बचत पंधरवड्याचे उद्‌घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले होते. या निमित्त शिवाजी उद्यमनगरांतील उद्यमनगर सोसायटीच्या ऑफिससमोर भरलेल्या जाहिर सभेत त्यांनी हे भाषण केले. याप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणतात,

''अल्पबचत हे मानवाच्या व राष्ट्राच्या विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. आपल्या ज्या निरनिराळ्या योजना आहेत, त्या पुऱ्या करण्यासाठी गुंतवणूकीची खूप गरज आहे. प्रत्येक व्यक्तिला जरी बचत करता येणें शक्य नसले तरी ज्यांना शक्य आहे, त्यांनी मात्र खुषीने बचत करावी.बचत जर होत नसेल तर ती सक्तीने केली पाहिजे. विकासाची कामे व्हावयाची असतील तर, त्यांच्या मागे बचतीची शक्ती उभी केली पाहिजे.''

संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीने खूप जोर धरला होता. त्यावेळी यशवंतरावांनी, ''मला महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे वाटतात!'' असे विधान करून सर्वत्र खळबळ माजवून दिली होती. पंतप्रधान नेहरूंच्या हस्ते प्रतापगडावरील शिवरायांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होणार होते. यावेळी यशवंतराव द्‌विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते. नेहरूंना प्रतापगडाच्या दिशेने जाताना संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांच्या निषेधाला तोंड द्यावे लागले. वातावरण खूपच तणावपूर्ण होते. रस्त्याच्या एका बाजुला काँग्रेसचे कार्यकर्ते तर दुसऱ्या बाजुला संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्यकर्ते समोरासमोर उभे ठाकले होते. प्रतापगडावरील शिवरायांचा पुतळा अनावरण झाल्यानंतर यशवंतरावांनी ओघवल्या शैलीत भाषण करून म.ए.समिती व काँग्रेस कार्यकर्त्यांतील तणाव कमी केला. याप्रसंगी ते म्हणतात, ''प्रतापगड समारंभाच्या निमित्ताने काँग्रेस विजयी झाली की,

संयुक्त महाराष्ट्र समिती विजयी झाली असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. परंतु, त्याबाबत मला एवढेच सांगावयाचे आहे की, कोण कोठे विजयी झाले हे पाहण्याचे ठिकाण प्रतापगड नसून इतरत्र आहे. ज्या शिवछत्रपतींनी राष्ट्राला इतिहास आणि संस्कृती दिली, त्या शिवछत्रपतींच्या महान कार्याला मागे टाकून पुढे जाण्याचा अहंकार समितीने उराशी बाळगला होता; परंतु प्रतापगडावरील मंगल सोहळ्याने हेच सिद्ध झाले की, शिवछत्रपतींचे नांव अजरामर असून मोठे आहे. इतर कोणत्याही निष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठाच अधिक श्रेष्ठ आहे हेच प्रतापगडावर दिसले. प्रतापगडावरील समारंभाने महाराष्ट्राचा आत्मा राष्ट्रनिष्ठेच्या बाहेर गेला नाही, हेच दिसून आले आणि हे चित्र महाराष्ट्रातील काँग्रेस कार्यकर्त्यांना भूषणावह आहे. प्रतापगड समारंभाच्यावेळी एक राष्ट्रनेता दुसऱ्या एका राष्ट्रनेत्याबद्दल आदर प्रकट करण्यासाठी येत होता. अशा या मंगल समारंभाला अपशकून करण्याचा घाट समितीने आखला होता. परंतु, महाराष्ट्रातील विचारी आणि जागृत जनतेने सुजाणता दाखवून समारंभ यशस्वी करण्यास सहकार्य केले. महाराष्ट्रातील सर्व काँग्रेस कार्यकर्त्यांनी समारंभ यशस्वी करण्यास तळमळीने सहकार्य दिले याबद्दल महाराष्ट्रातील जनतेस आणि काँग्रेस कार्यकर्त्यांस मी धन्यवाद देतो. समितीनेही शिस्त आणि संयम राखण्याचे सौजन्य दाखविल्याबद्दल समितीच्या मंडळीसही मी धन्यवाद देतो!''


अलिगड विश्वविद्यालयाच्या २९ डिसेंबर १९५९ रोजी झालेल्या पदवीदान समारंभास यशवंतरावांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी शिक्षण विषयक विचार मांडताना यशवंतराव म्हणतात,

''उच्च शिक्षणाची भूक ही देशातील आजच्या लोकशाही प्रवृत्तीची भूक आहे असे मला वाटते. अशा या उच्च शिक्षणाची द्वारे जोपर्यंत थोड्याशाच मर्यादित वर्गाला खुली होती, तोपर्यंत समाजाचा उच्च वर्ग हाही मर्यादित राहणार होता. समाजातला हा मूठभर वर्ग जर कांही कारणाने घसरू लागला, तर समाजालाच धोका निर्माण होणार होता. शिक्षणाने मनाची क्षितिजे वाढतात. ती वाढलेली क्षितिजे आजपर्यंत जे मागासलेले अज्ञानी होते, त्यांना

दिसू लागली आणि त्या बहुसंख्य वर्गाला जर त्या क्षेत्रात प्रवेश मिळाला तर त्यांना आपल्या शक्तीची जाणीव होईल. समाजाला गरज असणाऱ्या नेतृत्वाची निवड करण्यास अधिक संख्येने बद्धिवान उपलब्ध होऊ लागतील. अशा रितीने एक प्रक्रिया सुरू झाली म्हणजे सामाजिक दर्जा, जात, कौटुंबिक वारसा वगैरे गोष्टी आपोआपच दुय्यम ठरू लागतील. आपल्या सामाजिक प्रकृतीच्या दृष्टीने या परिवर्तनाचा फायदाच होईल यात शंकाच नाही.''

या पदवीदान समारंभातच अलिगड विद्यापीठाने यशवंतरावांना **'डॉक्टर ऑफ लॉ'** ही सन्माननीय पदवी देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला.

यशवंतराव ज्या ज्या ठिकाणी कार्यक्रमानिमित्त गेले, तेथे त्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे करून श्रोत्यांची मने जिंकली. त्यांचे चिंतनशील विचार ऐकण्यासाठी समाजातील सर्वच थरातील लोक मोठ्या प्रमाणात गर्दी करत. असे एकही क्षेत्र उरले नाही, की ज्यावर यशवंतराव बोलले नाहीत. संपूर्ण महाराष्ट्राने **'साहेब'** म्हणून त्यांचा जो आदर केला, तो त्यांच्या महान कर्तृत्त्वामुळेच !



**एक मनमोकळं हास्य !**

# ११. यशवंतराव - एक प्रेरणास्त्रोत

शालेय जीवनामध्ये यशवंतरावांना शिकविण्यास शेणोलीकर या नावाचे एक गुरूजी होते. अत्यंत वक्तशीर व टापटिपपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष. त्यांच्या चालण्या-बोलण्यात एक प्रकारचा वेगळाच रूबाब असायचा. शाळेत व गावात क्रिकेट रूजविण्यात या गुरूजींनी मोठे योगदान दिले होते. त्यांनी एकदा वर्गातील मुलांना 'तुम्ही कोण होणार..' हे एका कागदच्या चिठ्ठीवर लिहिण्यास सांगितले. प्रत्येक मुलाने आपण भविष्यात कोण होणार याबाबत चिठ्ठीवर लिहून दिले. बऱ्याच मुलांनी वेगवेगळ्या राष्ट्रीय नेत्याचे नांव लिहिले. यशवंतरावांनी मात्र लिहिले,

**'मी यशवंतराव चव्हाण होणार !'**

गुरूजींनी सर्व मुलांच्या चिठ्ठ्या वाचल्या. यशवंतरावांची चिठ्ठी वाचून ते उद्‌गारले,

"अरे, तू चांगलाच अहंकारी दिसतोस. देशातील मोठ्या माणसांचा आदर्श तरी डोळ्यासमोर ठेवावयास हवा होतास."

यावर यशवंतरावांनी उत्तर दिले,

"तुमचं म्हणणं खरं आहे गुरूजी ; पण मी स्वत:च नावच देशात उज्ज्वल करणार."

यशवंतरावांच्या या उत्तरावरून त्यांनी शालेय जीवनातच आपल्या नावाची पताका देशभर करण्याचा संकल्प केला होता, असे स्पष्ट होते.

स्वत:च्या नावाची द्वाही चौफेर करण्याचा निश्चय शालेय जीवनातच केलेल्या यशवंतरावांनी तो दृढनिश्चय भविष्यात सार्थ ठरविला. स्वकर्तृत्वावर इतका मोठा आत्मविश्वास असणाऱ्या यशवंतरावांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात मोठे यश मिळविले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन महाराष्ट्राच्या मातीतून अनेक कर्तबगार माणसे, राजकारण धुरंदर उदयास आले. सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांच्या दृष्टीने यशवंतराव हे एक प्रेरणास्त्रोतच बनले.

पारतंत्र्याच्या काळात कृष्णेच्या घाटावर अनेक नेत्यांची भाषणे होत. वाई प्राज्ञ पाठशाळेचे तरूण, विद्वान पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची अनेक भाषणे यशवंतरावांनी ऐकलीत. 'स्वातंत्र्यासाठीच्या या शेवटच्या लढाईत आपण आपल्या सर्वस्वाचा होम केला पाहिजे.' या त्यांच्या आवाहनाने यशवंतराव प्रेरीत झाले. काकासाहेब गाडगीळ, हरिभाऊ लाड, भाऊसाहेब बटाणे, मसूरचे राघूअण्णा लिमये, इंदोलीचे दिनकरराव निकम, वाईचे किसन वीर, वाळव्याचे आत्माराम पाटील, कातरखटावचे गौरीहर सिंहासने, तांबव्याचे काशिनाथपंत देशमुख अशा अनेक क्रांतीकारकांशी यशवंतरावांचा त्या काळात संपर्क आला. त्याद्वारे प्रभातफेरी, मिठाचा कायदा मोडणे अशा विविध लढ्यात यशवंतराव सहभागी झाले. नित्यनियमाने कराड शहरामध्ये प्रभातफेरी काढणाऱ्या दहा-पंधरा जणांबरोबरच यशवंतरावांनाही अटक झाली. कोर्टात केस सुरू झाली. खटल्याचा वृत्तांत यशवंतराव गुपचुप पुण्याच्या 'ज्ञानप्रकाश' या वृत्तपत्राला पत्रव्यवहाराद्वारे पाठवित. १९३०-३१ सालात सुमारे दीड वर्ष बातमीदार म्हणून यशवंतरावांनी काम केले. ते अधिकृत बातमीदार नसल्याने व 'एका बातमीदाराकडून' इतकेच त्या वृत्ताच्या वर छापले जात असल्याने पोलीस संशय असतानाही यशवंतरावांवर ठोस कारवाई करू शकले नाहीत. स्वातंत्र्यलढ्यात सर्वस्वाचा त्याग करणारे कार्यकर्ते हेच यशवंतरावांचे प्रेरणास्थान होते.

बिळाशी येथे झालेल्या जंगल सत्याग्रहात पोलीसांनी केलेल्या अनन्वीत अत्याचारात लोकांना धीर देण्यासाठी यशवंतराव आपले जोडीदार राघूअण्णा लिमये यांच्या बरोबरीने सहभागी झाले. बिळाशीच्या आजूबाजूच्या ४०-५० गावात या सत्याग्रहाचे लोण पसरले होते. सरकारी कायद्याचा अंमल करणाऱ्या तलाठी, गाव पाटील या मंडळींना सहकार्य करायचे नाही, असे या सत्याग्रहाचे स्वरूप होते. कराड ते पेठनाका हा प्रवास सर्व्हिस मोटारने करून तेथून पुढे वाटेत एका गावात मुक्काम करून सुमारे ३५ मैलाचा प्रवास पायी करून यशवंतराव व राघूअण्णा बिळाशीला पोहचले. रात्री खूप उशिरा बिळाशीच्या एका चौकातील पारावर सभा झाली. यशवंतराव व राघूअण्णा लिमयेंनी

जमलेल्या लोकांना आपल्या भाषणातून प्रेरणा दिली. बिळाशी पंचक्रोशीतील लोकांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत, अशी ग्वाही यशवंतरावांनी दिली.

१९३४ च्या कायदेभंग चळवळीनंतरचे काँग्रेसचे अधिवेशन १९३५ मध्ये मुंबई येथे होणार होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी डॉ.राजेंद्रप्रसाद यांची निवड झाली. काँग्रेसच्या या राष्ट्रीय स्तरावरील पहिल्याच अधिवेशनाला जाण्याची संधी यशवंतरावांना मिळाली. यापूर्वी यशवंतरावानी मुंबई पाहिली नव्हती. डॉ.राजेंद्र प्रसादांचे मुंबईत झालेले भव्य स्वागत यशवंतरावांना पहावयास मिळाले. जातीय निवाडा, मुस्लीमांसाठी स्वतंत्र मतदार संघ या दोन प्रमुख मुद्यावर पं. मदनमोहन मालवीय व अन्य नेत्यांची भाषणे यशवंतरावांनी लक्षपूर्वक ऐकली.

यशवंतरावांचे एक मित्र दयार्णव कोपार्डेकर यांच्यामुळे त्यांना सानेगुरूजींची भेट या अधिवेशनादरम्यान लाभली. गुडघे पोटाशी धरून, एकटेच एका चटईवर चिंतनात व्यस्त होऊन साने गुरूजी बसले होते. दयार्णवने यशवंतरावांची ओळख साने गुरूजींना करून दिली. त्यावेळी ते स्मितहास्य करून म्हणाले,

''फार फार छान, दयार्णवचे चांगले मित्र म्हणूनच रहा!''

साने गुरूजींची ही भेट यशवंतरावांच्या चांगलीच स्मरणात राहिली. पुढे साने गुरूजींनी लिहिलेली 'श्यामची आई' या कादंबरीचे हस्तलिखित कोल्हापूरला आल्यावर दयार्णव कोपार्डेकरने यशवंतरावांना वाचण्यास दिले. त्यावेळी ही कादंबरी अद्याप प्रकाशित व्हावयाची होती. तोपर्यंत साने गुरूजींचे लेखक म्हणून नाव अद्याप प्रसिद्धीस आले नव्हते. दयार्णव साने गुरूजींच्या अत्यंत निकटवर्तीय असल्याने आपल्या कादंबरीचे प्रकाशन करण्याची जबाबदारी त्यांनी दयार्णववर सोपविली होती.

एका मोठ्या वहीत स्पष्ट हस्तक्षरांत साने गुरुजींनी ही कादंबरी लिहिली होती. तीन दिवसांत यशवंतरावांनी ही कादंबरी वाचली. मराठी वाङ्मयात आपण नवीन काही वाचतो आहोत, याची जाणीव त्यांना झाली. 'श्यामची आई' वाचत असताना त्यांचे डोळे अनेकवेळा पाणावले गेले. या कादंबरीतील

साने गुरूजींचे प्रत्येक वाक्य भावनेने ओथंबून गेलेले होते. आईच्या अमर प्रेमाची व महानतेची जाणीव यशवंतरावांना यावेळी झाली. भावनावश झालेल्या यशवंतरावांनी दयार्णवला मिठीच मारली. हृदय भरून आले. यशवंतराव दयार्णवला म्हणाले,

"साने गुरूजींसारख्या फार मोठ्या साहित्यिकाचे हस्तलिखित मला वाचायला मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो. तुझे हे प्रकाशन यशस्वी होईल, याची मला खात्री वाटते."

साने गुरूजींच्या 'श्यामची आई' या कादंबरीचा अशा रितीने ऋणानुबंध यशवंतरावांशी जोडला गेला.

१९३८ मध्ये बी.ए.ची पदवी घेतल्यानंतर एखादी शिक्षण संस्था काढून राष्ट्रीय वृत्तीचा शिक्षक होणे अगर एखादे वृत्तपत्र सुरू करून संपादक म्हणून काम करणे असा यशवंतरावांचा विचार होता. त्यांच्या काही मित्रांनी सांगितले, "शिक्षक किंवा संपादक होण्यासाठी कायद्याचे ज्ञान काही तुझ्या आडवे येणार नाही. फक्त पदवीधरच राहिलास तर अध्यविर लोंबकळत राहशील."

यानंतर यशवंतरावांनी पुण्यामध्ये एल.एल.बी.ला प्रवेश घेतला. पुण्यातील हनुमान टेकडीच्या उतरणीवर लॉ कॉलेजची नवीनच इमारत झाली होती. येथून अर्धे पुणे शहर दिसायचे. सुसज्ज लायब्ररी, प्रशस्त अभ्यासिका, चांगला अध्यापक वर्ग यामुळे यशवंतराव या कॉलेजमध्ये चांगलेच रमले. शुक्रवार पेठेतील राहत्या घरापासून कॉलेजला ते सायकलवरून जात. सुमारे अर्ध्या तासाचा हा प्रवास असायचा. येथील वातावरणात ज्ञानार्जनासाठी पुष्कळ पुस्तके यशवंतरावांना उपलब्ध झाली. पुढे कायद्याची पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी काही काळ वकिली केली.

१९४१ मध्ये झालेल्या सातारा जिल्हा लोक बोर्डच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत आनंदराव चव्हाण व पाटणचे बाळासाहेब देसाई यांच्यात निवडणूक झाली. दोन्हीही उमेदवार वकिलीची पदवी प्राप्त केलेले होते. यशवंतरावांनी बाळासाहेब देसाईंच्या पाठिशी आपली ताकद लावून त्यांना

निवडून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या निवडीने पाटण तालुक्यातील डोंगराळ, दुर्गम भागात राहणाऱ्या जनतेला खूप आनंद झाला. बाळासाहेबांच्या सत्कार समारंभाचे यशवंतरावांनी अध्यक्षस्थान भुषविले.

१९४२ च्या दरम्यान यशवंतरावांना वकिलीच्या व्यवसायातून महिना पाचशे रूपये मिळत होते. खटला चालविण्याच्या निमित्ताने त्यांना सातारा, कराड,. इस्लामपूर, कोल्हापूर, पन्हाळा आदी ठिकाणीही जावे लागले. इस्लामपूरचे त्यांचे वकील मित्र के. डी. पाटील व अन्य चार मंडळींना घेऊन कोडोलीला जाण्याचा प्रसंग यशवंतरावांवर आला. वकिलीच्या व्यवसायाबरोबरच राजकारणाशीही त्यांचा संबंध आला होता. अलाहाबाद काँग्रेस अधिवेशनानंतर निर्माण झालेल्या राजकीय प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी कोल्हापूर संस्थानातील कोडोली येथे आपले जवळचे मित्र विश्वनाथ अण्णा तथा तात्यासाहेब कोरे यांच्याकडे जायचे निश्चित करण्यात आले. १९४२च्या दरम्यान कोडोली परिसरात प्रजापरिषदेचे काम तात्यासाहेब कोरे चांगल्यारितीने पहात होते. कोडोली गावानजीक असणाऱ्या तात्यासाहेब कोरेंच्या डागमळ्यात यशवंतराव, के. डी. पाटील व अन्य चार वकील असणारे पण प्रजापरिषदेचे काम करणारी मंडळी एका शनिवार , रविवारी एकत्र जमली. प्रजापरिषदेचे काम कशारितीने करावयाचे, देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपण कोणती भूमिका बजावायची या विषयावरच प्रामुख्याने चर्चा घडली. तात्यासाहेब कोरेंनी वारणा नदीकाठी उत्तम प्रकारे शेती फुलविली होती. आर्थिक स्थिती उत्तम असणाऱ्या तात्यासाहेबांनी यशवंतरावांच्या राजकीय कार्याला चांगले पाठबळ दिले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व केंद्रात अनेक महत्त्वाच्या खात्याचे मंत्री बनले. इकडे कोडोलीच्या माळावर तात्यासाहेबांनी वारणानगर ही औद्योगिक वसाहत वसवून साखर कारखाना, दूधसंघ, शिक्षणसमूह व अन्य उद्योग सुरू केले. यशवंतरावांनी राजकीय क्षेत्रात भरारी घेतली तर तात्यासाहेबांनी सहकारक्षेत्राला आपलेसे केले. या दोन आपआपल्या क्षेत्रात यशोशिखरावर पोहोचलेल्या कर्मवीरांनी मात्र एकमेकांशी असलेले ऋणानुबंध आयुष्यभर जपले.

डागमळ्यात सुरू असलेल्या चर्चेदरम्यान थट्टेने तात्यासाहेब कोरे यशवंतरावांना म्हणाले, "तुम्हाला हे उद्योग करायचे होते, तर वकिलीच्या पाट्या कशाला लावून बसलात?"

तात्यासाहेबांच्या या प्रश्नावर यशवंतरावांनी सांगितले, "वकिली बरोबरच राजकारणही करता येते. आमचे राजकारण हे स्वातंत्र्यप्राप्तीचे राजकारण आहे. वकिलीपेक्षा आमचे राजकारणाला अधिक प्राधान्य आहे."

८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसचे अधिवेशन मुंबईत आयोजित करण्यात आले होते. यासाठी मुंबईत खेतवाडीच्या पान बाजारात यशवंतराव व अन्य दहा जणांच्या रहाण्याची व्यवस्था तात्यासाहेब कोरेंच्या सहकार्यातून झाली. भविष्यात बऱ्याचदा तात्यासाहेबांचे सहकार्य यशवंतरावांना लाभत गेले.

१९४२ च्या चले जाव आंदोलनानंतर अनेक प्रमुख नेत्यांना ब्रिटिश सरकारने अटक केली. एस. एम, जोशी, अच्युतराव पटवर्धन, डॉ.राम मनोहर लोहिया, नानासाहेब गोरे आदी प्रमुख नेत्यांनी भूमिगत राहून चळवळीचे नेतृत्व केले. मुंबईमध्ये अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे यांच्या मध्यस्थीने यशवंतरावांची व डॉ. राम मनोहर लोहियांची भेट झाली. उत्तरप्रदेश व बिहारमधील चळवळीचा वृत्तांत डॉ. लोहियांकडून यशवंतरावांना समजला. यशवंतरावांनी सातारा जिल्ह्यांतील आपल्या चळवळीतील कार्याचा वृत्तांत डॉ. लोहियांना सांगितला. लोकनेता कसा असावा याची प्रचिती डॉ. लोहियांच्या भेटीतून यशवंतरावांना आली. साम्यवादी नेते एस. एम. जोशी यांचीही यादरम्यान यशवंतरावांशी भेट झाली. एस. एम. भूमीगत असल्याने त्यांनी बोहरी मुसलमानाप्रमाणे दाढी वाढवून पोशाख घातला होता. त्यांच्या भेटीतून भूमिगत चळवळीतील महत्त्वाचा वृत्तांत यशवंतरावांनी जाणून घेतला. अशारितीने यशवंतराव सर्वच पातळीवर प्रयत्न करून आपल्याला स्वातंत्र्यलढा चालविण्यासाठी जे करता येणे शक्य आहे ते करण्यासाठी प्रयत्नशील होते.

यशवंतरावांवर थोर समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांचा मोठा पगडा होता. कराडला अस्पृश्य मुलांच्या शाळेचे उद्घाटन करण्यास आले असता विठ्ठल रामजींचे विचार यशवंतरावांना ऐकण्यास मिळाले त्यांच्या

वैचारिक संस्कारामुळे यशवंतराव पुरोगामी विचाराकडे वळले. त्या संस्कारातून त्यांनी पुढे महार वतनाचा कायदा रद्द केला. नवबौद्धांना त्यांच्या अस्पृश्य जातीसाठी असणाऱ्या सवलती पुढे चालू ठेवल्या. पुरोगामी विचारांचा दीनदलितांचा कैवारी नेता ही यशवंतरावांची प्रतिमा त्यामुळेच तयार झाली.

शरद पवारांसारखा दूरदृष्टी असणारा, व्यापक जनसंपर्क लाभलेला नेता यशवंतरावांच्या मार्गदर्शनाखालीच तयार झाला. यशवंतरावानंतर इतकी लोकप्रियता लाभलेला व स्वकर्तृत्वावर दिल्लीपर्यंत धडक देणारा महाराष्ट्रातील एकमेव नेता म्हणून आज शरद पवारांची जी प्रतिमा तयार झाली आहे त्याची जडणघडण यशवंतरावांच्या देखरेखीखालीच झाली. म्हणूनच आज संपूर्ण महाराष्ट्र शरद पवारांना यशवंतरावांचे मानसपुत्र म्हणून ओळखतो. या दोघांतील फरक इतकाच की, यशवंतरावांनी राजकारणातील आपली घौडदौड कॉंग्रेसच्या प्रवाहात राहून, पक्षनिष्ठा सांभाळून केली, तर शरद पवारानी आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीसाठी कॉंग्रेस पक्ष सोडून स्वतःचा स्वतंत्र राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष स्थापन केला.

यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या आठवणी सांगताना शरद पवार म्हणतात, ''आयुष्यातील आजपर्यंतच्या माझ्या वाटचालीचा पाया चव्हाणसाहेबांच्या मार्गदर्शनाखालीच घातला गेला. मोरारजीभाई देसाईंचा सक्त विरोध मोडून पंडित नेहरूंना महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी अनुकूल बनविण्यात चव्हाणसाहेब यशस्वी ठरले. युवक कॉंग्रेसच्या माध्यमातून काम करत असताना साहेबांचे प्रभावी वक्तृत्व व कुशल नेतृत्व मला मार्गदर्शक ठरले.''

शरद पवार महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना एकदा त्यांच्या कॉलेजमध्ये एका कार्यक्रमानिमित्त यशवंतरावांना निमंत्रित करण्यात आले होते. मान्यवरांच्या स्वागताची जबाबदारी शरद पवारांवर होती. पाहुण्यांचे स्वागत करताना शरद पवारांनी दाखविलेला वक्तशीरपणा, बोलण्यातील अचूकता व त्याच्यात असणारे नेतृत्वगुण यशवंतरावांनी हेरले. कार्यक्रम संपल्यानंतर यशवतंरावांनी त्याचे नाव, गाव याबाबत विचारपूस केली . तरूणवर्गामध्ये काम करण्याबद्दल यशवंतरावांनी शरद पवारांना प्रोत्साहित

केले. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या पहिल्या भेटीनेच प्रभावित झालेल्या शरद पवारांनी पुढील काळात राजकारणात पदार्पण केले. यशवंतरावांची कुठेही सभा, भाषण असले की शरद पवार आपल्या युवक कार्यकर्त्यांना घेऊन आवर्जून उपस्थित राहू लागले. महाराष्ट्रातील युवक काँग्रेसची जबाबदारी चव्हाणसाहेबांनी पवारांवर सोपविली. युवकांमध्ये कार्य वाढविण्यास सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन केले.

१९६६ मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. शरद पवारांनी बारामती विधानसभा मतदारसंघातून उमेदवारीची मागणी केली. पुणे जिल्ह्यातील तत्कालीन काही ज्येष्ठ नेत्यांनी शरद पवारांच्या उमेदवारीस विरोध करून त्यांच्यात निवडून येण्याची क्षमता नाही, असे आग्रहाने बैठकीत मांडले. यशवंतरावांनी मुत्सद्देगिरीने या मंडळीना प्रश्न केला, ''या निवडणुकीत काँग्रेसला २८८ पैकी किती जागा मिळतील.''

काहींनी दोनशे जागा मिळतील तर काहींनी दोनशे दहा जागा मिळतील असे सांगितले. यावर यशवंतराव मार्मिक शब्दात बोलले, ''याचा अर्थ ७० ते ८० मतदारसंघात आपला पराभव होणार हे निश्चित. त्यामध्ये आणखी एका पराभवाची भर घालू व शरदला संधी देऊ.''

यशवंतरावांनी अशारितीने ज्येष्ठांचा विरोध डावलून शरद पवारांना संधी दिली. त्या निवडणूकीत शरद पवार पुणे जिल्ह्यात सर्वाधिक मताने निवडून येऊन त्यांनी यशवंतरावांचा आपल्यावरील विश्वास सार्थ ठरविला. जणू शरद पवारांच्या राजकीय वाटचालीचा प्रारंभच यशवंतरावांच्या योगदानातून झाला. पहिली पाच वर्षे आमदार म्हणून शरद पवारांनी आपल्या कार्याचा ठसा महाराष्ट्र विधानसभेत उमटविला. १९७२ च्या विधानसभा निवडणूकीनंतर नवे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी संभाव्य मंत्रिमंडळाची यादी तयार करून तिला काँग्रेस अध्यक्षांची मंजुरी घेतली. शरद पवारांचे या यादीत नाव नव्हते. यशवंतरावांनी ती यादी पाहताच इंदिराजींना तातडीने दूरध्वनी करून, 'युवक पिढीचे नेतृत्व म्हणून शरद पवारांचे नाव यात असले पाहिजे,' असे आग्रहाने सांगितले. इंदिराजींची मान्यता मिळताच शरद पवारांचे मंत्रिमंडळात नाव

समाविष्ट करून त्यांच्याकडे गृह व सामान्य प्रशासन खात्याचे राज्यमंत्रीपद देण्यात आले. यशवंतराव पुढील काळात दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात अनेक वर्षे राहिले, पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ बनविताना त्यांचा निर्णय हा अंतिम मानला गेला.

यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या मार्गदर्शनाबद्दल शरद पवार म्हणतात, ''राजकारणात लोक जोडले पाहिजेत, समाजाच्या विविध घटकांशी सुसंवाद ठेवला पाहिजे. साहित्य, संगीत, नाटक, कला-क्रीडा जगत यांच्याशी जवळीक ठेवली पाहिजे. कितीही मोठ्या पदावर गेलो, तरी सभ्यता, सुसंस्कृतपणा व नम्रता यांचे विस्मरण होता कामा नये, याची शिकवण मला चव्हाणसाहेबांमुळेंच मिळाली.''

१९८० च्या लोकसभा निवडणूकीपूर्वी काँग्रेसचे विभाजन इंदिरा काँग्रेस व स्वर्णसिंग काँग्रेस या दोन गटात झाले. शरद पवारांनी यशवंतरावांच्या पाठोपाठ स्वर्णसिंग (एस.) काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यशवंतरावांच्या उत्तरार्धातील प्रत्येक बारीकसारीक घटनांचे साक्षीदार शरद पवार होते. म्हणूनच त्यांना यशवंतरावांचे राजकीय वारसदार म्हणून ओळखले जाते.

शरद पवार यांच्या साथीने सुशिलकुमार शिंदे राजकारणात आले. काँग्रेस फोरम फॉर सोशॅलिस्ट ॲक्शनचे महासचिवपदी प्रारंभी सुशिलकुमार शिंदेंनी काम पाहिले. यशवंतरावांशी सुशिलकुमार शिंदेंची ओळख शरद पवारांनी करून दिली. नाईट हायस्कूलमध्ये कष्टातून शिक्षण, कोर्टात 'बॉय प्यून' अशा विविध क्षेत्रात काम केल्याचे सांगण्यात आले. यशवंतरावांना सुशिलकुमारांच्या धडपडीबद्दल आत्मियता वाटली व त्यांना भविष्यात कायमचेच जवळ केले.

पूर्वाश्रमीचे काँग्रेसचे खासदार व ज्येष्ठ नेते मोहन धारिया यांनाही यशवंतरावजींचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. यशवंतरावजींची पक्षनिष्ठा, तत्त्वाशी असणारी बांधिलकी हे गुण मोहन धारियांना जवळून पहावयास मिळाले. वेणूताई- यशवंतरावांच्या सहजीवनाविषयी मोहन धारिया सांगतात.

''यशवंतराव आणि वेणूताईंचे जे सहजीवन आम्ही बघितले, ते

पाहिल्यावर माथा आदराने झुकतो. वेणूताईंबद्दल असलेली त्यांची निष्ठा, प्रेम यांना शब्दच नाहीत. त्या काळी टी. बी. सारख्या असाध्य आजाराने वेणूताईंना ग्रासले होते. ज्येष्ठ स्नेही किसन वीर व खुद्द वेणूताईंनी यशवंतरावांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह धरला. यशवंतरावांनी हा सल्ला मानला नाही आणि वेणूताईंना कधीही अंतर दिले नाही. म्हणूनच त्यांना 'पत्नीव्रती' मानावे लागेल.''

१९७१ मध्ये महाराष्ट्र युवक काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविलेल्या व नंतर आमदार व अन्य महामंडळावर काम केलेले उल्हास पवार, केंद्रात विविध मंत्री पदे भूषविलेले व सध्या महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर काम करणारे पृथ्वीराज चव्हाण, अहमदनगरमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार यशवंतराव गडाख, नाशिकचे वनाधिपती विनायकराव पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते माजी आमदार डॉ. केशवराव धोंडगे अशा कितीतरी नेत्यांचे राजकीय जीवन यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने फुलले.

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पृथ्वीराज चव्हाणांनी कराडला जाऊन प्रीतिसंगमावरील यशवंतरावजींच्या समाधीचे दर्शन घेतले. याप्रसंगी पृथ्वीराज चव्हाण म्हणतात.

''मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच मी कराडला येऊन चव्हाणसाहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी किती मोठी आहे याची खऱ्या अर्थाने मला जाणीव झाली.''

पृथ्वीराज चव्हाणांचे वडील आनंदराव व यशवंतराव हे दोघे महाविद्यालयीन जीवनापासूनचे जीवलग मित्र. आनंदराव चव्हाण हे पूर्वाश्रमीचे शेतकरी कामगार पक्षाचे कट्टर कार्यकर्ते. यशवंतरावजींच्या बेरजेच्या राजकारणातून आनंदराव काँग्रेस पक्षात दाखल झाले. यशवंतरावांनी आपला हक्काचा कराड लोकसभा मतदारसंघ पुढील काळात आनंदरावांना दिला व स्वत: सातारा लोकसभा मतदारसंघातून निवडणूकीला उभा राहिले. आनंदरावजी चव्हाण यांनी कराड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. यशवंतरावजींच्या त्यागामुळेच आनंदराव चव्हाण, त्यांच्या पत्नी प्रेमलताताई

चव्हाण व पुत्र मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना कराड लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. यानंतर या कुटुंबाची उत्तरोत्तर राजकीय प्रगती होत गेली.मिळालेल्या वारशाचा योग्य वापर करून केंद्रात मंत्रीपद व सध्या महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपद या पदावर पृथ्वीराज चव्हाण विराजमान झाले. यशवंतरावांप्रमाणेच आनंदरावजी चव्हाणांच्या कुटुंबाने काँग्रेस पक्षावर ठेवलेल्या निष्ठेचे योग्य फळ त्यांना मिळाले.

यशवंतराव चव्हाणांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले. **'कसेल त्याची जमीन'** या तत्वावर नवा कूळकायदा त्यांच्या काकीर्दीतच लागू झाला. त्यामुळे लहान गरीब शेतकऱ्याला मोठा दिलासा मिळाला. १९६१ मध्ये पानशेत व खडकवासला धरण फुटून पुणे शहर जलमय झाले. या अत्यंत कठीण प्रसंगी यशवंतराव पुणेकरांच्या मदतीसाठी धावले. ही गंभीर परिस्थिती हाताळताना यशवंतरावांच्या प्रशासनातील अनेक पैलू पुणेकरांना अनुभवायला मिळाले.

यशवंतराव मुंबई सोडून दिल्लीच्या राजकारणात गेले, तरी त्यांचा मुंबईशी संपर्क कायम होता. शिवसेनेच्या स्थापनेपूर्वी बाळासाहेब ठाकरे **'मार्मिक'** हे साप्ताहिक चालवित होते. शिवाजी पार्क, दादर येथील बालमोहन विद्यालयाच्या सभागृहात यशवंतरावजींच्या हस्ते या साप्ताहिकाचे प्रकाशन झाले. यावेळी त्यांनी मराठीतील पहिले व्यंगचित्र साप्ताहिक म्हणून **'मार्मिक'** च्या प्रकाशन सोहळ्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या.

१९८० च्या विधानसभा निवडणूकीत महाराष्ट्रात काँग्रेस पुन्हा एकदा सत्तेवर आली. बॅरिस्टर ए. आर. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. यावेळी यशवंतराव केंद्रात विरोधी बाकावर होते. यावेळी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या प्रारंभी विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर शेतकरी दिंडी आयोजित केली होती. यशवंतराव या दिंडीत सहभागी झाले. यशवंतराव व अन्य विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक करून बसमधून अन्यत्र सोडण्यात आले. स्वातंत्र्यानंतर कित्येक वर्षांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आंदोलन करून पूर्वीचीच जिद्द कायम असल्याचे यशवंतरावांनी दाखवून दिले.

महाराष्ट्र विधानपरिषदेवर साहित्यिक, पत्रकार, समाजसेवक यांना घेण्याचा पायंडा यशवंतरावांच्या कारकिर्दीतच पाडण्यात आला. प्रारंभी साहित्यिक ग. दि. माडगुळकरांना विधानपरिषदेवर घेऊन या प्रथेचा प्रारंभ करण्यात आला. पक्षीय हस्तक्षेप बाजूला सारून योग्य व पात्र व्यक्तिंची नेमणूक व्हावी याची दक्षता यशवंतरावांनी घेतली. कुटुंबनियोजन क्षेत्रात भरीव कार्य केल्याबद्दल शकुंतला परांजपेंना विधानपरिषदेवर घेण्यात आले. सभागृहात श्रीमती परांजपेंनी विरोधी प्रजा समाजवादी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले तरीही यशवंतरावांनी त्यास हरकत घेतली नाही. पानशेत पूर आपत्ती यशस्वीरित्या हाताळल्याची दखल घेऊन माजी सनदी अधिकारी स. गो. बर्वे यांना १९६२ साली पुणे शहरातून विधानसभेची उमेदवारी देण्यात आली. निवडणुकीतील विजयानंतर त्यांच्याकडे राज्याच्या अर्थमंत्री पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. भारतीय लष्करातील ज्येष्ठ निवृत्त अधिकारी एस. पी. पी. थोरात यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक करण्यात आली. बडोदा संस्थानचे राजकवी यशवंत यांना महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर लगेचच 'महाराष्ट्र कवी' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले विविध क्षेत्रातील रत्ने शोधून त्यांचा उच्चीत सन्मान करण्याची गुणग्राहकता यशवंतरावांजवळ होती हेच यावरून दिसून येते.



**सौ. वेणूताई चव्हाण स्मारक (कराड)**

# १२. अखेरचा प्रवास

कोणत्याही यशस्वी पुरुषामागे त्याच्या पत्नीची साथ महत्त्वपूर्ण असते. यशवंतरावांच्या जीवनात त्यांच्या पत्नी वेणूताईंची साथ खूपच मोलाची मानावी लागेल. आयुष्याच्या प्रत्येक चढउतारावेळी वेणूताईंनी त्यांना खूप मोठा आधार दिला. १ जून १९८३ रोजी वेणूताई चव्हाणांचे दुःखद निधन झाले. आयुष्याच्या अखेरीस खऱ्या अर्थाने पत्नीचा आधार हवा होता, अशावेळीच वेणूताई निघून गेल्याने यशवंतरावांना खूप मोठा मानसिक धक्का बसला. वेणूताईंशिवाय जीवन हा विचारच यशवंतरावांना सहन होण्यासारखा नव्हता. यानंतरचा बराच काळ यशवंतराव अस्वस्थ होते. 'भारत-पाक युद्ध', 'भारत-चीन युद्ध' अशा अनेक कठीण प्रसंगांना तोंड देणारा हिमालयासारखा खंबीर मनाचा हा माणूस यावेळी मात्र खचला. वेणूताईंच्या जाण्याचे दुःख यशवंतरावांना पचविणे खूपच मुश्किल बनले. अखेरीस नियतीपुढे कोणाचेच काही चालत नाही. काळ कोणासाठी थांबत नाही. यशवंतरावांना हे दुःख पचविण्याशिवाय गत्यंत्तर नव्हते.

वेणूताईंच्या निधनानंतर यशवंतरावांनी आपले इच्छापत्र (वुईल) लिहिले. या इच्छापत्रानुसार ९ जानेवारी १९८४ रोजी **'वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'** ची स्थापना करण्यात आली. १ जून १९८४ रोजी वेणूताईंच्या प्रथम पुण्यतिथीला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या उपस्थितीत कराड येथे वेणूताईंच्या स्मारकाचे भूमिपूजन यशवंतरावांनी स्वतःच्या हस्ते केले. या स्मारकासाठी लागणाऱ्या रक्कमेपैकी जास्तीत-जास्त रक्कम आपण स्वतःच द्यायची. सौ. वेणूताईंचे दागिने विकून व उरळीकांचन येथील बागायत जमीन विकून ती सर्व रक्कम या स्मारकासाठी देण्याची तरतूद यशवंतरावांनी आपल्या ईच्छापत्रात लिहून ठेवली होती. या स्मारकासाठी शिवाजीनगर को. ऑ. हौसिंग सोसायटीने १८ गुंठे जागा उपलब्ध करून दिली. बांधकामाची जबाबदारी न्यू ट्रीओ बिल्डर्स यांच्यावर सोपविली गेली. हे स्मारक पूर्णत्वास आलेले पहाण्याचे भाग्य मात्र यशवंतरावांना लाभले नाही. यशवंतरावांच्या मृत्यूपश्चात या स्मारकाचे उद्‌घाटन महाराष्ट्राचे तत्कालीन

राज्यपाल सी. सुब्रम्हण्यम यांच्या हस्ते २५ नोव्हेंबर १९९२ रोजी करण्यात आले. कराडच्या शिवाजी स्टेडियम समोरील अत्यंत रमणीय जागेत हे स्मारक उभारले गेले असून या स्मारकामध्ये यशवंतरावांनी वाचलेली पुस्तके, त्यांनी हाताळलेले संदर्भग्रंथ, दुर्मिळ नोंदी, लिहिलेली पुस्तके, वापरलेल्या वस्तू आदींचे वस्तूसंग्रहालय निर्माण केले आहे. १९६२ पासून यशवंतरावांनी वापरलेली अॅम्बॅसीडर गाडीही येथे जनत करून ठेवण्यात आली आहे. सौ. वेणूताई व यशवंतरावांच्या सहजीवनाची चिरंतन आठवण सांगणारा मौलिक ठेवा म्हणजेच **'सौ. वेणूताई चव्हाण स्मारक'** होय.

आपल्या जीवनाचा उत्तरार्ध जवळ आला आहे याची जाणीव यशवंतरावांना होऊ लागली होती. आपल्या जीवनाची जडण-घडण कशी झाली याची मांडणी करण्याचा विचार त्यांच्या मनात घर करत होता. ज्या कृष्णेच्या काठावर लहानाचा मोठा झालो, ज्या कृष्णेने आपल्याला वाढविले, तिच्या आठवणी त्यांना सदैव होऊ लागल्या. विचार भूतकाळाचा वेध घेण्यासाठी धावू लागले. या विचारमंथनातून यशवंतरावांनी आपले आत्मचरित्र लिहावयास घेतले. ज्या कृष्णेच्या काठावरून आपल्या जीवनाची सुरूवात झाली, त्यावरून यशवंतरावांनी आपल्या आत्मचरित्राला **'कृष्णाकाठ'** असे समर्पक नाव दिले. आपल्या संघर्षमय जीवनाचे सिंहावलोकन त्यांनी या आत्मचरित्रातून केले. ७ फेब्रुवारी १९८४ रोजी या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडाचे प्रकाशन झाले. 'केसरी-मराठा' या संस्थेतर्फे आत्मचरित्रास 'साहित्यसम्राट न.चि.केळकर पारितोषिक' देऊन गौरविण्यात आले. यशवंतरावांचे संघर्षमय, त्यागमय जीवन 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राद्वारे वाचकांसमोर आले.

जीवनभर अविश्रांत परिश्रम घेतलेला हा तेजोमय पुरुष आता थकला होता. मन धावत होते पण शरीर साथ देत नव्हते. घडणाऱ्या घडामोडींकडे पहात रहाणे एवढेच आता हातात होते. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी पंतप्रधान इंदिराजी गांधींची पहारेकऱ्यांकडूनच गोळ्या झाडून निघृण हत्या झाली. मारेकरी शीख धर्मीय असल्याने देशभर शीखविरोधी दंगल भडकलेली होती.

यशवंतरावांसह सर्वच प्रमुख नेते धार्मिक सलोखा राखण्यासाठी प्रयत्नशील होते. दंगल कोणत्याही परिस्थितीत नियंत्रणात आणणे एवढेच उद्दिष्ट होते. अथक प्रयत्नानंतर दंगल नियंत्रणात येऊ लागली. हिंसेचा आगडोंब काही दिवसातच आटोक्यात आला. यशवंतराव काहीसे निर्धास्त झाले. नवे पंतप्रधान म्हणून राजीव गांधींची निवड झाली. नेहरू-गांधी घराण्यातील तिसरे नेतृत्त्व सत्तेवर आले. देशाला राजकीय स्थिरता प्राप्त करून देण्यात यशवंरावांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जीवनाच्या उत्तरार्धात यशवंतरावांनी आपले आत्मचरित्र लिहून पूर्ण केले. निष्कलंक चारित्र्याचे समाजवादी नेते श्रद्धेय एस्.एम्.जोशी यांचा ८० वा वाढदिवस पुण्यात साजरा केला जाणार होता. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची यशवंतरावांची तीव्र इच्छा होती. तशातच त्यांची प्रकृती अचानक बिघडली. दिल्लीतील रूग्णालयात यशवंतरावांना दाखल करण्यात आले. नव्यानेच पंतप्रधानपदाची सूत्रे हातात घेतलेले राजीव गांधी यशवंतरावांना वरचेवर रूग्णालयात जाऊन भेटत होते. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करीत होते. या लोकनेत्याला मात्र महाराष्ट्राची ओढ लागली होती. आयुष्याच्या अखेरीस आपण आपल्या मायभूमीत असावे अशी त्यांच्या मनाची तीव्र इच्छा होती. महाराष्ट्रभूमी व आपल्या संस्कारातून वाढलेले आपले अनुयायी यांना भेटण्याचे यशवंतरावांचे स्वप्न अखेरीस अधुरेच राहिले. ग्रीक शोकांतिकेतील भव्यदिव्य नायकाप्रमाणेच यशवंतरावांच्या जीवनाची अखेर झाली.

२५ नोव्हेंबर १९८४ रोजी सायंकाळी ७.४५ वाजता नवी दिल्ली येथे यशवंतरावांनी जगाचा निरोप घेतला. भारताच्या राजकीय क्षितीजावर स्वकर्तृत्वाने चमकणारा तेजोमय सूर्य वयाच्या ७१ व्या वर्षी अनंतात विलीन झाला. देशाबरोबरच संपूर्ण महाराष्ट्र एका असामान्य नेतृत्त्वाला मुकला. साधी राहणी, वास्तवतेचे भान असणारे अभ्यासू नेतृत्व, प्रचंड लोकसंग्राहक, अभ्यासपूर्ण वक्ते, ख्यातनाम साहित्यिक, द्रष्टे विचारवंत, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार अशा विविध उपाधींनी गौरविलेले **लोकनेते यशवंतराव चव्हाण** देशाच्या राजकारणात आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटवून निघून गेले.

यशवंतराव चव्हाणसाहेब शरीररूपाने जगातून निघून गेले पण त्यांचे विचारधन मात्र पाठीमागे ठेवून गेले. चव्हाणसाहेबांच्या संस्कारातून उदयास आलेले अनेक नेते महाराष्ट्राला व देशाला लाभले.

महाराष्ट्राला देशाच्या राजकारणात सन्मान मिळवून देण्यात यशवंतराव चव्हाणांचे योगदान खूपच मोठे मानावे लागेल. सहकार चळवळीची पाळेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात रूजवून सहकार समृद्ध करण्याचे कार्य त्यांच्या हातून घडले. देशाच्या क्षितीजावर चमकणारे व महाराष्ट्राला प्रगतीपथावर आणणारे **'आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार'** म्हणून या लोकनेत्याच्या कर्तृत्त्वाचा ठसा कायमस्वरूपी जनसामान्यांच्या हृदयसिंहासनावर कोरला गेला.

यशवंतरावांच्या निधनानंतर त्यांचे पार्थिव त्यांच्या कर्मभूमीत 'कराड' येथे आणण्यात आले. या लोकनेत्याच्या अंत्यदर्शनासाठी कराडच्या दिशेने जनसागर लोटला होता. राजकीय, उद्योगजगत, सामाजिक, साहित्यिक, शैक्षणिक अशा समाजाच्या विविध क्षेत्रातील मंडळींची रांग यशवंतरावांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन पुढे सरकत होती. यशवंतरावांच्या अंतिम इच्छेप्रमाणे त्यांच्या पार्थिवावर कृष्णा-कोयनेच्या संगमावर **'प्रीतिसंगम'** येथे अंत्यसंस्कार करण्याचे निश्चित करण्यात आले. प्रत्यक्ष अंत्ययात्रेत हजारो नागरिक सहभागी झाले होते. रस्त्याच्या दुतर्फा प्रचंड गर्दी होती. अबालवृद्ध स्त्री-पुरुषांकडून पार्थिवावर फुले टाकली जात होती. संथगतीने अंत्ययात्रा 'प्रीतिसंगम' येथे आली. २७ नोव्हेंबर १९८४ रोजी दुपारी ३.४० वाजता शासकीय इतमामात यशवंतरावांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यशवंतराव चव्हाणसाहेबांचे पार्थिव अनंतात विलीन झाले.

यशवंतराव ही केवळ एक व्यक्ती नसून ती एक विचारधारा होती. असंख्य कार्यकर्त्यांची ती जीवनधारा होती. प्रीतिसंगमावरील चव्हाणसाहेबांची समाधी राजकीय, सामाजिक क्षेत्रातील कार्य करणाऱ्या समाजधुरिणांच्या दृष्टीने प्रेरणास्थानच बनले.

'यशवंतराव चव्हाण प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) पुणे', 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक' व 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,

मुंबई' या संस्थाद्‌वारे यशवंतरावांच्या विचाराचा प्रसार करण्याचे काम अव्याहतपणे आज सुरू आहे. भावी पिढ्यांना दीपस्तंभाप्रमाणे चिरंतन प्रेरणा देण्याचे काम या संस्था आज करीत आहेत.

१९४६ पासून १९८४ पर्यंतच्या ३८ वर्षाच्या प्रदीर्घ काळात यशवंतरावांनी राजकारणात अनेक चढउत्तार अनुभवले. सह्याद्रीसारखे खंबीर मन व हिमालयासारखी व्यापक दृष्टी ठेवून त्यांनी येणाऱ्या प्रत्येक आव्हानांना हसतमुखाने स्विकारले. महाराष्ट्राच्या जडण-घडणीत मोठे योगदान दिलेल्या व भारत-चीन युद्धासारख्या प्रसंगात देशाच्या रक्षणासाठी धावून जाणाऱ्या चव्हाणसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची शब्दात वर्णन करणे केवळ अशक्य आहे. मनमुराद व खळखळून हास्य, नेहमी प्रसन्न चेहरा, समस्या जाणून घेण्याची कल्पकता, विकासकामाचा ध्यास, जनसामान्यांच्या कल्याणाची आस, सतत कार्यमग्नता असे कितीतरी पैलू त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून पहावयास मिळतात. अल्पशिक्षित असणाऱ्या पण जीवनाकडे पहाण्याची व्यापक दृष्टी असलेल्या वेणूताईंनी त्यांना जीवनभर दिलेल्या साथीमुळेच यशवंतराव इतके विशाल कार्य करू शकले.

आज महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांच्या दृष्टीने यशवंतरावांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे प्रेरणादायी ठरत आहे. भरकटत जाणारे राजकीय नेते, कार्यकर्त्यांनी यशवंतरावांची विचारधारा समजून घेऊन कार्य केल्यासच समाजाचा राजकारणाकडे पहाण्याचा दृष्टिकोन विधायक बनेल. आजपर्यंत देशातील अनेक मान्यवरांना '**भारतरत्न**' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या २०१२ मध्ये होत असलेल्या **जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य** साधून त्यांना मरणोत्तर '**भारतरत्न**' पुरस्कार देऊन गौरविण्याची खरी आवश्यकता आहे. त्यामुळे राज्याच्या व राष्ट्राच्या विकासात बहुमोल योगदान देणाऱ्या एका महान नेत्याचा तो उच्चीत सन्मान ठरेल. राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना त्यामुळे निश्चितच प्रेरणा मिळेल !

**समाप्त ...**

# - जीवनपट-



**जन्म - १२ मार्च १९१३ मृत्यू - २५ नोव्हें. १९८४**

१९१३ - १२ मार्च, रोजी जन्म सातारा जिल्ह्यातील (सध्या सांगली जिल्हा) देवराष्ट्रे या गावी.

१९१७ - वडील बळवंतराव चव्हाण यांचे प्लेगच्या साथीत निधन. देवराष्ट्रे येथे चौथीपर्यंत शिक्षणानंतर कराड येथे शिक्षणासाठी दाखल.

१९२९ - भगतसिंगाच्या फाशीनंतर स्वातंत्र्यलढ्याला आयुष्य वाहून घेण्याचा संकल्प.

१९३०-३१- असहकाराच्या (कायदेभंग) चळवळीत सहभाग १८ महिन्यांच्या तुरूंगवासाची शिक्षा.

१९३४ - मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण. कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्ये प्रवेश. (प्राचार्य डॉ. बाळकृष्ण व प्रा. ना. सी. फडके यांचे मार्गदर्शन)

१९३५ - महाराष्ट्रातील समाजवादी पक्षाचे संस्थापक सदस्य.

१९३८ - इतिहास व राजकारण हे विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी. ए. ही पदवी परीक्षा उत्तीर्ण. पुणे येथील लॉ कॉलेजमध्ये प्रवेश.

१९४० - सातारा जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष.

१९४१ - (ऑगस्ट), एल. एल. बी. परीक्षा उत्तीर्ण.

१९४२ - (२ जून) कराड येथे वेणूताईंशी विवाहबद्ध.

१९४२ - (९ ऑगस्ट), 'छोडो भारत'आंदोलना सहभाग व अटक.

१९४४ - 'राजकीय क्रांती' या विषयावर कविता (तुरूंगवास)

१९४६ - (१४ एप्रिल) , गृहखात्याचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवड.

१९४८ - महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे चिटणीस.

१९५२ - कराड मतदारसंघातून विधानसभेवर निवड व नागरी पुरवठा मंत्री म्हणून नियुक्ती.

१९५६ - (१ नोव्हेंबर), विशाल द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना व द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून वयाच्या ४३ व्या वर्षी निवड.

१९५७ - (एप्रिल), मुंबई विधानसभेसाठी पुन्हा विजयी व पुनश्च मुख्यमंत्री.

१९५७ - (३० नोव्हेंबर), प्रतापगडावर शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे पं. नेहरुंच्या हस्ते उद्घाटन.

१९५९ - (२९ डिसेंबर) , अलिगड मुस्लीम विद्यापीठ, यांच्यावतीने **'डॉक्टर ऑफ लॉ'** पदवी प्रदान

१९६० - (मार्च) बारामती लोकसभा मतदारसंघातून विजयी.

१९६० - (१ मे), महाराष्ट्र राज्याची स्थापना. **पहिले मुख्यमंत्री** म्हणून यशवंतराव चव्हाण यांचा शपथविधी (वय ४७)

१९६० - (१० नोव्हेंबर), राज्य विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूरात भरविण्यास प्रारंभ.

१९६१ - (दिल्ली) ४३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष.

१९६२ - (१ मे) , पंचायत राज्य योजनेस प्रारंभ.

१९६२ - (फेब्रुवारी), महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका, कॉंग्रेसने २६५ पैकी २१४ जागा जिंकून प्रचंड विजय मिळविला.

१९६२ - (२२ नोव्हेंबर) , भारताचे संरक्षणमंत्री म्हणून सूत्रग्रहण.

१९६३ - नाशिक जिल्ह्यामधून लोकसभेवर बिनविरोध निवड.

१९६३ - अमेरिकेच्या संरक्षण खात्याचे सचिव मॅक्नोरा यांच्या निमंत्रणावरून अमेरिकेस भेट.

१९६३ - (ऑगस्ट), रशियाचा दौरा.

१९६५ - (१८ ऑगस्ट) , आई विठामाता यांचे निधन -मुंबई.

१९६६ - (जानेवारी), ताश्कंद येथे शास्त्रीजी - आयुबखान चर्चेस

यशवंतरावांची उपस्थिती (कोसिजीन यांच्या प्रयत्नानुसार)

१९६६ - (१४ नोव्हेंबर) , केंद्रीय गृहमंत्रीपदी निवड.

१९६६ - गृहमंत्रीपदी निवड. सहा महिन्यांतच १० राज्यपालांची नियुक्ती.

१९६९ - (२३ फेब्रुवारी) , कानपूर विश्व विद्यालयातर्फे **'डॉक्टर ऑफ लॉ'** सन्मानपूर्वक बहाल.

१९७० - (२६ जून) , केंद्रीय अर्थमंत्री म्हणून निवड.

१९७० - (१० फेब्रुवारी), औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठाची **'डॉक्टर ऑफ लॉ'** ही पदवी प्रदान .

१९७२ - सातारा मतदारसंघातून लोकसभेवर निवड, काँग्रेसने महाराष्ट्रातील लोकसभेच्या ४३ जागा जिंकल्या.

१९७४ - (१ डिसेंबर), कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठाची **'डॉक्टर ऑफ लॉ'** पदवी प्रदान.

१९७४ - (ऑक्टोबर), केंद्रीय परराष्ट्रमंत्री म्हणून निवड.

१९७५ - गियाना, क्युबा, लेबेनॉन, इजिप्त, पेरू, अमेरिका, अफगाणिस्तान,इराक, कुवेत व फ्रान्स इत्यादी राष्ट्रांना भेटी.

१९७६ - (१७ जानेवारी), परभणी, मराठवाडा कृषी विद्यापीठाची **'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी'** ही पदवी प्रदान.

१९७६ - (८ ऑक्टोबर), 'सदिच्छा राजदूत' म्हणून अमेरिकेतील होस्टन येथील टेक्सास शहरातर्फे मानपत्र.

१९७७-७८ लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड.

१९७९ - (जुलै), चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रिमंडळात **उपपंतप्रधान** आणि गृहमंत्री म्हणून निवड.

१९८० - सातारा, मतदारसंघातून लोकसभेवर निवड (रेड्डी काँग्रेसचे महाराष्ट्रातील एकमेव विजयी उमेदवार)

१९८२ - इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश.

१९८२ - आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्ष.

१९८३ - (१ जून), पत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांचे निधन.

१९८३ - (७ ऑक्टोबर) , आपले इच्छापत्र (वुईल) लिहिले.

१९८४ - (९ जानेवारी), सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल

ट्रस्टची स्थापना व नोंदणी.

१९८४ - (७ फेब्रुवारी), **'कृष्णाकाठ'** आत्मचरित्र: खंड पहिला प्रकाशित.

१९८४ - (२४ मार्च), पुणे विद्यापीठाची सन्माननीय **डी. लिट.** पदवी प्रदान.

१९८४ - (१ जून), सौ. वेणूताईंची प्रथम पुण्यतिथी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या उपस्थितीत सौ. वेणूताई स्मारकाचे भूमिपूजन.

१९८४ - (७ ऑक्टोबर), 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रास केसरी-मराठा संस्थेतर्फे 'साहित्यसम्राट न. चि. केळकर पारितोषिक'.

१९८४ - **(२५ नोव्हेंबर)**, सायंकाळी ७.४५ वाजता दिल्ली येथे **निधन.**

१९८४ - (२७ नोव्हेंबर), दुपारी ३.४० वाजता कराड येथे कृष्णा-कोयनेच्या **प्रीतिसंगमावर** अंत्यसंस्कार.



**कराड येथून निघालेली यशवंतरावांची अंत्ययात्रा दि. २७ नोव्हें. १९८४**

# संदर्भ पुस्तके


| पुस्तक | लेखक |
|---|---|
| १. कृष्णाकाठ (आत्मचरित्र) | - यशवंतराव चव्हाण |
| २. विचारधारा (गाजलेली भाषणे) | - यशवंतराव चव्हाण |
| ३. सह्याद्रीचे वारे | - यशवंतराव चव्हाण |
| ४. युगांतर | - यशवंतराव चव्हाण |
| ५. ऋणानुबंध | - यशवंतराव चव्हाण |
| ६. यशवंतराव चव्हाण : विविधांगी व्यक्तिमत्त्व | - वि. वि. पाटील |
| ७. यशवंत ('लोकराज्य' मासिक मार्च २०१२) | - संपादक- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, (महाराष्ट्र शासन) |



# लेखक परिचय :

**श्री. अनिल ईश्वरा चव्हाण,** (M. A., B. Ed.)

सहाय्यक शिक्षक - आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर.

**निवास :** 'साई सदन' प्लॉट नं. ५८, लक्ष्मीटेक कॉलनी,

सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर.

मो. : ८८०५००८६८६.

**संपादक** - साप्ताहिक **गरूडभरारी**

Email : garudbhararikop@yahoo.com

**संस्थापक** - भरारी एज्युकेशनल ॲण्ड सोशल फौंडेशन, कोल्हापूर.

## प्रकाशित पुस्तके -

१) **एस्. एम. जोशी : व्यक्ती व विचार**
(राज्यस्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त पुस्तक)

२) **सहकारातील दीपस्तंभ : तात्यासाहेब कोरे**

३) **कर्मयोगी : बाबा आमटे**

४) **युगपुरूष : महात्मा फुले**

५) **आनंदवन : एक ध्यासपर्व**

६) **लोकनेते : यशवंतराव चव्हाण**

## पुरस्कार-

१) प्राचार्य नलिनीताई वैद्य राज्यस्तरिय शिक्षक पुरस्कार - २००७

२) प्रगत महाराष्ट्र फेलोशिप सन्मान - २००८

# लेखकाची प्रकाशित पुस्तके


















भविष्याचा वेध घेणारा द्रष्टा नेता



१, रेसकोर्स रोड, नवी दिल्ली येथील निवासस्थान



**राजकीय वारसदार श्री. शरद पवार यांच्यासमवेत यशवंतराव (१९७८)**



**यशवंतराव चव्हाण समाधी परिसर 'प्रीतिसंगम' - कराड**



महाराष्ट्र राज्य उद्योगधंद्याच्या बाबतीत भारतात सर्वात आघाडीवर राहिले. उद्योगधंद्याचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत. रोजगारवृद्धी व जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी औद्योगिकीकरणाची गती वाढविणे गरजेचे आहे. विदर्भ, मराठवाडा, मुंबईसह 'संयुक्त महाराष्ट्र' निर्माण झाल्याने मराठी प्रदेशातील माणसे एकमेकांच्या खूपच जवळ आली.

विकासाच्या योजनेमध्ये माणूस हा केंद्रभूत असला पाहिजे. आधुनिक पद्धतीचा वापर शेतीक्षेत्रात करण्याबरोबरच शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्राकडेही राज्यकर्त्यांनी लक्ष दिले पाहिजे. समान संधी ही सामाजिक न्यायाच्या कल्पनेतील महत्त्वाची बाब आहे. सर्वांना समान सामाजिक व आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी अविरत योजना आखणे यावरच राजकारणातील यशापयश अवलंबून आहे.

माझ्या ४० वर्षांच्या राजकीय वाटचालीत मी विधानसभा व लोकसभेच्या मिळून एकूण १० निवडणूका लढविल्या व सर्व जिंकल्याही. प्रतिस्पर्ध्यांच्या जहाल टिकांनाही संयमाने सामोरे गेलो. काँग्रेस पक्षावरील असणारी निष्ठा, राजकारणातील तत्त्वनिष्ठता, कार्यकर्त्यांची साथ व जनतेचे अलोट प्रेम या माझ्या राजकीय जीवनातील जमेच्या बाजू होत.

**– यशवंतराव चव्हाण**

923
CH
G04